१६६४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५६६

# उत्तररामचरितम्

## रसग्रहण

REFBK-0013769
REFBK-0013769

सौ. विमलाबाई देशपांडे

૩૮૯૦૪
નિબંધ—
૨૦.૨.૬૫
સં.૨૧
૧૫૬૬

# उत्तररामचरितम्

## रसग्रहण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....३७८०१.... वि: ....निबंध....
क्रमांक ....१५६६.... नों दि. २०।२।६५

सौ. विमलाबाई देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३०६९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मूल्य रु. २·५०

REFBK-0013769

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली : डिसेंबर १९६४

© सौ. विमलाबाई देशपांडे

प्रकाशक
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणें २

मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार पेठ : पुणें २

# प्रस्तावने ऐवजीं

उत्तररामचरिताचें रसग्रहण आपण इतकें उत्कृष्ट केलें आहे कीं, त्याच्या तोलाची प्रस्तावना लिहिण्यास मी असमर्थ आहें. प्रकृति आणि वेळ यांची अनुकूलता नाहींच. पण या नाटकांतील विविध प्रसंगांनीं उत्पन्न होणारा भावनावेग आणि अश्रुधारा थांबवून तटस्थतेनें त्यांचें निरीक्षण करणेंहि मला जमणार नाहीं.

कालिदास हा प्रतिभाशाली खरा, पण शृंगार हा त्याचा आवडता रस आहे. भवभूतीनें 'दगडालाहि रडविणाऱ्या आणि वज्रहृदयालाहि पाझर फोडणाऱ्या' करुण रसाचा आविष्कार करून कालिदासाला मागें टाकलें आहे यांत शंका नाहीं. म्हणूनच 'उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते' असें म्हणतात, तें खरें आहे. श्रीरामाच्या अंतःकरणांतील कर्तव्य आणि प्रेम यांच्या संघर्षाचें भवभूतीनें घडविलेलें दर्शन त्याच्या असामान्य प्रतिभेचें निदर्शक आहे. बहुजनप्रिय शृंगाराच्या आविष्कारापेक्षां करुणाचा आविष्कार करणें कठीण आहे आणि शांताचा आविष्कार त्यापेक्षांहि कठीण आहे. शांत रसांतून भूतजातीविषयीं करुणा, त्यांतून वीर आणि वीरांचा शृंगार अशी रसांची श्रेष्ठ–कनिष्ठता मी 'ज्ञानेश्वरीचा अभ्यास' या पुस्तकांत वर्णिली आहे.

राजा या नात्यानें प्रजेविषयीचें कर्तव्य करण्याकरितां, प्राणापेक्षांहि प्रिय असणाऱ्या पत्नीचा त्याग करणाऱ्या श्रीरामाचें कर्तव्यकठोर, पण पराकाष्ठेचें प्रेमळ हृदय आणि पतीनें कर्तव्याकरितां केलेल्या त्यागानें रुष्ट न होतां त्याच्यावरील प्रेम अखंड ठेवणाऱ्या सीतेचें हृदय, यांचें जें विलक्षण परिणामकारक दर्शन भवभूतीनें घडविलें आहे, त्यामुळें वाचकांचीं मनें हेलावून जातात आणि 'श्लोकः शोकत्वमागतः' हे उद्गार सार्थ ठरतात.

रामानें केलेला सीतात्याग सामान्य जनांना आणि विशेषतः स्त्रियांना पटण्यासारखा नाहीं. त्याकरिता भवभूतीबरोबर श्रीरामाच्या हृदयांतच प्रवेश

केला पाहिजे. वाचकांना घेऊन आपण तसा प्रवेश केला आहे आणि भवभूतीला पाहिजे तसा 'समानधर्मा' रसिक भेटला आहे. पतीच्या जीवनाशीं समरस होऊन प्रेमविवाहाचें आदर्श स्वरूप प्रत्यक्ष दाखविणाऱ्या आपल्यासारख्या आधुनिक पदवीधर विदुषीनें या नाटकाचें सहृदयतेनें केलेलें रसग्रहण पाहून भवभूतीच्या आत्म्याला अत्यंत समाधान होईल.

भवभूतीसारखे महाकवि हे साऱ्या मानवजातीचे असतात. तथापि तो भारतीय होता आणि विदर्भांतील होता, याचा अभिमान वाटल्यावाचून राहत नाहीं.

आपल्या रसग्रहणाला प्रास्ताविक आहेच, त्याशिवाय रसग्रहणाचेंहि रसग्रहण करणाऱ्या आणखी प्रस्तावनेची आवश्यकता मला दिसत नाहीं. एखाद्या तात्त्विक ग्रंथाला, त्याचें स्वरूप थोडक्यांत विशद करून वाचकांचा त्यांत प्रवेश करून देणारी प्रस्तावना असली तर चालते. पण आपल्या रसग्रहणाला त्याची आवश्यकता नसावी.

नागपूर<br>
२०-१०-१९६४

शं. दा. पेंडसे

# निवेदन

तेराचौदा वर्षांपूर्वी नागपूरच्या 'भवितव्य' साप्ताहिकांत क्रमशः प्रसिद्ध केलेल्या, भवभूतीच्या 'उत्तररामचरित' नाटकावरील लेखांचा संग्रह आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांना, लेखिकेचें निवेदन अवश्य आहे असें वाटतें.

भवभूति हा संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं मान्य केलेला कालिदासाच्या तोडीचा महाकवि. आणि उत्तररामचरित हें त्याचें सर्वोत्कृष्ट नाटक. तेव्हां अशा थोर नाटकावर लेख लिहिण्याचें साहस करणाऱ्या लेखकाचा कांहीं विशेष अधिकार असला पाहिजे असा कोणाचाहि सहज समज होईल. म्हणून प्रथमच मला हें प्रांजलपणें सांगून टाकलें पाहिजे कीं, अशा प्रकारचा कोणताहि अधिकार मला नाहीं. संस्कृत साहित्याचें माझें वाचन अल्प आहे आणि संस्कृत साहित्यशास्त्राचें तर तें जवळ जवळ नाहींच. आणि असें असूनहि 'उत्तररामचरिता' वर लेख लिहिण्याचें मीं धाडस केलें याचें कारण एकच; भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'नें मला अनेक वर्षें मोहून टाकलें आहे. माझ्या प्रत्ययास आलेल्या त्या काव्याच्या अतिशय उदात्तमधुर रसाचें इतरांनाहि वांटेकरी करावें ही उत्कट इच्छा, हेंच हे लेख लिहिण्याचें कारण.

शालेय जीवनाच्या शेवटच्या वर्षांत आमच्या एका अतिशय रसिक संस्कृत शिक्षकानें संस्कृत वाङ्मयांतील उत्तमोत्तम रत्नांचें भांडार आम्हांला प्रदान केलें. शाकुंतल, उत्तररामचरित, मेघदूत, रघुवंश, कादंबरी, कुमारसंभव इत्यादि साहित्यांत जें जें मधुर, रमणीय, उदात्त व कल्पनारम्य तें तें आमच्यासमोर नुसतें ठेवलें गेलें नाहीं, तर त्याचें रसग्रहण अतिशय उत्कटतेनें व रसाळपणानें केलें गेलें. अत्यंत संवेदनक्षम अशा त्या वयांत संस्कृत साहित्याच्या मधुरतेचा व रमणीयतेचा फार खोल ठसा माझ्या मनावर उमटणें हें अर्थात् नैसर्गिकच होतें. पुढें महाविद्यालयीन काळांत साहित्याभिरुचीचे कांहीं संस्कार अधिक खोल झाले व कांहीं मात्र पुसट होत गेले. माझें 'उत्तररामचरिता' वरील प्रेम मात्र विशेषच दृढ झालें.

चौदापंधरा वर्षांपूर्वी भवभूतीच्या साहित्यावर आयोजिलेल्या एका परिसंवादांत भाग घेण्याच्या निमित्तानें मीं ‘ उत्तररामचरित ’ पुन्हा अतिशय एकाग्रतेनें वाचलें. शालेय किंवा विद्यालयीन जीवनांत आवडणारें किती तरी साहित्य पुढें प्रौढ वयांत आवडेनासें होतें. परंतु ‘ उत्तररामचरिता ’च्या प्रौढ वयांतील वाचनानें माझें त्याच्यावरील प्रेम सहस्रपट वृद्धिंगत केलें. पुन्हा नव्यानें घडलेलें हें ‘ उत्तररामचरिता ’ चें मनोज्ञ दर्शन इतरांनाहि घडवावें व आपणांस मिळालेला आनंद इतरांनाहि मिळवून द्यावा अशी उत्कट इच्छा त्या वेळीं माझ्या मनांत उत्पन्न झाली. त्या इच्छेच्या पोटींच या लेखांचा जन्म झाला.

इतकीं वर्षें मोहवून टाकण्यासारखें असें काय ‘ उत्तररामचरितांत ’ मला आढळलें ? वस्तुतः रामानें प्रजानुरंजनासाठीं सीतेचा जो अन्यायानें त्याग केला, तें त्याच्या उदात्त चरित्राला लागलेलें एक मोठें लांछन आहे अशी माझी पूर्वी दृढ समजूत होती; परंतु भवभूतीच्या ‘ उत्तररामचरितां ’त रामाचें जें दर्शन घडविलें गेलें आहे, त्यानें माझ्या दृढ समजुतीचें निराकरण केलें. भवभूतीनें रामचरित्राचें जें नवें दर्शन घडविलें आहे, तें इतकें नाजुकपणानें, कौशल्यानें व उत्कटत्वानें घडविलें आहे कीं, त्या दर्शनानें सीतेच्या हृदयांतील अकारण परित्यागाचें शल्य जसें समूळ उपटून गेल्याचें प्रत्ययास येतें, त्याचप्रमाणें सामान्यतः आपल्याहि मनाला तोच प्रत्यय येतो. आदर्श राजा या स्वरूपांत आपलें कठोर कर्तव्य पार पाडण्यासाठीं सीतेचा त्याग करण्याचा रामानें जो निर्णय घेतला, त्यामुळें सर्वांत दारुण आघात कोणावर झाला असेल, तर तो त्याच्या स्वतःवरच. या अकारण त्यागामुळें सीतेची स्थिति अतिशय अनुकंपनीय झाली हें स्पष्टच आहे. रामाचा निरवधि विरह आणि त्यागाच्या अपमानाचें शल्य हीं दोन्ही सीतेला सहन करावीं लागलीं खरीं; पण निरपराध व प्रियतम अशा सीतेचा त्याग जाणतेपणानें करावा लागल्यामुळें रामाला सीतेच्या कायमच्या विरहाचें दुःखसुद्धां उघडपणें व्यक्त न करतां मूकपणें आंतल्या आंत सहन करावें लागलें, ही गोष्ट कशी विसरतां येईल ? वर्षानुवर्षें राजकर्तव्यें दक्षतेनें पार पाडीत राहावयाचें आणि प्रियतमेचा सहवास तर राहोच; परंतु तिच्या अकृत्रिम, प्रगाढ प्रेमाचें मधुर स्मरणहि उघड करतां यावयाचें नाहीं—असें हें रामाचें जीवन म्हणजे केवढें कठोर दिव्य होतें !

अशा या रामाचें—सीतेविषयींची गाढ व मधुर प्रीति वाक्यावाक्यांतून व कृतीकृतींतून सहजपणें व सूचकपणें उधळीत राहणाऱ्या रामाचें, जें दर्शन उत्तररामचरिताच्या पहिल्याच अंकांत घडतें, त्यामुळें अकारण सीतात्यागाबद्दलचा रामाविषयींचा राग पार नाहींसा होऊन, अतीव करुणेनें व सहसंवेदनेनें मन भरून येतें.

रामाच्या या विलोभनीय, उदात्त रूपाचा, सीतात्यागानंतरचा जो आविष्कार तिसऱ्या अंकांत दृष्टीस पडतो, त्यानें तर सीतेबरोबर आपणहि सर्व शंकामुक्त होऊन रामाच्या उदात्त व नाजुक प्रेमामुळें मोहित होऊन जातों.

भवभूतीच्या उत्तररामचरिताचा आणखी एक मनोज्ञ विशेष आहे. शंबूकवधासाठीं अयोध्येहून पुष्पक विमानानें दण्डकारण्यांत प्रवेश करणाऱ्या रामाचें जें नवें दर्शन उत्तररामचरिताच्या दुसऱ्या अंकांत भवभूतीनें घडविलें आहे, तें हृदयाला चटका लावणारें आहे. अयोध्येंत एक ब्राह्मणपुत्र अकालीं मरण पावल्यामुळें राज्यांत कोठें तरी पाप घडत आहे असा निष्कर्ष काढला गेला. आणि शंबूक नांवाचा एक शूद्र अधिकार नसतां तपश्चर्या करीत आहे, तेव्हां त्याचा वध करून हें अनधिकार-चेष्टेचें महापाप नाहींसें केल्याशिवाय तो ब्राह्मणपुत्र जिवंत होणार नाहीं असा आदेश आकाशवाणीनें ‘ अयोध्येच्या राजाला ’ दिला.

आजच्या विसाव्या शतकांतील मनुष्याला हें वाचून साहजिकच चीड येते. शंबूक शूद्र असला म्हणून काय झालें ? तपश्चर्या करण्याचा अधिकार त्यालाहि असला पाहिजे. त्याला मारून ब्राह्मणपुत्राला जिवंत करण्याचा खटाटोप करणें हें कोणत्याहि न्यायी व सहृदय राजाला मुळींच शोभण्यासारखें नाहीं, अशीच आपली साहजिक धारणा असते; पण शंबूकवधासाठीं आलेला राम हा सहृदय आहे आणि शंबूकवधाचें कृत्य हें एक अत्यंत अप्रिय असें कृत्य केवळ कठोर राजकर्तव्य म्हणून आपणांस पार पाडावें लागत आहे, अशा अगतिक वृत्तीनेंच तें तो पार पाडीत आहे अशी आपली मनोमन खात्री भवभूति पटवून देतो. शंबूकाला मारण्यासाठीं रामानें खड्ग उपसलें आहे; परंतु त्याचें हृदय मात्र दयेनें भरलेलें आहे असें प्रारंभींच भवभूतीनें सुचविलें आहे. शंबूकवधासाठीं खड्ग धारण करणाऱ्या आपल्या उजव्या हाताला उद्देशून राम जे उपहासाचे व स्वतःच्या अधिक्षेपाचे उद्गार काढतो, त्यांतील शब्दाशब्दांतून

त्याची सदयता व अगतिकता स्वच्छपणें प्रतिबिंबित होते. शंबूकाचा उल्लेख 'शूद्रमुनि' या गौरवास्पद शब्दानें राम करतो. आणि शंबूकावर प्रहार करून तो मरण पावतांच रामाच्या हातून मरण आल्यामुळें दिव्यपुरुषाच्या रूपांत शंबूक प्रवेश करून रामाचा जेव्हां जयजयकार करतो, तेव्हां हर्षोत्फुल्ल होऊन राम त्याला 'तुझ्या उग्र तपाचा परिणाम म्हणून तुला दिव्यलोक प्राप्त होवो' असा आशीर्वाद देतो.

रामचरित्रांतील सीतात्यागाचा व शंबूकवधाचा जो अतिशय अन्यायी म्हणून बोंचणारा असा भाग आहे, त्यांतील बोंच भवभूतीच्या 'उत्तररामचरितां'तील रामानें याप्रमाणें नाहींशी करून टाकली आहे. पण याहून किती तरी अधिक भवभूतीनें दिलें आहे !

उत्तररामचरितांतील रामाचें वेगवेगळ्या नात्यांतील जें मनोज्ञ दर्शन भवभूतीनें घडविलें आहे, त्याचा आस्वाद घेतांघेतां रामाच्या ठायीं एकत्रित झालेल्या गुणविशेषांनीं मन भरून जातें. एकोणिसाव्या शतकांत मानवतेच्या सुसंस्कृततेच्या, औदार्याच्या व प्रीतीच्या ज्या नवनवीन मूल्यांनीं माणसांचीं स्वप्नें बहरलीं होतीं, त्या मूल्यांचा आविष्कार भवभूतीच्या रामांत झालेला पाहिला कीं, हृदय जसें आनंदून जातें, त्याप्रमाणें तें आश्चर्यचकितहि होतें. वस्तुत: संस्कृत नाटकांतून किंवा काव्यांतून प्रणयाचें जें चित्रण झालेलें आढळतें तें मला तरी नेहमींच केवळ शारीरिक स्वरूपाचें असेंच दिसलें आहे. प्रणयाचा व प्रीतीचा सखोल, मानसिक पातळीवरचा नाजुक आविष्कार मात्र मला फक्त भवभूतीच्या राम-सीतांमध्यें आढळला. पहिल्या अंकांतील सीतेचा पति आणि प्रियकर राम जसा मनोज्ञ वाटतो, त्याचप्रमाणें तिसऱ्या अंकांतील सीतेच्या सखीशीं—वासंतीशीं—बोलणारा राम हाहि मनोज्ञ वाटतो. आणि पिता या नात्यानें सहाव्या अंकांत लव—चंद्रकेतूंचें युद्ध चाललें असतां, तें थांबविण्यासाठीं पुष्पक विमानांतून युद्धभूमीवर उतरणाऱ्या रामाचे चंद्रकेतूशीं व लवाशीं जे संवाद होतात, त्यांतून तर मधुर वात्सल्यरस सतत पाझरतांना दिसतो.

पण उत्तररामचरितांत एकट्या रामाचेंच विलोभनीय व अभिनव चित्रण आहे असें नाहीं. रामाचें 'द्वितीय हृदय' अशा सीतेचें असेंच आविष्करण आहे.

वाल्मीकि रामायणांत सीतेचें जें चित्रण आहे तें, रामावर अनन्य प्रेम करणारी, त्या प्रेमासाठीं येतील तीं सारीं संकटें शांतपणें सहन करणारी; पण अखेर लोकरंजनासाठीं रामाकडूनच परित्याग केली गेलेली अशी ‘ करुणस्य मूर्तिः अथवा शरीरिणी, विरहव्यथेव वनमेति जानकी ’ अशा सीतेचें. राम हेंच तिचें जीवनसर्वस्व; पण रामाकडूनच तिच्यावर घोर अन्याय झालेला, असेंच सीतेचें चित्र आपल्या मनावर कोरलें गेलेलें असतें. उत्तररामचरितांत मात्र रामचरित्रांतील प्रमुख घटना जशाच्या तशाच ठेवून, सीतेचा त्याग केला असतांहि रामाचें उदात्तत्व भवभूतीनें प्रत्ययपूर्ण रीतीनें ठसविलें आहे. आपला त्याग रामानें लोकानुरंजनासाठीं–राजधर्माचें पालन करण्यासाठीं केलेला असला, तरी या त्यागामुळें स्वतः रामानें आपणांवर जें अपार दुःख ओढवून घेतलें आहे, त्याचा उत्कट व कुशल आविष्कार सीतेला घडवून भवभूतीनें तिच्या मुखानें माझें ‘ परित्यागशल्य समूळ उपटून टाकलें गेलें आहे ’ असे धन्यतेचे उद्गार काढविले आहेत.

पहिल्या अंकांत सीतेच्या मनाला जपणारे, तिला यत्किंचित्‌हि दुःख होऊं नये यासाठीं अखंड प्रयत्न करणारे असे प्रीतिपूर्ण शब्द रामाच्या मुखांतून पदोपदीं बाहेर पडतांना आढळतात. रामाच्या उत्कट प्रेमामुळें अत्यंत विश्रब्ध अशी सीता येथें दिसते; पण त्याच अंकाच्या शेवटीं सीतेला वनांत सोडून देण्यासाठीं रथ आणण्यास राम आज्ञा करतो.

यानंतर सीता जी दृष्टीस पडते, ती एकदम तिसऱ्या अंकांत. शंबूक-वधासाठीं पंचवटींत आलेल्या रामाला तेथील परिचित दृश्यें पाहून सीतेच्या आठवणीनें अनावर शोक होतो आणि अयोध्येपासून दूर दूर, एकटाच असल्यामुळें बारा वर्षें हृदयांतच उसळत असलेल्या सीताविरह-दुःखाला तो मोकळी वाट करून देतो आणि रामाची ही अवस्था अगोदरच लक्षांत घेऊन भागीरथीनें सीतेला तेथें आणून अदृश्य अवस्थेंत ठेवलें असल्यामुळें रामाच्या या अत्युत्कट दुःखाचें दर्शन सीतेला घडून आपल्या त्यागाचें शल्य तिच्या मनांतून संपूर्णपणें नाहींसें होऊन स्वतःला ती धन्य मानून घेते. यानंतरहि ती रामापासून दूरदूरच असते; पण रामाच्या आपल्यावरील अत्युत्कट प्रीतीची साक्ष हृदयांत भरून घेऊन तृप्ततेनें ती तेथून निघून जाते.

भवभूतीनें चित्रित केलेल्या सीतेचें सर्वस्वीं वेगळें दर्शन तें हेंच.

राम–सीतेच्या चित्रणांतूनच नव्हे, तर वासंती, जनक, कौसल्या, लव, चंद्रकेतु व वृद्ध सुमंत्र या सर्वांच्याच चित्रणांत मानवी जीवनांतील वेगवेगळ्या जिव्हाळ्याच्या संबंधांचें अतिशय हृदयंगम असें दर्शन भवभूतीनें घडविलें आहे. तिसऱ्या अंकांत शंबूक-वधासाठीं राम आला असतां सीतेच्या प्रिय-सखीची–वासंती नामक वनदेवतेची – रामाशीं भेट होते, त्या वेळीं सीतापति राम व सीतासखी वासंती यांच्या संभाषणांतून जें स्नेहाचें दर्शन घडतें तें कांहीं आगळेंच आहे. त्यांच्या संवादांतून उभयतांच्या सीतेवरील प्रेमाचे नाजुक धागे गतस्मृतींभोंवतीं मनोरम गोफ गुंफीत राहतात.

चौथ्या अंकांत एका वेगळ्याच नात्याचा असाच सुंदर आविष्कार आहे. सीतात्यागाच्या प्रसंगानंतर बारा वर्षांनीं वसिष्ठ, अरुंधति व कौसल्या वाल्मीकींच्या आश्रमांत येतात. 'सीतेवांचून शून्य भासणाऱ्या अयोध्येंत मी प्रवेश करणार नाहीं,' या अरुंधतीनें बोलून दाखविलेल्या निश्चयाशीं सहमत होऊन कौसल्याहि ऋष्यशृंगाकडील बारा वर्षांचा यज्ञ आटोपल्यावर सरळ वाल्मीकींच्या आश्रमांत येते आणि योगायोगानें त्याच दिवशीं कन्येच्या दुःखानें शोकपीडित झालेला जनक आश्रमांत प्रवेश करतो. दशरथाचा परम मित्र जनक आणि दशरथाची प्रिय पत्नी कौसल्या या व्याही-विहिणींच्या भेटीचा प्रसंग सीतात्यागाच्या पार्श्वभूमीमुळें विशेषच नाजुक बनला आहे. 'त्या प्रजापालकाच्या मातेचें कुशल आहे ना?' असा उपरोधपूर्ण कुशल प्रश्न जनक अरुंधतीला करतो; पण सीतात्यागामुळें बारा वर्षांत कौसल्येनें रामाचें मुखावलोकनहि केलें नाहीं, हें कळतांच जनक एकदम विरघळतो. आणि 'महाराज दशरथाची पत्नी प्रियसखी कौसल्या' या शब्दांनीं तो तिला संबोधतो. जनकाचें व कौसल्येचें दुःख एकच बनतें. आणि लवाच्या दर्शनामुळें तर उभयतांच्या हृदयांत आनंदाची एकच लाट उसळते.

पांचव्या-सहाव्या अंकांतून लव–चंद्रकेतु यांच्या मधुर स्नेहाचें व पौरुषाच्या आविष्काराचें सुंदर वर्णन आहे. चंद्रकेतूचा सारथी वृद्ध सुमंत्र याच्या स्वामि-निष्ठेच्या व कौतुकाच्या शब्दांमुळें लव-चंद्रकेतूच्या युद्धाला एक वेगळीच पार्श्वभूमि लाभली आहे.

पति-पत्नी, पिता-पुत्र, व्याही-विहिणी व स्नेही इत्यादि नाना प्रकारच्या नात्यांनीं मानवाचें जीवन नटलेलें असतें. या वेगवेगळ्या नात्यांतील मधुरता

व सखोलता अतिशय नाजुकपणानें भवभूतीनें उत्तररामचरितांत चित्रित केली आहे. राम व वासंती, तसेंच जनक व कौसल्या हे स्त्री-पुरुष केवळ स्नेहाच्या भावनेनें परस्परांशीं जेव्हां बोलतांना दिसतात, तेव्हां एकोणिसाव्या —विसाव्या शतकांतील अत्युच्च आदर्शाच्या व्यक्ति तर या नाहींत ना असा क्षणभर भास होतो. पिता, बंधु, पति किंवा पुत्र या जवळच्या नात्यांखेरीज स्त्री स्नेहभावनेनें व सहजपणानें पुरुषाशीं बोलतांना दिसते, ती उत्तररामांतच. या स्नेहभावाची पातळी इतकी सहजपणें उच्च राखली गेली आहे कीं, मन स्तिमित होतें. हा उत्तररामचरिताचा एक विलोभनीय विशेष आहे.

उत्तररामचरिताच्या पहिल्या पानापासून सातव्या अंकाच्या अखेरच्या पानापर्यंत आपण एका करुण—मधुर, उदात्त, सोज्ज्वळ व भावपूर्ण जगांत विहरत आहोंत असा सतत प्रत्यय मला तरी आला आहे. आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत मानवी मूल्यें चहूंकडे पायदळीं तुडविलीं जात असतांना, त्या उदात्त उत्कट मूल्यांचा जिवंत आविष्कार पाहण्यास मिळावा व हृदयांत, भरून घेण्यास मिळावा या इच्छेनें उत्तररामचरिताकडे धांव घ्यावीशी वाटते. उत्तररामचरित ही इच्छा संपूर्णपणें पुरवितें असा मला तरी अनुभव आला आहे.

मला घडलेल्या या उदात्त दर्शनाचे वाटेकरी इतरांना करावें या इच्छेनेंच उत्तररामचरितावरील हे लेख लिहिण्याचें मीं धाडस केलें. आज पुस्तक-रूपानें तें प्रसिद्ध करतांना तीच इच्छा मला प्रेरक झाली आहे. इतरांनाहि तें दर्शन सुखवील व प्रभावित करील, असा विश्वास व्यक्त करून हें निवेदन संपवितें.

नागपूर
१-१०-१९६४

**विमलाबाई देशपांडे**

◎ ◎ ◎

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रास्ताविक–शं. दा. पेंडसे | ३ |
| निवेदन–विमलाबाई देशपांडे | ५ |
| प्रास्ताविक | १ |
| अंक पहिला–चित्रदर्शन | ४ |
| अंक दुसरा–पंचवटी-प्रवेश | ११ |
| अंक तिसरा–छाया | १९ |
| अंक चवथा–कौसल्या-जनक,योग | ३२ |
| अंक पांचवा–लव-चंद्रकेतु-आव्हान | ४२ |
| अंक सहावा–कुमारप्रत्यभिज्ञान | ४९ |
| अंक सातवा–सम्मेलन | ५७ |

# प्रास्ताविक

जुन्या भारतीय वाङ्मयाचें जें दर्शन आपणांस आज घडतें, तें मुख्यतः संस्कृतांतील नाट्याच्या व काव्यांच्या द्वारां घडतें. खरोखर त्या काळांत संस्कृत भाषेंत काव्य, नाटक, कादंबरी इत्यादि विभागांत किती ग्रंथ निर्माण झाले याची पूर्ण कल्पना आपणांस येणें शक्य नाहीं. कालाच्या ओघांत अनेक संहारक शक्तींमधून मार्ग काढीत जे जे ग्रंथ आज आपल्यासमोर आले आहेत, त्यांच्यावरूनच संस्कृत भाषेंतील जुन्या भारतीय वाङ्मयाचें दर्शन आपणांस होत आहे. कालिदास, भवभूति, बाण, भारवी, दण्डी, विशाखदत्त, शूद्रक इ. नाटककारांचीं नाटकें संस्कृत वाङ्मयाचें वैभव आपणांसमोर उधळीत आहेत. कालिदासाचें शाकुंतल व शूद्रकाचें मृच्छकटिक हीं नाटकें तर मराठी नाट्यरसिकांसमोरहि आलेलीं आहेत. पण भवभूतीचें उत्तररामचरित हें मात्र अत्यंत उदात्त काव्य म्हणून संस्कृत नाट्यवाङ्मयांत थोर थोर रसिकांच्या प्रशंसेचा विषय झालें असलें, तरी मराठी वाचकांपर्यंत त्यांतील उदात्तता व मधुरता येऊन पोंचली नाहीं.

संस्कृत नाट्यवाङ्मयाचा माझा परिचय व अभ्यास विशेष व्यापक नसला, तरी बहुतेक चांगल्या नाटकांची गोडी मीं अंशतः चाखलेली आहे. परंतु उत्तररामचरितानें जो प्रभाव माझ्या मनावर तीस वर्षांपूर्वीं पडला, त्याहूनहि अधिक सखोल ठसा आजहि उत्तररामचरिताच्या वाचनानें माझ्या मनावर उमटतो. तारुण्यांत अनेक कथा, काव्यें, नाटकें व कादंबऱ्या विलोभनीय वाटतात. पण प्रौढ वयांत त्या त्या साहित्यप्रकाराचें विशेष कौतुक वाटत नाहीं, हा अनुभव आपणांस वारंवार येत राहतो. असें असतांहि उत्तररामचरिताची उदात्तता, मधुरता व त्यांतील रसांची उत्कटता आज मला पूर्वींपेक्षांहि जास्त जाणवूं लागली आहे. उत्तररामचरिताच्या या अवीट गोडीचें रहस्य कशांत सांठलें आहे हें शोधण्याचा यत्न यामुळेंच मीं विशेष खोल जाऊन केला. आणि या शोधांत मला भारतीय दृश्य काव्याचें जें अत्युच्च दर्शन घडलें, तें मराठी रसिकांना सादर करावेंसें वाटलें.

रामचरित्र हें भारतांत शेकडों कवींना, नाटककारांना व कादंबरीकारांना आज शतकानुशतकें स्फूर्तिप्रद झालें आहे. रामचरित्रांतील करुणरम्य उदात्तता कोणाचेंहि मन मोहून टाकण्यासारखी आहे. परंतु मनाला जें जाणवलें, भावनेला ज्यानें उचंबळविलें व महिरून टाकलें तें रामचरित्रांतील भावविश्व तेवढ्याच उत्कटतेनें, तेवढ्याच सखोलतेनें व तेवढ्याच मृदुकोमल व वज्रकठोर शब्दांनीं ज्याला आपल्या वैभवशाली रसवंतीनें व्यक्त करतां येईल, तोच रामचरित्राचा खरा उद्गाता होऊं शकेल. हें बुद्धीचें, भावनेचें, कल्पनेचें व आविष्काराचें सामर्थ्य ज्या प्रतिभावंताच्या ठायीं वसत असेल, तोच रामचरित्रांतील जिवंत करुणरम्यता व उदात्तता नेत्रांसमोर उभी करूं शकेल. भवभूतीच्या ठायीं या गुणांचा समन्वय झाला होता याची साक्ष त्याचें उत्तररामचरितच देत आहे.

वस्तुतः भवभूतीचा काल हा इ. स.च्या आठव्या शतकांतला समजला जातो. अकराशें वर्षांपूर्वी उत्तररामचरित लिहिलें गेलें ही एकच गोष्ट लक्षांत ठेवली कीं, त्यांतील व्यक्तिचित्रांविषयींचें आपलें कौतुक सहज वाढत जाईल. सामान्यतः इ. स. च्या तिसऱ्या शतकांत भासकवि होऊन गेला असें मानलें तर भास व भवभूति यांच्यामधील पांचशें वर्षांच्या काळांत शूद्रक, कालिदास, बाण आदि साहित्यिक होऊन गेलेले आढळतात. भवभूतिपूर्व कालांतील या नाटककारांचीं नाटकें नजरेसमोर ठेवलीं किंवा भवभूतीनंतरच्या दोनचार शतकांतील विशाखदत्त, भट्टनारायण यांसारख्यांचीं नाटकें पाहिलीं, तरी सर्वांमध्यें अनेक दृष्टींनीं भवभूतीचें उत्तररामचरित अगदीं वेगळें उठून दिसतें. शृंगार, वीर, करुण या तीन प्रमुख रसांचा या सर्व नाटकांतील परिपोष पाहिला, त्यांतील निरनिराळ्या पात्रांच्या स्वभावांचें चित्रीकरण पाहिलें, त्यांत आढळून येणाऱ्या पतिपत्नी, पितापुत्र यांच्यामधील किंवा कुटुंबियांमधील संबंधांतील भावदर्शन नीट निरखून पाहिलें, म्हणजे उत्तररामचरिताचें स्थान या सर्व काव्यनाटकांपेक्षां अगदीं वेगळ्या व अतिशय उच्च श्रेणीचें आहे हें सहज दिसून येतें.

नाट्यशैलीमध्यें, लालित्यामध्यें, सहजसुंदर काव्यामध्यें कालिदासाचा हात धरणारा कवि अथवा नाटककार सांपडणें कठीण आहे हें कोणीहि कबूल करील.

मृच्छकटिकांतील व भासाच्या नाटकांतील पात्रांची विविधता व व्यक्तिरेखाटनाची कुशलता केव्हांहि प्रशंसनीय आहे. हे कवि अगर नाटककार मनाला रिझवितात, उचंबळवितात; कधीं करुणररसपरिपोषानें नेत्रांत अश्रु उभे करतात; सुंदर उपमा, उत्प्रेक्षा, रूपक व अर्थांतरन्यास यांच्या पखरणीनें चित्त सुखवितात; श्रवणसुभग काव्यपंक्ति स्मृतीमध्यें आंदोलवितात. पण उत्तररामचरित मात्र पहिल्या अंकापासून एका अति उदात्त व नितांतसुंदर वातावरणांतून मनाची जी पकड घेतें, तें मध्येंमध्यें हंसवीत, खुलवीत, रडवीत, शेवटच्या अंक संपेपर्यंत बुद्धीवर व भावनेवर प्रभुत्वच गाजवीत राहतें. तें वाचीत असतां अनाद्यनंत अशा सखोल प्रीतीच्या, त्यागाच्या, सुखातिशयाच्या व दुःखातिशयाच्या सघन प्रदेशांतून आपलें मन आपल्या नकळत हिंडत राहतें.

उत्तररामचरितासाठीं भवभूतीनें रामचरित्राचा जो विभाग निवडला, तो सामान्यतः कोणी हाताळलेला नव्हता. रामचरित्राचें वर्णन करावयाचें तें रामचंद्र चौदा वर्षांच्या वनवासानंतर व रावणवधानंतर राज्याभिषिक्त झाले तेथपर्यंतच. सीतात्यागामुळें रामचरित्राला जें लांछन लागलें आहे, तेथून पुढचा रामचरित्राचा भाग आपल्या काव्यनाटकासाठीं सहसा कोणी निवडला नाहीं. या विभागाविषयीं कोणी लिहूं नये असाच जणूं अलिखित दंडक अस्तित्वांत होता. या अलिखित दंडकानें कवींना दिलेलें आव्हानच भवभूतीनें स्वीकारलें. सीतात्यागापासूनचाच रामचरित्राचा भाग त्यानें आपल्या अत्युत्तम नाटकासाठीं निवडला. ज्या साहसी वृत्तीनें भवभूतीनें नाट्यकथानकाची निवड केली, त्याच साहसी वृत्तीनें पण लीलेनें त्यानें अखेरपर्यंत नाटकाची यशस्वी रचना केली.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ३८००२ वि: निबंध
क्रमांक १५९६ नोंद दि: २०।२।६५

# अंक पहिला

## चित्र-दर्शन

उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकाच्या प्रारंभींच राम-सीतेचा जो प्रवेश होतो तो संमिश्र भावनांच्या वातावरणांत. चौदा वर्षांच्या वनवासानंतर व रावणयुद्धासारख्या घोर युद्धानंतर रामचंद्र अयोध्येला गेला व सशास्त्र राज्याभिषेक होऊन तो आतां रघुकुलवंशी राजा म्हणून राज्य करूं लागला, याबद्दल त्याचें अभिनंदन करण्यासाठीं युद्धांतील मित्र जे वानर व राक्षस, तसेंच देशादेशांतून आलेले ब्रह्मर्षि व राजर्षि अयोध्येस जमलेले असतात. त्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ उत्सव चालू असतो. नुकताच उत्सव संपून सर्व अभ्यागत आपापल्या घरीं जातात. राजा जनकहि जामाताचा व कन्येचा निरोप घेऊन विदेहास परत जातो. सर्व पाहुणे एकदमच गेल्यामुळें व विशेषतः पित्याच्या वियोगामुळें सीता विमनस्क स्थितींत असते. रामचंद्र आपल्या प्रेमळ आश्वासनानें तिचें सांत्वन करीत असतो. येथूनच नाटकाला प्रारंभ होतो. इतक्यांत दशरथाचा जामात जो ऋष्यशृंग त्यानें प्रारंभिलेल्या द्वादश-वार्षिक यज्ञासाठीं गेलेल्या वसिष्ठ-अरुंधती व कौसल्यादि मातांकडून रामसीतेचें कुशल विचारण्यासाठीं दूत येतो. वसिष्ठांकडून, अरुंधती—कौसल्यादीं-कडून व ऋष्यशृंग-शांताकडून आलेला म्हणून जो वेगवेगळा निरोप तो दूत सांगतो, तो मोठा मार्मिक आहे. वसिष्ठ सीतेला सांगतात,

**विश्वंभरा भगवती भवतीमसूत**
**राजा प्रजापतिसमो जनकः पिता ते ।**
**तेषां वधूस्त्वमसि नन्दिनि ! पार्थिवानाम्**
**येषां कुलेषु सविता च गुरुर्वयं च ॥**

'विश्वंभरा पृथ्वी तुझी माता आहे, प्रजापतीसारखा राजा जनक हा तुझा पिता आहे आणि ज्या रघुवंशाचे गुरु सूर्य व मी असे दोघे आहोंत, त्या कुलाची तूं वधू-सून आहेस. याहून आणखी काय आशीर्वाद द्यायचा ! वीरप्रसू हो एवढाच आशीर्वाद द्यायचा आहे !'—वसिष्ठांच्याहि दृष्टीनें सीतेची एवढी मोठी प्रतिष्ठा आहे !

अरुंधति आदि माता रामचंद्रास सांगतात, 'सीतेचे जे जे दोहद असतील ते लागलीच पुरवीत जा.' ऋष्यशृंगाचा सीतेला निरोप हा कीं, 'तुझे दिवस भरत आले म्हणून तुला यज्ञासाठीं इतरांबरोबर आणलें नाहीं. शिवाय तुझ्या विनोदनासाठींच रामचंद्राला तेथें ठेवलें आहेच. तेव्हां तुला पुत्रवती झालेलीच पाहण्याची इच्छा आहे.'—सारे निरोप सीतेला किंवा सीतेसंबंधीं. राम शेवटीं विचारतो, 'भगवान वसिष्ठांनीं मला नाहीं का कांहीं निरोप सांगितला ?' वसिष्ठांनीं पुढीलप्रमाणें कर्तव्यपालनाचा संदेश दिला होता. 'येथील यज्ञामुळें मी अडकलों आहें. तूं अजून तरुण आहेस. राज्यहि नवेंनवेंच आहे. तेव्हां प्रजानुरंजनांतच यश सांठलें आहे हें ध्यानांत ठेवून तें परमधनाप्रमाणें जप.'—नव्यानेंच राज्याचा भार पडलेल्या कर्तव्यदक्ष रामानें

**स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।**
**आराधनाय लोकानां मुञ्चतो नास्ति मे व्यथा ॥**

'प्रजानुरंजनासाठीं मी स्नेह, दया व सौख्य या सर्वांचा त्याग करण्यास तयार आहें, सीतेचाहि त्याग करण्यानें मला दुःख होणार नाहीं' असें उत्तर तात्काळ द्यावें हें साहाजिकच आहे.

एवढें बोलणें होतें तों लक्ष्मण प्रवेश करून रामचरिताचा चित्रपट चित्रकारानें तयार करून आणला तो दाखवितो. 'कोठपर्यंतचें वृत्त यांत आहे ?' या रामाच्या प्रश्नाला, 'सीताशुद्धीपर्यंतचें' हें उत्तर लक्ष्मणाकडून येतांच राम ओशाळा होतो.

**उत्पत्तिपरिपूतायाः किमस्याः पावनान्तरैः ।**
**तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः ॥**

'जिचा जन्मच भगवती वसुंधरेपासून झाला तिला पावन करण्याची गरजच काय ? तीर्थोदक आणि अग्नि यांची शुद्धि दुसऱ्यांकडून करविण्याची आवश्यकताच नाहीं.' असे सान्त्वनाचे उद्गार राम तत्काळ काढतो व सीतेला म्हणतो,

कष्टो जनः कुलधनैरनुरंजनीय-
स्तन्नो यदुक्तमशिवं न हि तत्क्षमं ते।
नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि ॥

'कुलधनवंतांना या निष्ठुर जगाचें अनुरंजन करणें भागच पडतें. म्हणून तुझ्याविषयीं जें अशिव मी बोललों, त्याला तूं कधींहि पात्र नव्हतीस. सुगंधी कुसुमाचें नैसर्गिक स्थान मस्तकावर असतें. पायदळीं तुडविलें जाणें हें त्याचें कधींच भवितव्य नसतें '

येथून पुढें चित्रपटांतील एकेका चित्राचें तिघांपैकीं कोणाच्या तरी मुखानें वर्णन चालतें. रामविवाहापासून सीताशुद्धीपर्यंतच्या या चित्रपटांतील एकेका दृश्यावरील उद्‌गारांतून किती तरी नाजुक भावना व्यक्त होतात. सीतेला मनःसंतापकारी होतील अशा चित्रांचें वर्णन लक्ष्मणानें सुरू केलें कीं राम कुशलतेनें चटकन् दुसऱ्या चित्राकडे तिचें लक्ष वळवितो. त्या चित्र-पटांतील जें जें चित्र सीतेला सुखदायक वाटेल त्याच्यावरच तिचें लक्ष खेचून इतर चित्रांवरून चटकन् पुढें जाण्यांत रामाचा सीतेच्या भावनांविषयींचा जो मधुर आदर दिसून येतो, तो लक्ष्मणाच्या सरळसोटपणामुळें विशेषच लक्षांत भरतो. सीतेला दुःखकारक होतील त्याच चित्रांवरून नव्हे, तर स्वतःची प्रशंसा ज्यांत आहे अशाहि चित्रांवरून चटकन् पुढें जाण्यांत रामाचा जो सहज विनय पदोपदीं दिसून येतो तो हृद्य आहे.

दण्डकारण्यांतील एकेका स्थानाचें चित्र पाहतां पाहतां राम व सीता आपल्या त्या काळांतील प्रेमाच्या ज्या मधुर स्मृति काढतात त्यांचें नाजुक चित्र

किमपि किमपि मन्दं मन्दमासक्तियोगात्
अविरलितकपोलं जल्पतोरक्रमेण ।
अशिथिलपरिरम्भव्यापृतैकैकदोष्णो-
रविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ॥

'परस्पर प्रेमातिशयामुळें आपण गाढ आलिंगनांत असतां, मंदमंद स्वरांत, कांहींतरी बोलत असूं, तेव्हां सारी रात्र संपून जाई. पण आपल्या मधुर गुजगोष्टी कांहीं संपत नव्हत्या.'

या सुप्रसिद्ध श्लोकांत पाहण्यास सांपडतें. यापुढें मात्र सीताहरण व रामशोक यांचेंच चित्रण आल्यामुळें जणुं तो वियोग पुन्हा मूर्तरूपानें आला आहे अशा भावनेनें सीता व राम दोघे व्यथित होतात. त्यामुळें चित्रपटदर्शन येथेंच थांबविलें जातें. पण दण्डकारण्यांतील तीं जुनीं दृश्यें पाहून पुन्हां एकदां अरण्यांत जाऊन थोडें रहावें अशी इच्छा सीतेला उत्पन्न होते व तिचे डोहाळे तत्काळ पुरविण्याची गुरुजनांची आज्ञा असल्यामुळें 'अरण्यांत जाण्यासाठीं चांगला रथ आण' असें राम लक्ष्मणास सांगतो.

लक्ष्मण बाहेर जातांच दमलेली सीता विश्रांति घेण्यासाठीं जवळपास कांहीं स्थान आहे का हें शोधते. तेव्हां 'माझ्याच बाहूंचा उशी म्हणून उपयोग करून झोंप घे' असें राम सुचवितो. त्या वेळचा उभयतांचा संवाद म्हणजे उत्कट व शुद्ध दांपत्यप्रीतीचा एक उत्कृष्ट नमुनाच होय. रामाच्या हृदयावर डोकें टेकतांच सीतेला झोप लागते आणि तेवढ्यांतच, वेष पालटून लोकांत बातमी गोळा करण्यास पाठविलेला दुर्मुख सीतेविषयीं लोकांत काय अपवाद पसरला आहे हें सांगतो आणि वज्राघात झाल्याप्रमाणें राम मूर्च्छित पडतो. उदात्तमधुर दांपत्यप्रीतीच्या आविष्कारावर अशा तऱ्हेनें असा अचानक आघात होतो. सीताप्रेमानें मन संपूर्णतया भरलेलें असतांहि लोकाराधनेसाठीं सीतात्याग करण्याचा निश्चय राम करतो. जिच्या पावित्र्यानें सारें जग पवित्र बनलें अशी रामाची खात्री, त्याच सीतेच्या पावित्र्याविषयीं शंका घेणारे उद्गार त्याला ऐकून घ्यावे लागतात. सीतेविषयींच्या प्रीतीचा अथांग सागर हृदयांत उचंबळत असतां, सीतेच्या पावित्र्याबद्दलच्या श्रद्धेनें मन पुरेपूर भरलें असतांच, राजाच्या कर्तव्यकठोरतेनें सीतेचा त्याग करण्याचा निश्चय राम करतो. या वेळचीं त्याच्या मनाचीं आंदोलनें कवीनें इतक्या हळुवारपणें रेखाटलीं आहेत की, गर्भवती सीतेला वनांत सोडून देण्याची आज्ञा करीत असतांहि रामाचा राग न येतां त्याच्याविषयीं अतीव सहानुभूतीनेंच मन भरून जातें.

रामचरित्राचा हा सीतात्यागापासून प्रारंभ होणारा भाग निवडतांना आपण केवढ्या मोठ्या साहसाला हात घातला आहे, याची भवभूतीला पुरेपूर कल्पना असावी. आणि म्हणूनच रामाचें धीरोदात्तत्व आणि सीतेविषयींची त्याची अनिर्वचनीय प्रीति यांना थोडासाहि धक्का न लागतां सीतात्यागाचा

निश्चय रामाच्या मुखानें त्याला वदवायचा होता. अत्यंत प्रेमळ पति व पत्नीविषयीं अत्यंत श्रद्धा व आदर बाळगणारा एक अतिशय सुसंस्कृत मानव हा रामचरित्रांतला आविष्कार करतांकरतांच एक आदर्श राजा, प्रजेच्या मताला मान देणारा लोकशाही वृत्तीचा राजा, अशा तऱ्हेचाहि आविष्कार भवभूतीला साधायचा होता. आणि या दोन्ही आविष्कारांतील घटना व भावना परस्परांवर आघात करीत असतांहि त्यांतून रामचंद्राच्या अपूर्व व्यक्तिमत्त्वाची संगति साधायची होती. या प्रयत्नांत भवभूति किती सफल झाला आहे हें पहिल्या अंकांतील रामचंद्राच्या वाक्यावाक्यावरून व भावनोद्रेकांवरून प्रत्ययास येतें. अतिशय प्रेमळ व सुसंस्कृत पति या नात्यानें रामाच्या व्यक्तित्वाचे आविष्कार वर थोडे दिले आहेत. पण उत्तम प्रजापालन करणारा प्रजानुराधी राजा या दृष्टीनेंहि पहिल्या अंकांतलें रामाचें वर्तन अतिशय स्पृहणीय आहे. सीतात्यागाचा कठोरतम व स्वतःस अति दुःखदतम निश्चय करतांच राम दूताला—दुर्मुखाला म्हणतो, ‘ लक्ष्मणाला सांग, हा तुझा नवीन राजा तुला पुढीलप्रमाणें आज्ञा करीत आहे. ’ यापुढील निरोप दुर्मुखाच्या कानांत सांगितला जातो. तो ऐकतांच दुःखी झालेला दुर्मुख साहजिकच उद्‌गारतो, ‘ अग्निशुद्ध झालेल्या व गर्भवती असलेल्या सीतादेवीच्या बाबतींत दुर्जनांच्या उद्‌गारांवरून महाराजांनीं हें काय अनार्य कृत्य करायचें ठरविलें आहे ! ’— राजा रामचंद्र उत्तर देतो, ‘ शांत हो. राज्यांतले नागरिक हे काय दुर्जन आहेत ? सीताशुद्धीचा जो अद्‌भुत चमत्कार घडला, तो येथून फार दूर अशा लंकेंत. तेव्हां बिचारे पौरजन त्यावर कसा विश्वास ठेवतील ? ’— रामाचें हें सडेतोड उत्तर ऐकतांच दुर्मुख निघून जातो. आणि त्याची पाठ वळतांच राम उद्‌गारतो, ‘ केवढें भयंकर काम करण्यास मी प्रवृत्त झालों आहें ! बालपणापासून माझ्या प्रेमळ वर्तनावरच जिचें हृदय पोसलें गेलें, परस्परप्रीतीमुळें जी मला कधींहि विसंबली नाहीं, तिला फसवून आज मी एखाद्या खाटकाप्रमाणें मृत्यूच्या जबड्यांत लोटीत आहें. तेव्हां माझ्यासारख्या पातक्यानें या पवित्र देवीला स्पर्शहि करणें योग्य नव्हे. ’—असें म्हणून निद्रित सीतेचें मस्तक तो आपल्या हृदयावरून हळूच खालीं ठेवतो. तें खालीं ठेवून उठतांच रामाच्या तोंडून नकळतच उद्‌गार निघतात, ‘ अरेरे, साऱ्या जगताचीच उलटापालट झाली आहे.

अरण्यासारखेंच हें जग आतां शून्य भासत आहे. आतां हें शरीर केवळ कष्टांसाठींच जगणार.—पण आतां दुसरें काय करणें शक्य आहे ? '—याप्रमाणें आंतल्या असह्य शोकाला वाट देऊन राम सीतेच्या चरणांना वंदन करतो व अश्रुपूरित नयनांनीं तिच्याकडे पाहत निघून जातो.——रामाचें कार्य संपलें.

राम निघून जातांच सीता जागी होते आणि राम तेथें नाहीं हें पाहून दुःखित होते. ' मला निजलेली टाकून आर्यपुत्र निघून गेले. तेव्हां आतां भेटतांच मी त्यांच्यावर रागावणार आहें. पण त्यांचें दर्शन होतांच माझ्यावर माझा ताबा राहिला तरच हें शक्य आहे. '——यदितं प्रेक्षमाणात्मनः प्रभविष्यामि——साध्या साध्या वाक्यांतूनहि रामसीतेचें एकमेकांवरील प्रेम कुशलतेनें सूचित करण्यांत भवभूतीचा हातखंडा आहे.—— सीतेचे उद्गार कानीं पडतात तोंच रथ तयार असल्याचा निरोप येतो. अरण्यांचें व आश्रमांचें एकदां पुन्हां दर्शन घेण्याची इच्छा सीतेनें व्यक्त केल्यामुळें दोघांनीं मिळून कांहीं काळ वनांत जाण्याकरितां रामानें रथ सज्ज ठेवण्याची आज्ञा केली होती. त्यासाठींच रथ आला आहे या कल्पनेनें सीता आनंदानें व संतोषानें रथाकडे जाते. पण तिला फसवून मृत्यूकडे नेणारा तोच रथ असतो हें तिला कसें माहीत असणार ? मात्र प्रेक्षकांना हें माहीत झालेलें असतें. त्यामुळें सीतेचें हें आनंदानें व उत्सुकतेनें रथाकडे जाणें त्यांना तिच्या मृत्यूचीच सूचना देतें. पवित्र-हृदया, कठोरगर्भा, राममय-जीविता अशा सीतेच्या दोहदपूर्तीच्या आनंदाच्या नाजुक पार्श्वभूमीवर, सीतेला मृत्यूकडे नेणाऱ्या रथाचें आगमन सुचवून भवभूतीनें केवढा भयंकर व करुणाजनक विरोध साधला आहे !

आपल्या नाटकाचा नायक जो रामचंद्र त्याच्या चरित्रांतील अत्यंत दोषपूर्ण अशा घटनेपासून नाटकाचा प्रारंभ करण्यांत भवभूतीनें जें साहस आरंभिलें, तें त्यानें केवढ्या सफलतेनें पूर्ण करून दाखविलें आहे, हें पहिल्या अंकाच्या शेवटीं पूर्णपणें प्रत्ययास येतें. गर्भवती व निर्दोष सीतेच्या त्यागाचें रामचंद्राचें कृत्य कमींत कमी सदोष व जास्तींत जास्त समर्थनीय करण्यासाठीं अनेक कुशल उपायांचा भवभूतीनें अवलंब केला आहे. रावणानें सीतेचें हरण करतांच सीतावियोगामुळें अत्यंत दुःखित होणारा हा प्रेमळ पति आपल्या प्रियतम गर्भवती पत्नीला अरण्यांत टाकून देण्यास

कां प्रवृत्त होतो हें दाखविण्यासाठीं, राजा या नात्यानें रामचंद्राच्या वृत्तीचें व कर्तव्याचें नाटकारंभापासूनच सूचन केलें आहे. नुकताच राज्याभिषेक झालेला आहे; राजा या नात्यानें पडलेलीं कामें धर्मासनावर उरकून रामचद्र सीतेच्या सांत्वनासाठीं महालांत प्रवेश करीत आहे; ऋष्यशृंगाच्या द्वादश-वार्षिक यज्ञासाठीं कौसल्यादि सर्व माता आणि वसिष्ठ-अरुंधति हे गुरुजन अयोध्या सोडून दूर गेले आहेत; वसिष्ठांकडून रामचंद्राला संदेश येतो तोहि असाच : ' येथील यज्ञामुळें आम्ही गुंतलों आहोंत. तूं अजून तरुण आहेस राज्य तर तुला नवें आहे. तेव्हां प्रजानुरंजनासाठीं जें योग्य वाटेल तेंच कर. कारण त्यांतून निर्माण होणारें जें यश तेंच तुझें परम धन आहे. '

दुर्मुख नामक दूत जेव्हां लोकमनांतील सीतेविषयींचा आक्षेप निवेदन करतो, तेव्हां प्रजानुरंजनाचें कठोर कर्तव्यपालन करण्यासाठीं ' सीतेचाहि त्याग करतांना मला दुःख होणार नाहीं ' हे थोड्या वेळापूर्वींच काढलेले उद्‌गार त्याला लोकांना जाहीर रीत्या दिलेल्या वचनाप्रमाणेंच वाटतात. वचनपालनासाठीं आपल्या पित्यानें—दशरथानें प्राणप्रिय रामाचा त्याग करणेंहि आपलें कर्तव्य मानलें ही गोष्ट तो कसा विसरूं शकणार ? त्यांतून लोकापवादाचें निराकरण करण्यासाठीं दुसरा कांहींतरी मार्ग सुचवूं शकणारे सर्व गुरुजनहि ऋष्यशृंगाच्या आश्रमांत गेलेले दाखविले आहेत. आपल्या घराण्याचा एकवचनी बाणा, नव्यानेंच शिरावर पडलेलें राजा या नात्याचें कर्तव्य, गुरुजनांची अनुपस्थिति या सर्व कारणांमुळें रामचंद्राचा सीतात्यागाचा निश्चय अतिशय दुःखदायी असला, तरी साहजिकच वाटतो. आणि सीतेच्या भावनांचा आदर व तिच्या सुखाची काळजी ही रामचंद्राच्या लहान लहान वाक्यांतूनहि इतकी उत्कटपणें व हळुवारपणें व्यक्त केली गेली आहे कीं, सीतात्यागाचा निर्णय घेतांना रामचंद्रानें सर्वांत जास्त कोणावर आघात केला असेल तर तो स्वतःवरच, हें मनाला पुरेपूर पटतें.

एक गोष्ट मात्र भवभूतीनें मुद्दामच पुढील अंकासाठीं राखून ठेवली आहे. आपल्या दोहदपूर्तीसाठीं प्रेमानें पाठविलेल्या रथांत आतां आपण चाललों आहोंत, या भावनेनें निघालेल्या सीतेच्या हृदयावर केवढा वज्राघात होईल ही आशंका प्रेक्षकांत निर्माण करून पहिला अंक संपतो.

○ ○ ○

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम ............ दि: ..........
क्रमांक ............ नों दि ..........

# अंक दुसरा

## पंचवटी-प्रवेश

दुसऱ्या अंकाला प्रारंभ होतो, तेव्हां पहिल्या अंकांतील घटनेला बारा वर्षें लोटलेलीं असतात. या दीर्घ कालांत सीतेचें काय झालें, ती प्रसूत झाल्यानंतर तिच्या मुलांचें काय झालें व रामाचें जीवन कसें चाललें आहे हें जाणण्याची प्रेक्षकांची उत्सुकता भवभूति मोठ्या कुशलतेनें पूर्ण करतो. वाल्मीकींच्या आश्रमांतून अगस्त्य ऋषींच्या आश्रमाकडे येणाऱ्या आत्रेयी नामक तापसीच्या व अगस्त्य ऋषींच्या आश्रमाजवळील दण्डकारण्यांत राहणाऱ्या वासंती नामक वनदेवतेच्या संवादांतून या मधल्या बारा वर्षांच्या काळांतील घटनांचें दिग्दर्शन केलें जातें. फलकुसुमांनीं आत्रेयीचें स्वागत करून वासंती तिला आगमनाचें प्रयोजन विचारते. 'येथें अगस्त्यादि अनेक विद्वान् ऋषि आहेत, तेव्हां त्यांच्याकडून वेदविद्या पठन करण्यासाठीं वाल्मीकींच्या आश्रमांतून मी येथें आलें आहें' असें ती उत्तर देते. वाल्मीकींसारख्याच्या आश्रमांतून वेदविद्या शिकण्यासाठीं आत्रेयीनें येथें यावें हें साहजिकच वासंतीला आश्चर्यकारक वाटतें. तेव्हां आत्रेयी सांगते, 'तेथें कोण्या एका देवतेनें अंगावरून तोडलेलीं दोन प्रभावशाली व अद्‌भुत अशीं जुळीं मुलें आणून दिलीं होतीं. तीं जरा मोठीं होतांच त्यांना वेदत्रयी सोडून सर्व विद्या वाल्मीकींनीं शिकविल्या. आणि अकरा वर्षें पूर्ण होतांच वेदत्रयीहि त्यांना शिकविली. तीं मुलें इतकीं बुद्धिमान् आहेत कीं, त्यांच्याबरोबर शिकणें आमच्यासारख्यांना अशक्य होतें. तेव्हां आतां दुसरीकडेच शिकण्यास जावें असें मीं ठरविलें.

**वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे**
**न तु खलु तयोर्ज्ञाने शक्तिं करोत्यपहन्ति वा**
**भवतिच तयोर्भूयान्भेदः फलं प्रति तद्यथा**
**प्रभवति शुचिर्बिंबग्राहे मणिर्न मृदादयः ॥**

'कारण गुरु तैलबुद्धि व जडबुद्धि शिष्याला सारखीच विद्या देतो. पण तो त्यांना ग्रहणशक्ति देतहि नाहीं व काढूनहि घेत नाहीं. दोघांच्या बाबतींतील

यज्ञामध्ये मात्र फार फरक दिसून येतो. कारण निर्मल रत्न हें प्रतिबिंब ग्रहण करण्यास सहज समर्थ असतें. मातीच्या ढेकळांत ही समर्थता असणेंच शक्य नाहीं.'

शिवाय वाल्मीकि ऋषीहि आणखी एका महान् कार्यांत गुंतले आहेत. क्रौंचवधामुळें जेव्हां त्यांना पहिल्या प्रथम अनुष्टुभ् छंदांत काव्य स्फुरलें तेव्हां भगवान ब्रह्मदेवानें त्यांना रामचरिताची काव्यरचना करण्याची विनंती केली. तीस अनुसरून रामायणाची काव्यरचना करण्यांत भगवान् वाल्मीकि मग्न आहेत. त्यामुळें त्यांना अध्यापनकार्य करण्यास वेळच नाहीं.' आत्रेयीच्या मुखानें याप्रमाणें कुश-लवांच्या बुद्धीची व अलौकिक प्रभावाची सूचना करूनच रामायणाचें सूतोवाचहि केलें जातें. पण सीतेचें काय झालें हा प्रश्न प्रेक्षकांसमोर उभा असतोच.

वासंतीनें विचारलेला सगळा वृत्तांत सांगितल्यावर आत्रेयी अगस्त्य ऋषींच्या आश्रमाचा मार्ग विचारते. 'येथें पंचवटींतून पुढें जाऊन गोदावरीच्या तीरातीरानें जावें' असें वासंती म्हणतांच, सीतेची आठवण होऊन 'हे वत्से जानकि, हें जनस्थान पाहून तूं नामशेष झालीस तरी समोर उभी आहेस असेंच वाटतें' असे उद्‌गार आत्रेयी काढते. तिचा तो 'नामशेष' शब्द ऐकतांच वासंती चमकते. सीतेचें कांहीं बरेंवाईट झालें का? असें ती भीतीनें विचारते. आणि तिच्या कानांत सीतेच्या त्यागाचें तें हृदयविदारी वृत्त आत्रेयी सांगते. सीतेची प्रियसखी वासंती तें ऐकतांच मूर्छित होते.

मूर्छेतून उठल्यावर सीतेचें त्या अरण्यांत काय झालें असें ती आत्रेयीला विचारते. परंतु नंतर सीतेची कांहींच वार्ता आपणांस नाहीं असें सांगून ती सीतावृत्तांताबद्दल प्रेक्षकांचें कुतूहल तसेंच जागृत ठेवते. राममाता व वसिष्ठ-अरुंधत्यादि गुरुजन असतांना रामानें हें कसें केलें? या वासंतीच्या प्रश्नाला, ते सारे ऋष्यशृंगाच्या यज्ञासाठीं आश्रमांत गेले होते, त्यांच्यामागेंच हें झालें असें आत्रेयी सांगते. मात्र आतां बारा वर्षें झाल्यामुळें व तो यज्ञ संपल्यामुळें परत अयोध्येला जाण्याऐवजीं 'वधूविरहित अयोध्येला' आम्ही जाणार नाहीं असा आपला निश्चय जाहीर करून अरुंधतीनें व राममातांनीं वाल्मीकि-तपोवनांत जाण्याचें ठरविलें आहे, ही एक वार्ता आत्रेयी सांगते. रामानें केलेल्या सीतात्यागाचा पुरेपूर निषेध या अरुंधतीच्या व

राम-मातांच्या निश्चयाच्या रूपानें किती सहजपणें सुचविला आहे ! वसिष्ठ, अरुंधती व राममाता यांचा सीतेवर केवढा जीव होता व सीतेच्या पावित्र्यावर त्यांची केवढी श्रद्धा होती हें त्यांच्या या नव्या निश्चयावरून कुणालाहि कळून येतें.

रामानें निर्दोष सीतेचा केलेला त्याग जास्तींत जास्त समर्थनीय करण्यासाठीं पहिला अंक खर्ची पडला. आणि दुसऱ्या अंकांत मात्र त्याच्या गुरुजनांकडून व प्रत्यक्ष मातांकडून सीतात्यागाचा निषेध सुचविला हें प्रथम विरोधात्मक वाटतें. पण हा विरोधाभासच आहे हें चटकन् दिसून येतें. रामचरित्राची उदात्तता अधिक प्रकर्षानें प्रकट करण्याचेंच हें साधन आहे. वासंती रामाविषयीं आत्रेयीला अधिक प्रश्न विचारते. त्यांचा हा लहानसा संवाद अतिशय सूचक आहे.

**वासंती** : आतां तो राजा ( रामचंद्र म्हणत नाहीं ) काय करीत असतो ?

**आत्रेयी** : त्यानें नुकताच अश्वमेध यज्ञाला प्रारंभ केला आहे.

**वासंती** : धिक्कार असो त्याला. त्यानें लग्नहि केलें हं ? ( या यज्ञाला पत्नीची आवश्यकता असते व सीतेचा तर त्याग केलेला. )

**आत्रेयी** : छे छे. भलतेंच. लग्न मुळींच केलें नाहीं.

**वासंती** : मग यज्ञांत सहधर्मचारिणी कोणती आहे ?

**आत्रेयी** : सीतेची सुवर्णमूर्ति !

**वासंती** : ( सद्गदित कंठानें )

**वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।**
**लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातुमर्हति ।।**

‘ खरोखर, लोकोत्तर पुरुषांचीं मनें वज्रापेक्षांहि कठोर पण कुसुमाहूनहि कोमल असतात ! कुणाला त्यांचा ठाव लागणार ? ’

रामचंद्रानें राजा या नात्यानें सर्व कर्तव्यें चालविलीं आहेत हें दर्शवितांना सीतात्यागाला बारा वर्षें झाल्यावरहि दुसरा विवाह न करतां सीतेची सुवर्णमूर्ति करून तो अश्वमेध यज्ञ प्रारंभितो हें दाखविण्यांत राजकर्तव्याची कठोरता आणि पत्नीप्रेमाची कुसुमकोमलता यांचा अति सुंदर समन्वय या ठिकाणीं साधला आहे.

अश्वमेध यज्ञासाठीं रामानें अश्व सोडला आहे व त्याच्या रक्षणासाठीं लक्ष्मणपुत्र चंद्रकेतु हा सुसज्ज सेनेसह पाठविला आहे, ही माहिती आत्रेयी वासंतीला देते. प्रियसखी सीता गेली, तिच्याबरोबर तिची संततीहि नाहींशी झाली. पण निदान लक्ष्मणाचा पुत्र चंद्रकेतु हा मोठा होऊन मेध्य अश्वाचें रक्षण करण्याइतका तो पराक्रमी झाला आहे हें वृत्त ऐकून वासंती थोडी उल्हसित होते. इतक्यांत दुसरा एक वृत्तांत आत्रेयी सांगते. आपला मृतपुत्र बरोबर घेऊन ' अब्रह्मण्यम् ' असें म्हणत एक ब्राह्मण राजद्वारीं आला आणि रामराज्यांत कांहीं तरी अनाचार झाल्यामुळेंच माझ्या पुत्राचा अकालमृत्यु झाला, असें तो सांगू लागला. इतक्यांत आकाशवाणी झाली आणि तिनें सांगितलें कीं, ' शंबूक नांवाचा शूद्र पृथ्वीवर तप करीत आहे. तेव्हां रामा, त्याचा शीर्षच्छेद करून या ब्राह्मणपुत्राला वाचव. '—या दैवी आज्ञेप्रमाणें विमानांत बसून शंबूकाला शोधण्यासाठीं राम पृथ्वीवर संचार करीत आहे, असें आत्रेयी सांगते. हा तपश्चरण करणारा शंबूक याच जनस्थानांत आहे तेव्हां त्याच्या निमित्तानें पुन्हा या स्थानाला रामभद्राच्या दर्शनाचा लाभ होणार असें वासंती म्हणते. रामानें सीतात्याग केला तरी सीतेचें चिंतन करीतच तो दिवस काढीत आहे याची खात्री पटल्यामुळें वासंती या ठिकाणीं रामाचा उल्लेख ' राजा ' या शब्दानें न करतां रामभद्र या प्रेमळ शब्दानें करते, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

आत्रेयी–वासंतीच्या या संवादांतून बारा वर्षांतील रामसीतेचा वृत्तांत सांगितला आहे व रामचंद्राचें दण्डकारण्यांतील भावी आगमन सूचित केलें आहे. या परिचयप्रवेशानंतर पुष्पक विमानाजवळ असलेला, तरवार उपसलेला रामचंद्र प्रवेश करतो. ज्या दक्षिण हस्तानें तो तरवार उपसतो, त्याला उद्देशून येथें जे उद्गार तो काढतो, ते हृदयाचा ठाव घेणारे आहेत. सीतात्यागानंतर बारा वर्षांनीं राम प्रथमच प्रेक्षकांच्या दृष्टीस पडतो. तेव्हां बारा वर्षांतील त्याच्या हृदयाचीं आंदोलनें व्यक्त करण्यासाठीं भवभूतीनें जे उद्गार त्याच्या मुखानें वदविले आहेत, ते खरोखर आजहि हृदयाला भेदून टाकणारे वाटतात. ब्राह्मणपुत्र अकालीं मेला तेव्हां राज्यांत अनाचार माजला असला पाहिजे आणि तो अनाचार नाहींसा करण्यास राजानें सदैव सज्ज राहिलें पाहिजे, हा त्या काळचा दण्डक. त्याचप्रमाणें तप करण्याचा

अधिकार फक्त उच्च वर्णांना आणि शंबूक नांवाच्या शूद्रानें तप आरंभिलें तेव्हां या अनधिकार चेष्टेबद्दल राजानें त्याचा शीर्षच्छेद केला पाहिजे हाहि दण्डक. सीतात्यागापासून कठोरांत कठोर असें राजकर्तव्य करण्याचें व्रत रामानें पाळलें होतें. तेव्हां त्याच व्रताला अनुसरून शंबूकाचाहि वध करणें रामाला राजा या नात्यानें प्राप्त होतें.

पण हृदयाची भावना, मनुष्य या नात्यानें दिसणारा न्याय आणि राजा या नात्यानें करावें लागणारें कर्तव्य या दोन गोष्टींतील विरोध रामचंद्राला सीतात्यागाच्या वेळीं अत्यंत उत्कटतेनें जाणवलेला दाखविला आहे आणि शंबूकवधासाठीं बारा वर्षांनीं दण्डकारण्यांत रामानें प्रवेश केला, त्यावेळींहि हा विरोध त्याला तेवढ्याच तीव्रतेनें जाणवत आहे हें दाखविलें आहे. तरवार उपसलेल्या आपल्या दक्षिण हस्ताला उद्देशून राम म्हणतो,

**हे हस्त दक्षिण ! मृतस्य शिशोर्द्विजस्य**
**जीवातवे विसृज शूद्रमुनौ कृपाणम् ।**
**रामस्य गात्रमसि निर्भरगर्भखिन्न–**
**सीताविवासनपटोः करुणा कुतस्ते ॥**

‘ हे दक्षिण हस्त, मृत द्विजपुत्राला जिवंत करण्यासाठीं या शूद्रमुनीवर आपल्या तरवारीचा घाव घाल. तुला कठीण वाटण्यासारखें यांत कांहींच नाहीं. कारण तूं रामाचा हात आहेस. प्रसूतीचे दिवस भरत आल्यामुळें गर्भभारानें थकलेल्या अशा सीतेचा अरण्यांत त्याग करण्यांत तूं पक्का तयार झाला आहेस. तेव्हां तुझ्यांत दयेमायेचा लेश तरी असणें संभवतें का ?— ’

मानव या नात्यानें अत्यंत निर्घृण व अन्यायी असें कृत्य पूर्वी केल्याबद्दल व सध्यां करीत असल्याबद्दल स्वतःचा केवढा विलक्षण उपहास रामानें या उद्‌गारांत केला आहे !

एवढें बोलून राम शूद्रकावर तरवारीचा प्रहार करतो आणि लागलीच पुन्हा आपल्या हाताला उद्देशून म्हणतो, ‘ रामाला साजेसें कृत्य केलेंस. आतां तरी तो ब्राह्मणपुत्र जिवंत होवो बिचारा ! ’—राजा या नात्यानें कठोर कर्तव्यपालन करीत असतांहि मानव या नात्यानें न्याय व परआदर

यांच्याविषयींचीं मूल्यें रामाच्या मनांत पूर्ववत्च कायम होतीं हें भवभूतीनें केवढ्या कौशल्यानें येथें सूचित केलें आहे !

यानंतर नुकत्याच मारलेल्या शंबूकाचा दिव्यपुरुष होऊन तो रामाला धन्यवाद देतांना दाखविला आहे. 'आपल्या या कृत्यामुळें तो ब्राह्मणपुत्रहि जिवंत झाला आहे आणि आपल्या हातून मृत्यु आल्यामुळें मलाहि दिव्य-लोक प्राप्त झाला आहे' असें तो दिव्यपुरुष सांगतो. तें ऐकतांच रामाच्या मनावरील भार हलका होतो. 'आपल्या उग्र तपामुळें तूं जें पुण्य संपादन केलें आहेस त्यामुळें तुला उत्तम लोक प्राप्त होवो' असा आशीर्वाद राम त्यास देतो. शूद्र शंबूकानें केलेलें उग्र तप रामाला राजा या नात्यानें दण्डनीय समजावें लागलें, तरी तो दण्ड दिल्यानंतर एक न्यायी मानव या नात्यानें राम त्या उग्र तपाबद्दल शंबूकाची प्रशंसाच करतो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आजच्या या विसाव्या शतकांतहि शोभून दिसावी अशी ही रामाची वृत्ति आहे. भवभूतीचें हें उत्तररामचरित आठव्या शतकांत लिहिलें गेल्याचें सर्वमान्य आहे म्हणून बरें. नाहींतर या शतकांतच हें नाटक रचलें गेलें म्हणूनच शूद्रांविषयींचे इतके न्यायी उद्गार यांत घातले आहेत असें सहज कोणी म्हणूं शकलें असतें.

'तुझ्या उग्र तपाच्या सुफलाचा तूं आतां पुण्यलोकांत वास करून उपभोग घे.' असें रामानें म्हणतांच 'माझ्या तपाचा हा महिमा नाहीं. हा आपलाच प्रसाद आहे. बाकी माझ्या तपाचाहि खरोखर मजवर उपकारच झाला आहे. कारण नाहींतर मला शोधत आपण अयोध्येहून शेंकडों योजनें दूर अशा या दण्डकारण्यांत कशाला आलां असतां!' असें उत्तर शंबूक देतो व आपल्या पूर्वींच्या वनवासकालांतील निवासाजवळच आपण आलां आहांत असें जणूं रामाला सुचवितो. आपण दण्डकेंत आल्याचें ऐकतांच रामचंद्र चकित दृष्टीनें पाहूं लागतो. दण्डकारण्यांतील ते अरण्याचे परिचित विभाग दृष्टीस पडतांच रामचंद्राचें मन क्षणभर त्यावर खिळून जातें. इतक्यांत माहिती सांगण्याच्या ओघांत 'हा दण्डकेंतील जनस्थानाचा भाग आहे' असें शंबूक सांगतो. त्याबरोबर सीतेच्या आठवणीनें रामाचें हृदय उचंबळून येतें. 'मधुगंधी वनामध्यें मी तुमच्याबरोबर राहीन' असें म्हणून सीतेनें वनवासांतील काळ कसा सुखानें काढला याची रामाला एकदम

आठवण होते. त्यावेळच्या प्रीतिपूर्ण जीवनाचें स्मरण करीत रामाच्या तोंडून प्रीतिजीवनाचें इतकें सहजसुंदर वर्णन बाहेर पडतें !

**न किंचिदपि कुर्वाणः सौख्यैर्दुःखान्यपोहति ।**
**तत्तस्य किमपि द्रव्यं योहि यस्य प्रियो जनः ॥**

' कांहींहि न करतां सहजगत्या निर्माण होणाऱ्या सुखांनीं प्रिय व्यक्ति हीं दु:खें नाहींशीं करीत राहते. खरोखर, ज्याची जी प्रियतम व्यक्ति असते ती म्हणजे त्याचा केवढा अवर्णनीय ठेवा असतो ! '

पूर्वस्मृतींनीं रामचंद्र दुःखित झालेला पाहतांच शंबूक त्याचें लक्ष अरण्यांतील कांहीं सुंदर स्थलांकडे आकर्षिण्याचा प्रयत्न करतो. आपले अश्रु आवरून रामचंद्र शंबूकाचा निरोप घेतो. पण ' पुण्यलोकाप्रत जा ' असा आशीर्वाद देऊनच निरोप घेतो. ' अगस्तिऋषींना प्रणाम करून मी शाश्वत-पदास जाईन. ' असें सांगून शंबूक जातो.

जनस्थानांतील त्या पूर्वपरिचित, सहस्रावधि विस्रंभसाक्षी स्थलांमध्यें एकटा रामचंद्र उरतो. राजधानींत राजकठोर कर्तव्यामध्यें अष्टौप्रहर मनाला गुंतवून ठेवल्यामुळें सीतावियोगाचें जें दुःख त्यानें खोलखोल दडवून ठेवलेलें असतें, तें आतां एकदम वर उसळून येतें. त्या काळचे ते मधुर प्रसंग राम-चंद्राच्या नजरेसमोर पुन्हां नाचूं लागतात. प्रियतमा सीता, तिची प्रियसखी वासंती या सर्वांचें स्मरण करीत करीत तो एकदम स्वत:कडे वळतो. ' एखादा तीव्र विषरस जणूं वेगानें हृदयांत पसरावा, जें शल्यशकल हृदयांत रुतून बसलें होतें तें हृदयाला जणूं पुन्हा वेगानें चिरीत राहावें, जुनी जखम जशी पुन्हा जोरानें वाहूं लागावी, त्याप्रमाणें आजवर दाटलेला शोक वेगानें उसळून येऊन नव्याप्रमाणेंच माझें हृदय विकल करीत आहे. '— शोकानें हृदय विकल झालें तरी पूर्वपरिचित प्रदेशांचें एकदां डोळांभरून दर्शन तरी घ्यावें या हेतूनें राम इकडे तिकडे पाहूं लागतो.

**यस्यां ते दिवसास्तया सह मया नीता यथा स्वे गृहे ।**
**यत्संबंधिकथाभिरेव सततं दीर्घाभिरास्थीयत ॥**
**एकः संप्रति नाशितप्रियतमस्तामद्य रामः कथम् ।**
**पापः पंचवटीं विलोकयतु वा गच्छत्वसंभाव्य वा ॥**

' ज्या पंचवटींत सीतेच्या सहवासांत मी जणूं घरच्याप्रमाणें सुखानें दिवस काढले, ती पंचवटी आतां या पापी रामानें – आपल्या प्रियतमेचा नाश करणाऱ्या रामानें पाहावी तरी कशी ? आणि न पाहतां जावें तरी कसें ? ' —आपण आपल्या प्रियतमेचा नाश केल्यामुळें पापी झालों आहोंत म्हणून पंचवटींतलीं हीं सुखकर स्थलेंसुद्धां पाहण्याचा आपल्याला अधिकार नाहीं असेंच राम सुचवीत आहे.

रामाच्या या शोकाला फारसा अवसर सांपडूं नये म्हणूनच कीं काय शंबूक पुन्हा प्रवेश करतो आणि भगवान् अगस्तींचा निरोप सांगतो : माझ्या तोंडून आपण येथें आल्याचें वर्तमान कळतांच भगवान् अगस्त्य म्हणाले कीं, ' विमानांतून उतरतांच आपलें स्वागत करण्यासाठीं लोपामुद्रा व सर्व महर्षि आपली वाट पाहत आहेत. तेव्हां आमचें स्वागत घेऊन आम्हांवर अनुग्रह करावा. आपल्या वेगवान् विमानानें आपण अयोध्येला लवकर पोहोंचून अश्वमेधासाठीं सज्ज होऊं शकाल. '

रामाची पंचवटीदर्शनाची इच्छा अशा तऱ्हेनें सहजच पुरी होऊं शकते. नाहींतर त्या कर्तव्यकठोर राजाला शंबूकवधाचें कार्य संपतांच तडक विमान वळवून अयोध्येला अश्वमेधयज्ञासाठीं जाणें प्राप्त झालें असतें. रामचंद्राच्या पंचवटींतील या अल्पकालीन वास्तव्याच्या आधारावरच उत्तररामचरितांतील अत्यंत करुणरम्य व हृदयस्पर्शी असा तिसरा अंक सजविला आहे.

० ० ०

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम....३५९०३....... वि: .....निबंध..
क्रमांक ......१५६६....... नों: दि: ..२०/२/६५

# अंक तिसरा

## छाया

करुणरसाचा परमोत्कर्ष आणि पतिपत्नीप्रेमाचे सखोल, प्रगाढ आणि नाजुक आविष्कार तिसऱ्या अंकांत पदोपदीं मन भारावून टाकतात आणि क्वचित्-विलोभून टाकतात. तिसऱ्या अंकाचा परिचय–प्रवेश जो विष्कंभक त्याचाच प्रारंभ मोठ्या कौशल्यानें आणि नाजुकपणानें केला आहे. तमसा आणि मुरला या दोन नद्यांच्या कुशल संवादांतून तिसऱ्या अंकाची पार्श्वभूमि तयार केली आहे. तमसा मुरलेला विचारते, 'एवढ्या लगबगीनें चाललीस तरी कुठें ?'

मुरला उत्तर देते : 'भगवान अगस्त्यपत्नी लोपामुद्रा हिनें गोदावरी नदीला एक निरोप सांगण्यास पाठविलें आहे. सीतात्यागानंतर बारा वर्षांनीं रामचंद्र प्रथमच दण्डकारण्यांतील पंचवटींत येत आहे. शोकानें त्याची अवस्था अगोदरच अनुकंपनीय झाली आहे. त्यांतून पंचवटींत त्याला पदोपदीं सीतासहवासांतील त्यावेळच्या स्थलांचें दर्शन घडेल आणि राजधानींत असतां परिस्थितीमुळें आवरलेला शोकक्षोभ येथें एकांतांत अनावर होऊन पुन:पुन्हां त्याला मूर्च्छा आणील. तेव्हां भगवति गोदावरी, अशा वेळीं आपल्या कमलसुवासित, शीतल तुषारांनीं रामभद्राला मूर्च्छेतून सावध कर.'

लोपामुद्रेनें दाखविलेलें दाक्षिण्य तिच्या वत्सलतेला साजेसेंच आहे असें म्हणून तमसा रामभद्राला मूर्च्छेतून सावध करण्याचा एक 'मौलिक उपाय' येथेंच उपस्थित आहे असें सांगते.

**परिपाण्डुदुर्बलकपोलसुंदरं
दधती विलोलकबरीकमाननम् ।
करुणस्य मूर्तिरथवा शरीरिणी
विरहव्यथेव वनमेति जानकी ॥**

'वेणींतून सुटलेले केस कपाळावर भुरभुरत असलेली, कृशतनु, पांडुवदना पण सुंदर आणि जणुं मूर्तिमंत विरहव्यथा अशी ही करुण मूर्ति जानकी या वनांत प्रवेश करीत आहे.'

मुरलेनें विचारतांच तमसा, सीतात्यागानंतरचें वृत्त प्रथमच प्रेक्षकांना सांगते :

'त्यागानंतर प्रसूतिवेदनांनीं व्याकुळ होऊन सीतेनें गंगेंत उडी घेतली. तिला जुळीं अपत्यें झालीं व भगवति भागीरथी व माता पृथ्वी या तिला मुलांसह पाताळांत घेऊन गेल्या. मुलें अंगावरून् तोडण्याइतकीं मोठीं होतांच गंगेनें स्वतः तीं मुलें भगवान वाल्मीकींच्या हातीं दिलीं व त्यांचें पोषण व शिक्षण करण्यास सांगितलें.'–हीं जुळीं मुलें वाल्मीकींच्या आश्रमांत आल्यानंतर त्यांनीं शिक्षणांत कसा पराक्रम गाजविला. इ. हकीगत आत्रेयीच्या मुखानें दुसऱ्या अंकांत सांगितली गेली आहेच. परंतु हीं मुलें कोणाचीं व सीतेचें काय झालें याबद्दल आतांपर्यंत प्रेक्षकांना कांहींच सांगण्यांत आलें नव्हतें. मुलें वाल्मीकि–आश्रमांत पाठविलीं आणि सीता पाताळांतच राहिली हें येथेंच समजतें.

शंबूकाच्या शोधार्थ रामचंद्र पंचवटींत जात आहे हें अयोध्येंतील शरयू नदीच्या मुखानें ऐकून भगवति भागीरथीला रामचंद्राबद्दल लोपामुद्रे-प्रमाणेंच काळजी वाटली. तेव्हां गोदावरीला भेटण्याचें निमित्त करून तिनें सीतेला बरोबर आणलें आहे. मात्र सीतेला तिनें असें सांगितलें कीं, 'कुश–लवांच्या बाराव्या वर्षाच्या वर्षगांठीचा उत्सव होणार आहे. तेव्हां या प्रसंगीं तुझ्या श्वशुरगृहींच्या आद्य पुरुषाची भगवान् सूर्यनारायणाची पुष्पसमर्पणानें पूजा करण्यासाठीं तूं चल. माझ्या प्रभावामुळें तूं वनदेवतांनाहि अदृश्य राहशील; मग मर्त्यांची गोष्ट तर बोलायलाच नको. तेव्हां तुला निर्भयपणानें संचार करतां येईल.'–रामाच्या आगमनाबद्दल सीतेला कांहींच कल्पना नसते. आणि ती अदृश्य राहणार असल्यामुळें रामचंद्रालाहि ती दिसणें अशक्य असतें. रामाला कांहींहि न दिसतां बारा वर्षांच्या त्यागाच्या शल्यानें दुःखित व अवमानित अशा सीतेला मात्र रामाचा प्रगाढ शोक दिसावा अशीच व्यवस्था या परिचय-प्रवेशानें करून ठेवली आहे.

यानंतर भगवान सूर्यनारायणाच्या पूजेसाठीं फुलें वेचण्यांत मग्न झालेली सीता प्रवेश करते. तिच्या प्रवेशापूर्वीं दुरूनच तिच्या करुण व शोकविकल मूर्तीचें वर्णन करतांना तमसा मुरलेला सांगते, 'जणूं करुणरसाची मूर्ति अथवा

93६८९

मनुष्यरूप धारण केलेली विरहव्यथाच अशी जानकी या वनांत प्रवेश करीत आहे.' इतक्यांत सीतेच्या कानीं दुरूनच शब्द पडतात 'प्रमादः प्रमादः'—कांहीं तरी आपत्ति कोसळत आहे आणि साह्यासाठीं याचना केली जात आहे. पूर्वीच्या वनवासाच्या कालांत जी वासंती नामक वनदेवता आपली प्रियसखी होती तिचाच हा आवाज हें सीता चटकन् ओळखते. वासंती पडद्यांतून सांगते, 'सीतादेवीनें कोवळीं पानें खाऊं घालून जो हत्तीचा छावा वाढविला तो आपल्या हत्तिणीसह क्रीडा करीत असतां एका उन्मत्त हत्तीनें त्याच्यावर हल्ला केला आहे. त्याला वांचवा.'—पंचवटीचें स्मरण करून देणारा प्रसंग व वासंतीचा आवाज ऐकतांच बारा वर्षांचें अंतर उल्लंघून सीतेचें मन वनवासकालांत जातें आणि ती सहजच उद्गारते, 'आर्यपुत्र, माझ्या मुलाला वांचवा.'—पण हे शब्द मुखांतून बाहेर पडतांच तिला सद्यःस्थितीची कटु जाणीव होते आणि रामचंद्राच्या आठवणीनें व शोकानें ती मूर्च्छित होते.

इतक्यांत पडद्यांतून शब्द ऐकूं येतात. 'विमानराज, येथेंच राहा.' त्या चिरपरिचित शब्दांनीं सीता एकदम मूर्च्छेंतून जागी होते. 'मेघासारखा गंभीर असा हा आवाज, माझ्या मृत कानांनाहि उत्सुक करणारा हा आवाज कुठून बरें येत आहे?' असें म्हणतच सीता उठून बसते. 'हा आर्यपुत्रांचाच शब्द आहे.' असें ती तमसेला चटकन् सांगते. 'शूद्र शंबूकाच्या वधासाठीं इक्ष्वाकुकुलोत्पन्न राजा या पंचवटींत आला आहे' असें तमसा आतांच प्रथम सीतेला सांगते. रामचंद्र असें न म्हणतां राजा हें संबोधन देण्यांत सीतात्यागाबद्दलचा राग तमसा व्यक्त करते, परंतु 'राजा आपला राजधर्म पाळीत आहे ही सुदैवाची गोष्ट आहे.' असें म्हणून सीता आपलें दुःख दृष्टीआड करून, आपल्या त्यागापासून जें राजधर्माचें पालन रामानें केलें तें अजून चालू आहे हें पाहून समाधानच व्यक्त करते. बारा वर्षांपूर्वीं त्या राजधर्मपालनाचाच शेवटचा आघात तिला माहीत होता आणि बारा वर्षांनंतर पुन्हा जें रामाचें दर्शन सीतेला होत होतें तें राजधर्मपालनाचेंच कठोर कृत्य करतांना. त्यामुळें त्यागाच्या दुःखानें व अवमानानें व्यथित झाली असतांहि निदान राजधर्मपालन तरी उत्तम चाललें आहे हें पाहून ती एक समाधानाचा निःश्वास सोडते.

इतक्यांत पडद्यांतून रामाचे शब्द ऐकूं येतात, ‘ प्रियेच्या सहवासांत जेथें वृक्ष व श्वापदें हेहि आमचे मित्र झाले तींच हीं गोदावरीकांठचीं अरण्यें आणि हे पर्वत ! ’—शब्दांच्या दिशेनें सीता दूरवर पाहते तों रामचंद्रच तिच्या दृष्टीस पडतो. ‘ प्रभातकालच्या फिक्कट चंद्राप्रमाणें दिसत असले, दुःखानें दुर्बल झालेले असले, तरी मुखावरील सौम्यतेमुळें व गांभीर्यामुळेंच आर्यपुत्र ओळखूं येत आहेत. केवढें माझें हें भाग्य ! ’—असें म्हणून सीता तमसेला बिलगून मूर्च्छित होते.—पडद्यांतून पुन्हा ऐकूं येतें, ‘ या पंचवटीच्या दर्शनानें आजवर हृदयांत धुमसत असलेला दुःखाग्नि जोरानें उसळण्यापूर्वी धुरानें जणूं मला मूर्च्छित करीत आहे. हे प्रिये जानकि ! ’—रामचंद्राच्या दुःखाचा हा स्फोट पाहतांच ‘ गुरुजनांना ज्याची भीति वाटत होती तेंच होत आहे, ’ असें तमसा म्हणते. आणि रामाचे ‘ हा प्रिये जानकि ! ’ हे कर्णमधुर शब्द कानीं पडल्यामुळेंच कीं काय, सीता मूर्च्छेतून जागी होते आणि पाहते तों दुःखानें रामचंद्र मूर्च्छित झालेला. ‘ हर हर, या मंदभागिनीचें नांव घेऊन आर्यपुत्र मूर्च्छित झाले. भगवति तमसे, आर्यपुत्रांना उठविण्यासाठीं कांहींतरी कर. ’ असें उद्गारून ती तमसेच्या पायां पडते. चटकन् तमसा उत्तर देते, ‘ हे कल्याणि, तूंच या जगत्पति रामचंद्राला जागा कर. तुझा करस्पर्श त्याला अत्यंत प्रिय आहे. ’ त्याबरोबर सीता रामचंद्राकडे जाते आणि पडदा उघडतांच हें दृश्य दिसतें. भूमीवर मूर्च्छित पडलेल्या रामचंद्राला साश्रुनयना सीता स्पर्श करीत आहे आणि त्या स्पर्शानें जागृत होऊन राम आनंदानें डोळे उघडीत आहे. ‘ जणूं त्रैलोक्याचा प्राणच पुन्हा परत आला आहे. ’ असे शब्द सीतेच्या आनंदित मुखांतून बाहेर पडतात. आणि तिकडे रामाची स्थिति तर सीतास्पर्शाच्या सुखानें अति उल्लसित झालेली असते. कशाच्या स्पर्शानें हा एवढा विलक्षण आनंद आपणांस होत आहे हें त्याला कळेनासें झालें होतें.

**आश्च्योतनं नु हरिचंदनपल्लवानां**
**निष्पीडितेंदुकरकंदलजो नु सेकः ।**
**आतप्तजीवितपुनःपरितर्पणोऽयं**
**संजीवनौषधिरसो हृदि नु प्रसिक्तः ॥**

'शीतल अशा हरिचंदन—पल्लवांचें आलेपन तर मला केलें नाहीं ना ? चंद्रकिरणांच्या नाजुक पानांचा रस तर कुणीं माझ्यावर शिंपडला नाहीं ? माझ्या तप्त जीवनाला शांत करणारा असा संजीवनीचा रस तर कुणीं माझ्यावर शिंपला नाहीं ना ? '—'छे, हा तो पूर्वपरिचित (सीतेचा) स्पर्शच आहे. मनाला समाधान देणारा आणि हृदयाला संजीवन देणारा तोच स्पर्श आहे. दुःखक्षोभामुळें आलेली मूर्च्छा या स्पर्शानें दूर केली खरी. परंतु त्यानें इतका आनंद निर्माण केला आहे कीं, त्यामुळेंच मी पुन्हा मोहिरून गेलों आहें.'

रामाचे हे शब्द कानीं पडतांच आपण अजून रामापाशींच बसलों आहोंत हें ध्यानांत येऊन सीता चटकन् दूर सरते. त्याबरोबर राम उठून बसून सीता आसपास कोठें आहे काय हें पाहतो. राम आपणांस शोधण्यास येणार या कल्पनेनें सीता बावरून जाते व आपण येथून निघून जाऊं या, असें तमसेला विनविते. सीतेला तेथून निघून जावेंसें कां वाटतें हें कदाचित् प्रेक्षकांना गूढ वाटेल; म्हणून तिच्याच शब्दांत तें कारण दिलें आहे. 'परवानगी घेतल्यावांचून मी जवळ आलें असें जर समजलें तर राजा माझ्यावर फारच रागवेल. तेव्हां, चल, चटकन् येथून जाऊं या ' असें सीतेनें म्हणतांच 'अग, भागीरथीच्या प्रभावामुळें तूं वनदेवतांनाहि अदृश्य झाली आहेस, हें विसरलीस वाटतें ?' ही आठवण देऊन तिची चिंता तमसा नाहींशी करते. सीतेची चिंता नाहींशी होते. परंतु 'हा प्रिये जानकि, असें वारंवार उद्गारून सीताशोकानें मूर्च्छित झालेला रामचंद्र पाहून आपल्यावरील त्याच्या अगाध प्रेमाची साक्ष पटल्यानें, क्षणमात्र आनंदित झालेल्या सीतेच्या तोंडून 'परवानगीवांचून मी जवळ आल्यास राजा माझ्यावर फार रागवेल' हे शब्द प्रेक्षकांच्या कानीं पडतात. आणि रामाचें अगाध पत्नीप्रेम आणि त्याची राजधर्मपालनाची कर्तव्यकठोरता या दोहोंचें एकत्रित दर्शन झाल्यामुळें प्रेक्षकांना एक प्रकारचा खेदाचा धक्का बसतो.

यानंतर 'हा प्रिये जानकि,' असा उद्गार रामाच्या तोंडून पुन्हां ऐकूं येतांच सीता सहजच म्हणते, 'आर्यपुत्र, आजवर ज्या घटना घडल्या, त्यांच्यांशीं हा तुमचा शोक विसंगत नाहीं का ? '—परंतु इतक्यांत पूर्वप्रेमाची

स्मृति होऊन तीच उद्गारते, 'माझी आठवण काढून व्याकुल होणाऱ्या प्रेमळ आर्यपुत्रांविषयीं अशा निष्ठुरपणानें बोलणारी मीच खरोखर वज्रहृदयी आहें. त्यांचें हृदय मीच जाणतें आणि माझेंहि तेच जाणतात.' इतक्यांत, सगळीकडे पाहून सीता कोठेंच न दिसल्यानें राम दुःखित होतो आणि त्याची ती अवस्था पाहून सीता तमसेला म्हणते, 'रामानें माझा जरी निष्कारण त्याग केला असला, तरी त्याची ही अवस्था पाहून माझ्या हृदयांत कालवाकालव होत आहे.'—निष्कारण त्यागाचें दुःख व रामाच्या प्रेमाविष्कारामुळें होणारा आनंद यांच्या मिश्रणामुळें सीतेच्या हृदयाची जी विलक्षण अवस्था झालेली असते, तिचें चित्रण तमसा येथें मोठ्या कुशलतेनें करते.

सीता कोठेंहि नाही हें कळून आल्यावरहि राम अजून त्या स्पर्शसुखाच्या आनंदांत म्हणतो, 'तुझा स्नेहार्द्रशीतल स्पर्श जणूं मूर्तिमंत प्रसादच आहे. त्याची स्मृति अजूनहि मला सुखवीत आहे. पण आनंददायी सीते, तूं कुठें आहेस ?' रामाचे ते प्रगाढ प्रीतीचे शब्द ऐकतांच सीता आनंदानें उद्गारते, 'या आनंदवर्षाव करणाऱ्या व अगाध प्रेम व्यक्त करणाऱ्या शब्दांच्या श्रवणानें निष्कारण त्यागाचें शल्य मनांत रुजत असलें, तरीहि माझें जीवित धन्य झालें असें मला वाटतें !'

इतक्यांत पडद्यांतून वासंतीच्या मुखांतून 'सीतेचा कृतकपुत्र जो हत्ती त्याच्यावर दुसऱ्या एका मत्तगजानें हल्ला केला आहे,' असे शब्द ऐकूं येतात. सीतेच्या कृतकपुत्रावर हल्ला ! राम तात्काळ उठून 'कोठें आहे तो दुष्ट ?' असें विचारतो. इतक्यांत वासंती प्रवेश करते व रामाला ओळखतांच 'त्या हत्तीला सोडविण्यासाठीं जटायुशिखराच्या दक्षिणेकडील सीतातीर्थावरून गोदावरी नदीवर महाराजांनीं जावें' असें विनविते.

जटायुशिखर, सीतातीर्थ इत्यादि चिरपरिचित पण दुःखकारक नांवें कानीं पडतांच रामाचा शोक पुन्हा वर उसळून येतो. पण तो सारा गिळून तो वासंतीच्या पाठोपाठ जातो. सीता व तमसाहि अदृश्य स्थितींत त्यांच्या मागोमाग जातात. परंतु हे सर्व तेथें पोंचण्यापूर्वींच आपल्या शत्रूचा हल्ला परतवून विजयी मुद्रेनें आपल्या सखीसह डुलत येणारा हत्ती त्यांना दिसतो. सीतेच्या कृतकपुत्राच्या विजयाचें सर्वजण कौतुक करतात. 'आपल्या प्रियेचा

वियोग याला कधीं न घडो ' असा आशीर्वाद सीता देते. आपल्या प्रियेला आनंद देणाऱ्या लहान लहान कृति हा हत्ती कसा करीत आहे याचें नाजुक वर्णन राम करतो. वनवास-कालांतील आपल्या प्रीतीचें जणूं प्रतिबिंबच त्याच्या शब्दांत उमटतें. निष्कारण त्यागानें पोळलेली सीता ' प्रियेचा वियोग न होवो ' असा आशीर्वाद साहजिकच देते आणि सीतेच्या कृतकपुत्राच्या विजयामुळें जणूं बारा वर्षांपूर्वीच्या काळांत क्षणकाल विहरत असलेला राम प्रियेला सुखविण्यासाठीं आपण त्यावेळीं काय करीत होतों याची आठवण होऊन हत्तीची प्रियानुवृत्ति कौतुकानें वर्णन करतो.

आपल्या कृतकपुत्राच्या दर्शनानें सीतेला साहजिकच आपल्या पुत्रांची—कुश-लवांची आठवण होते. त्याचबरोबर तिच्या मनांत येतें कीं, ' पुत्रांना जन्म देऊन खरोखर मला काय लाभ झाला ! कारण माझ्या पुत्रांच्या कमलमुखांचें आर्यपुत्रांनीं चुंबनहि घेतलें नाहीं. ' मुलांच्या स्मृतीनें तिचें हृदय भरून येतें व ' मुलांच्या स्मृतीमुळें व त्यांच्या पित्याच्या सान्निध्यामुळें मी पुन्हा एकदां संसारिणी बनलें आहें असें मला क्षणभर वाटूं लागतें. ' असें ती तमसेला सांगते.

बारा वर्षांनंतर रामचंद्राची व सीतेच्या प्रियसखीची—वासंतीची भेट झालेली असते. सीतात्यागाची कटु व शोककारक घटना दोघांमध्यें भिंतीसारखी उभी असते. त्यामुळें जिव्हाळ्याच्या गोष्टी विचारण्याचा किंवा सांगण्याचा कोणालाहि धीर होत नाहीं. सीतेच्या कृतकपुत्राला सोडविण्यापासून सुरुवात होते. त्याच्या विजयाचें कौतुक होतें. त्यानंतर ज्या ज्या पशुपक्ष्यांना व वृक्षलतांना सीतेनें खाऊं घालून किंवा पाणी घालून वाढविलें होतें, त्यांपैकीं एकेकाची आठवण वासंती रामाला करून देत आहे. कदलीवनाच्या मध्यभागीं ज्या शिलातलावर राम सीतेसह कांहीं काळ घालवीत होता, तें स्थान दाखवितांच रामाला शोक असह्य होतो. रामाची ती अवस्था पाहून सीता अधिकच दु:खी होते व सीता जवळ आहे हें माहीत नसतांहि वासंती सहज म्हणते, ' सखि सीते, रामभद्राची ही अवस्था दिसत नाहीं का ग तुला ? ' अदृश्य सीता उत्तर देते, ' सखि, मला सारें दिसत आहे. ' राम शोकाकुल होऊन अश्रु ढाळीत दूर बसला आहे हें पाहून वासंती त्याचें लक्ष दुसरीकडे वळविण्याचा यत्न करते. ' दीर्घकालानंतर रामचंद्र पुन्हा या वनांत आला

आहे. तेव्हां वृक्षांनो, फुलांनीं व फळांनीं त्याला अर्घ्य द्या. वनवातांनो, कमलगंधानें सुगंधित होऊन वाहूं लागा. विहंगमांनो, अविरतपणें मधुर गुंजन करा. ' वासंतीचे शब्द ऐकतांच राम तिला बसण्याची विनंती करतो. वासंती अखेरीस जिवाचा धडा करून, अश्रुपूर्ण नयनांनी तो हृदयांत सलत असलेला प्रश्न विचारण्यासाठीं पूर्वतयारी करते. ' महाराज, कुमार लक्ष्मणांचें कुशल आहे ना ? ' या प्रश्नानंतर काय येणार हें जाणून आपणांस जणूं ऐकूंच आलें नाहीं असें दाखवून, ' पंचवटींतील पशुपक्ष्यांच्या दर्शनानें माझ्या हृदयांत विलक्षण कालवाकालव झाली आहे ' असें राम सांगतो. वासंती पुन्हा पूर्वींचाच प्रश्न विचारते. तो ऐकून राम स्वतःशीं म्हणतो, ' महाराज, या परका भाव दाखविणाऱ्या नांवानें वासंतीनें मला संबोधिलें आहे. आणि लक्ष्मणाचें नांव घेतांच तिच्या डोळ्यांत अश्रु आले. तेव्हां तिला सीतात्यागाचा वृत्तांत कळला असलाच पाहिजे. '—वासंतीला मात्र तो उत्तर देतो. ' कुमार लक्ष्मण कुशल आहे. '

मन घट्ट करून वासंती विचारते—केवढें कठोर कर्म तुम्ही केलेंत !

**त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं**
**त्वं कौमुदी नयनयोरमृतं त्वमङ्गे ।**
**इत्यादिभिर्प्रियशतैरनुरुध्य मुग्धां**
**तामेव शांतमथवा किमिहोत्तरेण ॥**

' तूं माझें जीवित आहेस, तूं माझें जणू दुसरें हृदयच आहेस, तूं माझ्या नेत्रांची कौमुदी आहेस, तुझा स्पर्श तर अमृतवत् आहे,—याप्रमाणें शेंकडों मधुरवचनांनीं त्या निष्पापहृदयेला संबोधून आतां तिचाच—पण यापुढचें बोलावें तरी कसें ? ' असें म्हणून वासंती मूर्च्छित होते. राम तिला शुद्धीवर आणतो. यापुढचा त्यांचा संवाद लहान लहान वाक्यांचा पण किती सूचक आहे !

**वासंती :** करूं नये असें हें कर्म महाराजांनीं कां केलें ?

**राम :** लोकांना सहन होईना म्हणून.

**वासंती :** सहन न होण्याचें कारण काय ?

**राम** : कारण तेच जाणोत! (येथें तमसा उद्गारते, 'रामानें लोकांना चांगलाच टोमणा मारला आहे, पण किती उशिरानें!' तिच्या म्हणण्याचा अर्थ हा कीं, सीतात्यागाला आतां बारा वर्षें उलटून गेलीं आहेत. झालें गेलें पुन्हा थोडेंच परत येणार आहे?)

**वासंती** : हे कठोरा, तुला यश प्रिय होतें. पण तूं जें कृत्य केलेंस त्यानें तुझ्या यशाची जेवढी हानि झाली तेवढी कशानेंहि झाली नसती. त्या मृग-नयनेची अरण्यांत काय स्थिति झाली असेल! तूंच सांग.

**राम** : सखि, दुसरें काय होणें शक्य आहे? त्या निष्कपट कुरंगनयनेची गर्भभारामुळें जड झालेली, नाजुक तनुलतिका हिंस्र श्वापदांनीं केव्हांच नाहींशी करून टाकली असेल.

सीतेला मृत्यु आला अशा कल्पनेनें राम–वासंतीचें बोलणें चाललेलें असतें. आणि इकडे अदृश्य अवस्थेंतील सीता एकदम उद्‌गारते, 'नाहीं, आर्य-पुत्र, मी जिवंत आहें.' पण रामाला हें कसें कळणार? 'प्रिये जानकि, तूं कोठें असशील?' अशा शब्दांनीं राम अश्रुसिंचन करूं लागतो.

**सीता** : हर, हर! एखाद्या सामान्य माणसाप्रमाणें आर्यपुत्र अश्रु गाळूं लागले आहेत.

**तमसा** : नाहीं, वत्से, हें अगदीं योग्य असेंच होत आहे. दुःखित माणसांनीं आपल्या दुःखाला वाट करून देणें हें अवश्यच असतें. सरोवराचें पाणी बांधा-वरून वाहूं लागलें कीं, त्याला वाट काढून द्यावी लागते. त्याचप्रमाणें शोकक्षोभ अनावर झाला कीं, त्याला शब्दांनीं व अश्रूंनीं वाट करून देणेंच योग्य असतें—विशेषतः रामचंद्राच्या मागें तर किती प्रकारचे कष्ट आहेत! त्याला प्रजारक्षण व राज्यशासन यांच्याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष पुरवावें लागतें. आणि इकडे प्रियेबद्दलचा शोक त्याचें हृदय सुकवून टाकीत असतो. स्वतःच सीतेचा त्याग केल्यामुळें मुक्तपणें रुदन करणेंहि त्याला शक्य नाहीं. तेव्हां अशा अवस्थेंत आज त्याच्या शोकाला अश्रुरूपानें वाट मिळत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. कारण यामुळेंच तो जिवंत राहूं शकतो.

येथून पुढील पांचसहा श्लोकांत रामाच्या शोकाविष्काराचा प्रकर्ष दाखविला आहे. बारा वर्षांनंतर प्रथमच सीतेच्या प्रियसखीला सर्व वृत्तांत सांगण्याचें व लोकांच्या आक्षेपामुळेंच मला सीतात्याग करावा लागला, पण माझें तिजवरचें प्रेम क्षणभरहि विचलित झालें नाहीं हें मोकळ्या मनानें सांगण्याचें भाग्य रामाला लाभलेलें असतें; ती चिरपरिचित पंचवटी, सीतेची आठवण करून देणारीं तीं स्थानें, पशुपक्षी-वृक्ष, आणि सीतेची प्रियसखी वासंती यांच्या सान्निध्यांत राम आपलें राजेपण विसरून जातो; आपलें प्रजानुरंजनाचें कठोर व्रत दृष्टीआड करतो. येथें तो सीतेचा प्रियपतीच राहतो. आणि बारा वर्षें मनांत दडपून ठेवलेलें प्रियात्यागाचें दुःख मुक्तकंठानें व्यक्त करण्यास तो मोकळा असतो. आपल्या दुःखाबद्दल तो म्हणतो, ' हें गाढ दुःख माझ्या हृदयास फोडून टाकीत आहे, पण त्याचे दोन तुकडे मात्र करून टाकीत नाहीं. या विकल शरीराला दुःखामुळें बधिरता आली आहे, पण तें माझी चेतना मात्र पूर्ण नाहींशी करून टाकींत नाहीं. आंतील दुःखाग्नि शरीराला सतत जाळीत आहे पण त्याला पूर्ण भस्मसात् मात्र करीत नाहीं. माझें नशीब माझ्या मर्मांवर आघात करीत आहे, पण माझ्या जीविताचे पूर्ण तुकडे मात्र करून टाकीत नाहीं. ' या शोकावस्थेंत अयोध्येच्या लोकांना उद्देशून राम म्हणतो,

**न किल भवतां देव्याः स्थानं गृहेऽभिमतं तत-**
**स्तृणमिव वने शून्ये त्यक्ता न चाप्यनुशोचिता**
**चिरपरिचितास्ते ते भावाः परिद्रवयन्ति मा-**
**मिदमशरणैरद्यास्माभिः प्रसीदत रुद्यते ॥**

' माझ्या घरांतील सीतेचें–पत्नीचें स्थान तुम्हांला पसंत पडलें नाहीं म्हणून एखाद्या गवताच्या काडीप्रमाणें मी तिला निर्जन अरण्यांत टाकून दिली. एवढेंच नव्हे, तर तुमच्यासमोर त्याबद्दलचा माझा शोकहि मीं कधीं व्यक्त केला नाहीं. पण आज मात्र तो पूर्वपरिचित प्रदेश पाहिल्यामुळें माझ्या हृदयाचें पाणी पाणी झालें आहे. आणि अवशतेमुळें मी रुदन करीत आहें. तेव्हां पौरजनपदांनो, मला क्षमा करा ! ' प्रियात्यागाच्या आनिवार शोकाच्या अत्युच्च बिंदूच्या समयींहि राम आपलें प्रजानुरंजनाचें कठोर कर्तव्य करीत असतां, सीताप्रीतीची त्याची अगाधता व कोमलताहि क्षणभर क्षीण होत नाहीं.

रामाच्या शोकाचा अत्युत्कट उद्रेक पाहून वासंती दुःखित होते. आणि ' महाराज, धैर्य धरा ' असें विनविते. त्या ' धैर्य ' शब्दानें रामाच्या शोकाला व स्वतःच्या आधिक्षेपाला जणूं उकळी येते. तो म्हणतो, " सखि, धैर्य धर असें कशाला म्हणतेस ? या जगांतून देवी नाहींशी झाल्याला बारा वर्षें झालीं. ती आतां जवळजवळ नामशेष झाली आहे. पण राम अजून जिवंतच आहे ना ? शिवाय वासंती, ज्याप्रमाणें एखादें शल्य हृदयांत वाकडें घुसून रुतत राहावें, किंवा विष-युक्त असा दंश होऊन हृदयांत विष पसरीत राहावा, त्याप्रमाणें हें शोकरूपी बाणाचें टोंक माझ्या हृदयांत घुसून माझ्या हृदयाचे तुकडे करीत असतांहि मी आजवर सहनच करीत आलों आहें ना ? माझ्या हृदयांतील शोक थांबविण्यासाठीं मी जों जों प्रयत्न करतों, तों तों माझ्या धैर्याच्या भिंतींना फोडून हा शोक-क्षोभ वेगानें बाहेर वाहूं पहात आहे. '

रामाचा हा शोक पाहून सीतेला एकीकडे दुःख होतें, तर दुसरीकडे त्याचें आपल्यावरचें अगाध प्रेम पाहून तिला निरतिशय आनंदहि होत असतो. पण रामाच्या शोकाची उत्कटता वाढत चाललेली पाहून आतां याचें मन दुसरीकडे वळविलें पाहिजे हें जाणून वासंती त्याला पंचवटींतील इतर स्थानें पाहण्यासाठीं बोलाविते. समोरच तिला लतागृह दिसतें, त्याबरोबर त्या लतागृहाशीं निगडित अशी स्मृति तिच्या मुखांतून बाहेर पडते.

**अस्मिन्नेव लतागृहे त्वमभवस्तन्मार्गदत्तेक्षणः**
**सा हंसैः कृतकौतुका चिरमभूद्गोदावरी-सैकते ।**
**आयान्त्या परिदुर्मनायितमिव त्वां वीक्ष्य बद्धस्त्वया**
**कातर्यादरविंदकुड्मलनिभो मुग्धः प्रणामाञ्जलिः ॥**

' याच कुंजांत तूं जिची वाट पहात होतास, ती गोदावरीतीरीं हंसाची क्रीडा पहात होती. परत येतांच तुझें खिन्नवदन पाहून तिनें आशंकेनें हात जोडून तुला प्रणाम केला होता. '—या आठवणीनें राम व्यथित होऊन म्हणतो, ' आतां दुःखभार कुठवर सहन करावा ? ' आणि तो मूर्च्छित होतो. सीता घाबरून जाते. इतक्यांत, तुझ्या प्रियस्पर्शानेंच राम उठेल, याची आठवण तमसा तिला करून देते. आणि सीता चटकन् जाऊन रामाच्या कपाळाला व हृदयाला

स्पर्श करते. या स्पर्शानें राम आनंदानें जागृत होऊन म्हणतो, ‘ जणूं अमृताचें लेपन केल्याप्रमाणें हा स्पर्श अंतर्बाह्य सुख देऊन मूर्च्छेतून जागृत करतो. परंतु अत्यानंदामुळें पुन्हा एक प्रकारची सुखमूर्च्छा उत्पन्न करतो ! ’ आनंदानें डोळे मिटून तो वासंतीला म्हणतो, ‘ वासंती, तुझें अभिनंदन केलें पाहिजे.

वासंती आश्चर्यानें विचारते, “ कशाबद्दल अभिनंदन करतां ? ” राम उत्तर देतो, “ ही पाहा जानकी पुन्हा आली आहे ना ! ” वासंतीला अर्थात्‌च ती दिसत नाहीं. परंतु सीतेचा हात रामाच्या हातांत असल्यामुळें प्रत्यक्ष सीता भेटल्यासारखें त्याला वाटतें. आणि तो असें म्हणतांच आपला हात काढून घेतला पाहिजे हें ध्यानांत येत असतांहि प्रेमावशतेमुळें सीता हात काढून घेऊं शकत नाहीं. सीतास्पर्शाचें मधुरतम सौख्य उपभोगीत असतां राम भ्रमांत बोलत आहे असें वासंतीला वाटतें. आपला हात काढून न घेण्यांत आपल्याकडून प्रमाद घडला हें जाणून सीता अनिच्छेनें आपला हात काढून घेते आणि राम पुन्हा शोकसागरांत निमग्न होतो. “ देवि, माझा त्याग करून जाऊं नकोस ” हे शब्द त्याच्या तोंडून अभावितपणें बाहेर पडतात. केवढा हा विरोधाभास !

वासंतीला ज्या अर्थीं सीता दिसत नाहीं त्या अर्थीं तिच्या अस्तित्वाचा आपल्यालाच भ्रम झाला असावा हें रामाच्या लक्षांत येतें. त्याचें लक्ष दुसरीकडे गुंतविण्यासाठीं जेथें जटायूचा वध करून रावणानें सीतेला आकाशांतून हरण करून नेलें, तें स्थान वासंती दाखवते. रावणाच्या नामोच्चारानें रामाचा कोप जागृत होतो. परंतु लागलीच तो उद्गारतो, “ त्यावेळचा सीतेचा विरह नाहींसा करण्याचे उपाय अवलंबिण्यांत काळ जात असल्यामुळें व रावणवधाबरोबरच हा विरह संपणार ही खात्री असल्यामुळें तो विरह सह्य होता. पण आतांचा हा विरह मात्र निरवधि असल्यामुळें असह्य वाटत आहे. ”

एकेका प्रसंगाच्या व स्थानाच्या स्मरणामुळें शोकवर्धनावांचून कांहीं निष्पन्न होत नाहीं हे जाणून राम आपलें मन आवरून वासंतीचा निरोप घेतो. पण हा निरोप घेतां घेतांहि आपल्या दोनचार वाक्यांनीं अदृश्य सीतेचें विरहत्यागाचें दुःख पूर्णपणें हलकें करून जातो.

**राम** : वासंती, आतां मला जाण्याची अनुज्ञा दे. तिकडे अश्वमेध यज्ञांत माझी सहधर्मचारिणी आहेच.

**सीता** : ( अदृश्य अवस्थेंत ) आर्यपुत्र, कोण ही !

**राम** : सीतेची हिरण्मयी मूर्ति.

**सीता** : ( अतिशय आनंदून ) आर्यपुत्र, खरेच आपण आर्यपुत्र आहांत ! तुमच्या शब्दांनीं परित्यागलज्जेचें शल्य माझ्या मनांतून तुम्ही समूळ उपटून टाकलें.

**राम** : वासंती, त्या हिरण्मयी मूर्तीच्या दर्शनानेंच मी आपलें चित्त आतां रमवीन.

**सीता** : खरोखर ती हिरण्मयी मूर्ति धन्य आहे ! आर्यपुत्रांचें तिच्यावर एवढें प्रेम आहे आणि त्यांना दिलासा देत असल्यामुळें ती या जीवलोकाची आशा बनली आहे.

हें रामसीतेचें संभाषण नाहीं. कारण राम वासंतीशीं बोलत असतो. परंतु अदृश्य रूपांतील सीता रामाच्या एकेका शब्दानें उल्हसित होत स्वतःशीच बोलत असते.

वासंतीचा जड हृदयानें निरोप घेऊन राम विमानाकडे जातो आणि रामाचें शेवटचें दर्शन हृदयांत सांठविण्यासाठीं सीता मागें वळून पहात पहात अनिच्छेनें तमसेबरोबर जाऊं लागते.

तिसऱ्या अंकाची अथपासून इतिपर्यंत रचना अद्भुत पण मधुर प्रसंगांच्या गुंफणीनें केलेली आहे. दण्डकारण्यांत रामाला एकटा आणून सीतासखी वासंतीच्या निमित्तानें सीतात्यागाबद्दल रामाला होणारें अथांग दुःख पदोपदीं व्यक्त केलें आहे. आणि सीतेला अदृश्य स्वरूपांत या प्रसंगीं आणून रामाच्या आपल्यावरील प्रगाढ प्रीतीची साक्ष तिला पटविली आहे. त्यागाचें खोल रुतलेलें शल्य सीतेच्या हृदयांतून काढण्यासाठीं अशाच कुशल रचनेची गरज होती. सीतेचा त्याग करणारा कर्तव्यकठोर रामराजा खरोखर अंतर्यामांत सीतेवरील सखोल प्रीतीमुळें कसा अखंड झुरत आहे आणि सीतात्यागामुळें सर्वांत अधिक आघात त्यानें स्वतःवरच कसा करून घेतला आहे, याचें पुरेपूर दर्शन या तिसऱ्या अंकांत पावलोपावलीं होत राहतें. म्हणून करुण रसाच्या दाट मेघांनीं परिपूर्ण असा हा अंक उदात्ततेच्या विद्युल्लतेचें वारंवार दर्शन घडवीत राहतो.

० ० ०

# अंक चवथा

## कौसल्या-जनक योग

तिसऱ्या अंकांतील करुणरसाच्या उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या प्रकर्षामुळें प्रेक्षकांच्या भावनांवर जो एक प्रकारचा ताण पडला, त्यांतून त्यांना खेचून काढण्यासाठींच जणूं चवथ्या अंकाचा परिचय-प्रवेश कल्पिला आहे. या अंकाचें स्थल म्हणजे वाल्मीकींचा आश्रम हें होय. आश्रमांतील दोन विद्यार्थी दाण्डायन व सौधातकि यांच्या संवादांतून आश्रमांत नुकत्याच आलेल्या अतिथींचा प्रवेश मोठ्या कौशल्यानें व खेळकरपणानें सुचविण्यांत आला आहे. दुसऱ्या अंकाचा परिचय-प्रवेश म्हणजे आत्रेयी-वासंती यांचा आणि तिसऱ्या अंकाचा परिचय प्रवेश तमसा व मुरला या दोन नद्यांचा. त्या प्रवेशांत कौशल्याला, सूचकतेला व नाजुकपणाला भरपूर अवसर असला, तरी विनोदाला व खेळकरपणाला मात्र या चौथ्या अंकाच्या परिचय-प्रवेशांतच अवसर मिळाला आहे. आश्रमांत कोणी बडे पाहुणे आल्यामुळें 'शिष्टागमने अनध्याय:' या न्यायानें आश्रमांतील विद्यार्थ्यांना सुट्टी मिळाली असते. तेव्हां या आनंदांत खेळण्यास निघालेले विद्यार्थी या बड्या पाहुण्यांची माहिती एकमेकांना विचारून करून घेत आहेत. सौधातकि हा वयानें लहान असावा. कारण तो या नव्या पाहुण्यांबद्दल चेष्टेनें म्हणतो, 'हे जे कोणी लहानमोठे दाढीवाले आश्रमांत आले आहेत, त्यांच्यामुळें सुट्टी मिळाली आहे, तेव्हां आपणहि त्यांचें स्वागतच करतों. पण का रे दाण्डायना, या म्हाताऱ्यांचा हा पुढारी कोण आहे रे ?' दाण्डायन त्याला थोडें रागावून उत्तर देतो, 'ऋष्यशृंगाश्रमांतून भगवान् वसिष्ठ, अरुंधती व दशरथ-महाराजांच्या स्त्रिया आल्या आहेत. तेव्हां वेड्यासारखें चेष्टेनें बोलूं नकोस.'

त्या काळच्या अतिथिस्वागताच्या प्रकारांची कल्पना येण्यासाठीं व विद्यार्थ्यांच्या खेळकरपणाची कल्पना येण्यासाठीं पुढील संवाद वाचण्यासारखा आहे.

**सौधातकि** : कोण ? वसिष्ठ आहेत म्हणतोस ?

**दाण्डायन** : नाहीं तर काय ?

**सौधा.** : मला वाटलें एखादा वाघ नाहीं तर लांडगा असेल.

**दाण्डा.** : काय भलतेंच बोलतोस ?

**सौधा.** : पण त्यांनीं येतांक्षणींच ती कल्याणी कपिला फस्त करून टाकली की !

**दाण्डा.** : विद्वान् ब्राह्मणाला गाय, बैल किंवा बोकड दिला पाहिजे असें वेदांतच सांगितलें आहे. धर्मसूत्रकारांनींहि हाच नियम घालून दिला आहे.

**सौधा.** : आतां मात्र तूं सांपडलास !

**दाण्डा.** : म्हणजे काय ?

**सौधा.** : वसिष्ठादि मंडळी आली तेव्हां गाय मारली. पण आज राजर्षि जनक आले तेव्हां मात्र दुधादह्यानें त्यांचें स्वागत केलें गेलें. गाय परत पाठवली. हें तुझ्या शास्त्रांत कसें बसतें ?

**दाण्डा.** : बरोबर आहे. मांस न खाणाऱ्यांचें स्वागत असेंच करावें असा नियम आहे. जनकांनीं मांसाशन सोडून दिलें आहे.

**सौधा.** : तें कां बुवा ?

**दाण्डा.** : सीतादेवीसंबंधीं ती दुर्दैवी घटना घडल्यानंतर त्यांनीं वानप्रस्थाश्रम स्वीकारला. गेलीं कांहीं वर्षें तर ते चंद्रद्वीपांत तप करीत होते.

**सौधा.** : अस्सें ! मग आतां येथें कशाला आले ?

**दाण्डा.** : आपल्या मित्राला—भगवान् वाल्मीकींना भेटण्यास आले.

**सौधा.** : मग त्यांची अजून आपल्या नातेवाइकांची भेट झाली कीं नाहीं ?

**दाण्डा.** : आतांच वसिष्ठांनीं अरुंधतीला देवी कौसल्येकडे पाठवून सांगितलें कीं, आपण स्वतःच जनकराजांना भेटण्यास जावें हें उत्तम.

या संभाषणाच्या शेवटीं दाण्डायन जनकाचा प्रवेश सूचित करतो. तो 'वाल्मीकि-वासिष्ठांना भेटल्यावर आतां सीताशोकानें अंतर्बाह्य जळणारा राजर्षि जनक आश्रमांतील एका वृक्षाजवळ बसलेला आहे.' सीतात्यागाच्या दारुण घटनेमुळें सीतेची प्रियसखी वासंती व राम यांना झालेल्या शोकाचें करुणोत्कट दर्शन तिसऱ्या अंकांत आपणांस झालें आहे. परंतु जनक व

कौसल्या या अतिशय निकटच्या आप्तांच्या दुःखाचें दर्शन आतांपर्यंत झालें नव्हतें. वृथात्याग केलेल्या प्रिय कन्येविषयींचें पित्याचें दुःख आणि स्वतः-च्याच प्रियपुत्रानें प्रियवधूचा अन्याय्य त्याग केल्यामुळें होणारें पण परि-स्थितीच्या या चमत्कारिक अवघडपणामुळें बोलून न दाखवतां येणारें असें कौसल्येचें दुःख, यांचा परिचय या अंकांत होतो.

जनकराजा जो प्रवेश करतो, तो सीताशोकानें हृदय जळत असतां व दीर्घ तपानें शरीर जाळलें असतांहि हा प्राण कांहीं जात नाहीं याबद्दल खेदोद्गार काढीतच प्रवेश करतो. आत्महत्या करणें हें पाप आहे म्हणून तीहि करणें शक्य नाहीं. 'हे पवित्र सीते, तुझी ही दुर्दैवी घटना अशी आहे कीं, लज्जेमुळें मोकळ्या मनानें शोकहि करणें अशक्य झालें आहे.'

**त्वं वन्हिर्मुनयो वसिष्ठगृहिणी गंगा च यस्या विदु –**
**र्माहात्म्यं यदि वा रघोः कुलगुरुर्देवः स्वयं भास्करः ।**
**विद्यां वागिव यामसूत भवती तद्वत्तु या दैवतं**
**तस्यास्त्वद्दुहितुस्तथाविशसनं किं दारुणेऽमृष्यथाः ॥**

'भगवति वसुंधरे, ज्या तुझ्या कन्येचें माहात्म्य गंगा, अरुंधती, अग्नि, रघुकुलगुरु, प्रत्यक्ष भास्कर व तूं या सर्वांना माहीत होतें, त्या तुझ्या कन्येवर असा दारुण प्रसंग ओढवला असतांहि तूं कसें सहन करतेस ?'

जनकाचें मन याप्रमाणे शोकमग्न झालें असतां अरुंधती व कौसल्या येतांना त्याला दिसतात. 'महाराज दशरथांची प्रिय पत्नी व माझी सखी कौसल्या ती हीच का ?' असे उद्गार काढतांच जनकराजाला पूर्वींच्या सुखमय दिवसांची आठवण होते. आणि त्याचबरोबर आज कौसल्येचें दर्शन हें जखमेवर मीठ चोळल्याप्रमाणें वाटत आहे, हीहि उलट जाणीव होते. सीता-त्यागाची दारुण घटना भिंतीप्रमाणें मध्यें उभी असतां जनकराजाला भेटण्याचा प्रसंग यावा या विचारानें कौसल्याहि विलक्षण कष्टी होते व तिचें पाऊलहि पुढें पडत नाहीं. जनकराजाला आपलें मुख तरी कसें दाखवावें या विचारानें ती दुःखित झालेली असते. पण कौसल्येनेंच जनकराजाला प्रथम भेटलें पाहिजे हें जाणून अरुंधती तिला पुढेंपुढें नेत असते. जनक-

राजाजवळ पोंचतांच, तो पुढें होऊन अरुंधतीला अभिवादन करतो आणि कौसल्येकडे न पाहतां बरोबर आलेल्या कंचुकीला विचारतो, 'त्या प्रजापालक राजाच्या मातेचें कुशल आहे ना?'—त्याचा तो टोमणा कंचुकीला मर्मभेदी वाटतो. तो चटकन् उत्तर देतो, 'दुःखामुळें जिनें रामभद्राचेंहि मुखावलोकन बारा वर्षांत केलें नाहीं, त्या दुःखितहृदय कौसल्यादेवीला महाराजांनीं आणखी दुखवूं नये. रामभद्राचेंहि दुर्दैवच ओढवलें. अग्निशुद्धीवर विश्वास न ठेवणाऱ्या पौरजनांनीं सीतादेवीविषयीं भलतीच वार्ता पसरविल्यामुळें नाइलाज होऊनच रामभद्रानें हें दारुण कृत्य केलें.'

अग्निशुद्धीचें नांव काढतांच जनकराजाला संताप आला. 'माझ्या मुलीला पवित्र करणारा हा कोण अग्नि काढला? हरहर, रामाच्या कृत्यामुळें अगोदरच मी अवमानित झालों होतों. पण अग्निशुद्धीची आठवण देऊन माझ्या अपमानावर अधिकच डागण्या दिल्या गेल्या आहेत.' हें ऐकतांच अरुंधती एकदम जनकाचा शोकसंताप कमी करण्यास पुढें सरसावते. 'खरोखरच, सीतेच्या संबंधांत अग्नीचें नांव काढणेंहि तिला अपमानास्पद असें आहे. नुसतें सीता म्हणणें एवढेंच पुरेसें आहे.'

**शिशुर्वा शिष्यावा यदासि मम तत्तिष्ठतु तथा**
**विशुद्धेरुत्कर्षस्त्वयि तु मम भक्तिं द्रढयति ।**
**शिशुत्वं स्त्रैणं वा भवतु ननु वन्द्यासि जगतां**
**गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ॥**

'हे सीते, तूं माझी शिष्या असलीस आणि वयानें लहान असलीस तरी तुझ्या अतिशयित पावित्र्यामुळें माझी तुजवरील भक्ति दृढतर झाली आहे. तूं वयानें लहान आणि स्त्री असलीस तरी अखिल जगाला वंद्य आहेस. कारण गुण हेच पूजनीय आहेत. गुणांच्या बाबतींत वय व लिंग यांचा विचार केला जात नाहीं.'

अरुंधतीच्या तोंडचे हे सीतेविषयींचे उद्गार ऐकताच आतांपर्यंत दाबून ठेवलेला दुःखभार वर उसळून कौसल्या मूर्च्छित होते. आणि बऱ्याच वर्षांनंतर भेटलेल्या प्रियसखी कौसल्येशीं आपण फार निष्ठुरपणानें वागलों याची जाणीव होऊन जनकराजा कष्टी होतो. 'आपणांस पाहतांच जुन्या

सुखदायक दिवसांची आठवण कौसल्येला झाली आणि त्याचबरोबर आज केवढा भयानक फरक परिस्थितींत घडून आला आहे याची जाणीव होऊन तिचें कुसुमकोमल हृदय अति दुःखित झालें.' असें अरुंधतीनें म्हणतांच आपल्या निष्ठुरपणाची त्याची जाणीव अधिकच उत्कट होते. दशरथाचे व आपले अकृत्रिम मित्रत्वाचे संबंध व त्यांत राम-सीतेच्या विवाहामुळें पडलेली निकट स्नेहाची भर ही त्या वेळच्या निरनिराळ्या सुखकर प्रसंगांच्या रूपानें त्याच्या स्मृतीमध्यें विहरूं लागते आणि 'प्रियसखि' असें म्हणून कमंडलूंतील पाण्याचें सिंचन करून मूर्च्छित कौसल्येला उठविण्याचा प्रयत्न तो करूं लागतो. कौसल्या मूर्च्छेंतून उठतांच सीतेच्या आठवणींनीं पुन्हा व्यथित होते. इतक्यांत अरुंधती तिला एका गोष्टीचें स्मरण करून देते. 'ऋष्य-शृंगाश्रमांत तुमच्या कुलगुरूंनीं (वसिष्ठांनीं) तुम्हांला सांगितलें होतें कीं, जें व्हावयाचें होतें तें होऊन गेलें; पण या सर्वांचा शेवट मात्र कल्याणप्रद होणार आहे. तेव्हां या गुरुवचनावर विश्वास ठेवून तूं आपला शोक आवर.' —उत्तररामचरिताचा शेवट सुखकर होणार आहे असेंच जणूं अरुंधती या भाषणांतून सुचविते. त्यामुळें प्रेक्षकांच्याहि मनावर जनक-कौसल्येच्या शोकामुळें पडलेला ताण कमी होतो.

इतक्यांत पडद्यांतून गडबड ऐकूं येते. सुट्टी मिळाल्यामुळें आश्रमांतील सर्व विद्यार्थी खेळतबागडत आहेत, त्यांची ही गडबड आहे असें सांगून लवाचा प्रवेश सुचविला जातो.

'शैशवांतील रामभद्राप्रमाणें सुंदर दिसणारा हा बालक कोण आहे बरें?' असें कौसल्या त्या मुलांच्या घोळक्यांतील एका मुलाकडे पाहून उद्‌गारते. 'भागीरथीनें सांगितलेलें रहस्य हें दृष्टीसमोरच दिसतें आहे. पण कुश-लवांपैकीं हा कोण हें मात्र कळत नाहीं.' असें अरुंधती स्वगत म्हणून कुश-लवांचें रहस्य आपणांस माहीत आहे हें प्रेक्षकांच्या नजरेस आणते. जनक व कौसल्येला मात्र सीता वनांत टाकली गेली यापलीकडे कांहींच माहीत नसतें. हा मुलगा रामचंद्रासारखा दिसतो हें कौसल्येनें पहिल्या दृष्टिक्षेपांत ओळखलें. अरुंधती तर उघडच तो रघुनंदनासारखा दिसतो म्हणून सांगते; पण जनकराजाला मात्र त्या मुलाविषयीं विलक्षण कुतूहल वाटत असतांहि तो रामासारखा दिसतो असें

म्हणावेंसें वाटत नाहीं. तो मुलगा क्षत्रियाचा आहे असें त्याच्या धनुष्यबाणांवरून व इतर गोष्टींवरून मात्र तो तात्काळ ओळखतो. हा मुलगा कोणाचा आहे हें विचारण्यासाठीं जनकराजा कंचुकीला वाल्मीकींकडे लागलीच पाठवितो—आणि जातां जातां कांहीं वृद्धमंडळी तुला भेटूं इच्छितात असें सांगून त्या मुलाला आमच्याकडे पाठव हेंहि बजावतो.

कंचुकी त्या मुलाला बोलाविण्यास जातो. जनक, कौसल्या व अरुंधती या तिघांचीहि नजर लवावर खिळलेली असते. खेळण्यांत रमलेला हा मुलगा खेळ सोडून अनोळखी वृद्धांच्या भेटीस येईल कीं नाहीं या शंकेनें तिघेहि व्याकुळ झालेले असतात; पण कंचुकीनें निरोप सांगतांच बरोबरीच्या मुलांना जाण्यास सांगून तो मुलगा जेव्हां येण्यास निघतो, तेव्हां तिघांनाहि आनंद होतो. लव प्रवेश करतो. या वृद्धांचीं नांवें माहीत नाहींत. नमस्कार करण्याचा क्रम कोणता तेंहि माहीत नाहीं, तेव्हां कशा क्रमानें नमस्कार करावा, या विचारांतच लव पडतो; पण त्यांतून पुढीलप्रमाणें तो चातुर्यानें मार्ग काढतो : ‘ लवाचा आपणांस यथाक्रमानें साष्टांग-नमस्कार. ’ भगवान् वाल्मीकींनीं सर्व शिक्षणाबरोबर सभ्याचाराचेंहि कसें उत्तम शिक्षण मुलांना दिलें होतें, हें लवाच्या एकेका वाक्यावरूनहि समजून येतें. लव जवळ येतांच सर्व त्याला आशीर्वाद देतात. अरुंधती त्याला आपल्या मांडीवर बसविते. त्याला जवळून निरखल्यावर कौसल्या ‘ सीतेच्या मुखचंद्रासारखें याचें मुख आहे असें नाहीं का आपणांस वाटत ? ’ असा प्रश्न जनकास करते. ’ लवाच्या अंगप्रत्यंगांत राम व सीता यांच्या एकेका विशेषाचें दर्शन जनकाला व कौसल्येला होतें; पण सीता मृत झाली, अर्थात् तिच्याबरोबर तिची संततीहि गेली, ही त्या दोघांची ठाम समजूत असल्यामुळें हा राम-सीतेचा पुत्र असावा अशी कल्पना करण्यासहि त्यांचें मन बिचकतें. आशा वेगानें मनांत उसळत असते. या बालकाकडून तरी कांहीं कळेल या अपेक्षेनें अखेर कौसल्या त्याला विचारते, ‘ बाळा, तुझी आई आहे का ? वडिलांची तुला आठवण आहे का ? ’ लव नकारार्थीच उत्तर देतो; मीं ‘ भगवान् वाल्मीकीचा आहें ’ एवढेंच उत्तर देतो.

या मुलाकडून आपल्या आशेला पोषक असें कांहींहि मिळत नाहीं, यामुळें किंचित् खट्टू झालेल्या जनक-कौसल्येच्या कानांवर पडद्यांतून शब्द

पडतात, 'हे सैनिकांनो, या आश्रमभूमीवर कोणीहि आक्रमण करूं नये अशी कुमार चंद्रकेतूची आज्ञा आहे.' बारा वर्षांत कौसल्या किंवा जनक हे अयोध्येला गेले नव्हते, तेव्हां लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आदि आपल्या मुलांची व जांवयांची ह्या उभयतांशीं भेट झालेली नव्हती. त्यांचीं मुलेंहि त्यांनीं पाहिलीं नव्हतीं. सीतात्यागाच्या शोकांत इतर मुलांपासून मिळणारें सुखहि त्या उभयतांनीं बुडवून टाकलें होतें. त्यामुळें लक्ष्मणपुत्र चंद्रकेतु सेनेला आज्ञा करीत आहे हे शब्द ऐकतांच कौसल्येला अतिशय आनंद होतो. ती उद्गारते, 'हे शब्द म्हणजे अमृतबिंदुसुंदर अक्षरें आहेत, अश्वमेध अश्वाचें रक्षण करण्याच्या निमित्तानें आज चंद्रकेतु येथें आला तेव्हां हा खरोखर भाग्याचा दिवस आहे.' असें अरुंधती व जनक हेहि आनंदानें म्हणतात.

ज्या वृद्धांशीं आपण मघांपासून बोलत आहोंत हे आहेत तरी कोण याचा बिचाऱ्या लवाला मात्र उलगडा होत नाहीं. शेवटीं तो जनकास विचारतो कीं, 'हा चंद्रकेतु कोण?' 'दाशरथी राम-लक्ष्मण तुला माहीत आहेत काय?' असें जनकानें विचारतांच 'हे तर रामायण-कथेंतील पुरुष आहेत.' असें तो चटकन् उत्तर देतो. आपण त्या रामाचे, सीतेचे, जनकाचे व कौसल्येचे कोणी आहोंत हें त्या बिचाऱ्याला कोठून माहीत असणार? वाल्मीकीनें सांगितलेली रामकथा मात्र त्याला पाठ असते. तेव्हां त्या ज्ञानाच्या साहाय्यानें 'चंद्रकेतु हा लक्ष्मणपुत्र म्हणजेच ऊर्मिलापुत्र अर्थात् जनक राजर्षीचा नातू'—असें तो चटकन् उत्तर देतो. आपणांसमोर उभा आहे हाच राजर्षि जनक हेंहि त्याला माहीत नसतें. आणि आपण स्वतःहि या राजर्षींचे नातू आहोंत; हें तर त्याला मुळींच माहीत नसतें. लवाला रामायणकथा माहीत असलेली पाहून जनकाला एक कल्पना सुचते. त्यागानंतर सीतेचें काय झालें, तिचीं मुलें जिवंत आहेत का, वगैरे माहिती कदाचित् या रामायण-कथेंतून आपणांस कळेल या आशेनें लवाला तो विचारतो, 'दशरथपुत्रांच्या पत्नींची व त्यांच्या संततीचीं नांवें तुला माहीत आहेत का?'—

—'हा कथाभाग अजून ऐकला नाहीं.' असें उत्तर लव देतो. 'म्हणजे? कवींनीं तो लिहिलाच नाहीं का?'

' लिहिला आहे; पण प्रकाशित नाहीं केला. या पुढच्या भागाला नाट्यरूप देऊन त्याचा अप्सरांकडून प्रयोग करविण्यासाठीं भरतमुनींकडे तो पाठविण्यांत आला आहे आणि तें नाट्याचें हस्तलिखित सुरक्षित पोंचावें म्हणून रक्षणासाठीं माझ्या वडील भावाला–कुशाला बरोबर पाठविलें आहे.'—ही नवीन माहिती लव देतो. त्याबरोबर कथाभाग कोठपर्यंत तुला माहीत आहे असें जनक विचारतो. लवाला बिचाऱ्याला काय माहीत ? तो सरळपणानें उत्तर देतो, ' लोकापवादामुळें उद्विग्न होऊन रामराजानें सीतेला अरण्यांत पाठविली व आसन्नप्रसव स्थितींत तिला एकटीला वनांत टाकून लक्ष्मण परतला, येथपर्यंतचाच भाग आम्हांला माहीत आहे ! '

लवाच्या भेटीपासून सीतात्यागाबद्दलच्या शोकाला कांहीं काळ जी विश्रांति मिळाली होती, ती लवाच्या या बोलण्यामुळें नाहींशी होते.

**नूनं त्वया परिभवं च वनं च घोरं**
**तां च व्यथां प्रसवकालकृतामवाप्य ।**
**क्रव्याद्गणेषु परितः परिवारयत्सु**
**संत्रस्तया शरणमित्यसकृत्स्मृतोऽस्मि ॥**

' घोर अरण्यांत आसन्नप्रसव स्थितींत व्याकुळ होऊन सीतेनें आपली आठवण काढली असेल ' या विचारानें जनकराजा अतिशय व्याकुळ होऊन जातो. कौसल्येलाहि शोक आवरत नाहीं. आपण सांगितलेल्या साध्या सरळ गोष्टींमुळें हीं दोन वृद्ध माणसें शोक कां करताहेत हें बिचाऱ्या लवाला कळेनासें होतें. अखेर तो अरुंधतीला विचारतो, ' हे कोण आहेत ? ' ' ही कौसल्या आणि हा जनक ' असें अरुंधतीनें सांगतांच लव मोठ्या कौतुकानें व आदरानें त्यांच्याकडे पाहतो. त्याच्या दृष्टीनें हीं सगळीं रामायण–कथेंतील माणसें. इकडे सीतेच्या आठवणीनें जनकाचा संताप उसळून येतो. ' पौरजनांची केवढी निर्दयता ! आणि रामाचें कृत्य तरी किती अविचाराचें होतें ! ज्या दारुण घटनेनें मला आजवर जाळलें त्या घटनेबद्दलचा माझा क्रोध चापाच्या किंवा शापाच्या रूपानें व्यक्त करण्यास हा योग्य समय आहे ' हे शब्द जनकाच्या मुखांतून बाहेर पडतांच रामाला जनक आतां शाप देणार या भीतीनें त्याला शांत करण्यासाठीं कौसल्या अरुंधतील

विनविते. लव तर बोलून चालून क्षत्रियाचा मुलगा. त्याला हा जनकाचा राग फार पसंत पडतो. 'मानी लोकांचा अपमान झाला म्हणजे त्यांची अशीच वृत्ति होत असते.' असें तो सहज म्हणून जातो. त्याबरोबर अरुंधती लागलीच जनकाला म्हणते, 'राजर्षि, राम हा तुम्हांला मुलासारखाच आहे आणि पौरजन तर संकुचित व अडाणी असतात. तेव्हां त्यांच्यावर रागावूं नका.' हें ऐकून जनकराजा शांत होतो.

इतक्यांत 'आम्हीं घोडा प्रत्यक्ष पाहिला' असें सांगत मुलें धांवत लवाकडे येतात व घोड्याचें मजेदार वर्णन करतात. 'लवकर पाहण्यास चल' असें म्हणून ते लवाला ओढून नेऊं लागतात व गुरुजनांची क्षमा मागून लव त्यांच्याबरोबर जातो.

जाणाऱ्या लवाकडे तिघांची दृष्टि खिळते. इतक्यांत वाल्मीकींकडे पाठविलेला कंचुकी येऊन सांगतो कीं, 'आपण विचारलेली गोष्ट आपणांस योग्य वेळीं कळेल.' या निरोपानें तिघांचें कुतूहल वाढतें व ते सर्व वाल्मीकीकडे जातात.

इकडे मुलें व लव प्रवेश करतात. हा अश्वमेध यज्ञाचा अश्व आहे असें सांगून तो कशावरून ओळखावयाचा हें लव मोठ्या गंभीरपणानें मुलांना सांगतो. इतक्यांत दुरून ऐकूं येतें, 'हा अश्व म्हणजे सप्तलोकांत सर्वश्रेष्ठ असा जो वीर रामचंद्र त्याची शौर्यपताका आहे!' हे शब्द ऐकतांच लवाचें क्षत्रियत्व उसळून येतें. 'म्हणजे काय? आतां पृथ्वीवर कोणी क्षत्रिय उरलाच नाहीं असें का तुमचें म्हणणें आहे?' 'महाराजांच्या तुलनेनें कोणीच क्षत्रिय जगांत उरला नाहीं.' असें अश्वाचें रक्षण करणाऱ्या सैनिकांकडून उत्तर येतांच लव अधिकच उत्तेजित होतो. 'महाराज जर एकटेच क्षत्रिय असले तर ही दर्पोक्ति कशाला पाहिजे? पण हें बोलण्यांत काय अर्थ आहे? ही तुमची पताका मीं हरण करून नेतों पाहा.' असें म्हणून घोड्याला हांकलून आश्रमांत आणण्यासाठीं लव मुलांना आज्ञा करतो. मुलें बिचारीं ते शस्त्रधारी सैनिक पाहून पळून जातात. आणि क्षत्रिय बालक लव मात्र धनुष्यावर बाण चढवून लढण्याची तयारी करूं लागतो. रावणासारख्या वीराला ज्यानें मारलें, प्रत्यक्ष परशुरामाचाहि ज्यानें पराभव केला, त्या वीरश्रेष्ठ रामचंद्रानें

हा मेध्य अश्व सोडला आहे, हें माहीत असूनहि हा बारा वर्षांचा साहसी बालक अश्वाचें रक्षण करण्यास आलेल्या सर्व सेनेशीं व वेळ पडल्यास खुद्द रामचंद्राशींहि लढण्यास सज्ज असतो.

जनक, कौसल्या व अरुंधती यांच्यासारख्या माननीय वृद्धांशीं अतिशय विनयानें व आदरानें वागणारा लव, क्षत्रियाला अपमानकारक असे शब्द कानीं येतांच एकदम वीरोचित शौर्यानें व साहसानें श्रेष्ठांतल्या श्रेष्ठ क्षत्रियाशीं लढण्यास प्रवृत्त होतो. लवाच्या स्वभावांतील या दोन बाजू मोठ्या कुशलतेनें व नाजुकपणानें भवभूतीनें या अंकांत गुंफल्या आहेत. लढण्यास सज्ज झालेल्या लवाचें पुढें काय होतें या गोष्टीची उत्सुकता लावून हा अंक संपतो.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 37909 वि: निबंध
क्रमांक 15966 नोंद दि 20/2/65

# अंक पांचवा

## लव-चंद्रकेतु–आव्हान

'महाराजांच्या तुलनेंत जगांत कोणीच क्षत्रिय आतां उरला नाहीं' असे उद्गार कानीं येतांच लवाचें क्षत्रियत्व उसळून मेध्य अश्वाचें हरण करून त्याच्या रक्षणासाठीं सज्ज असलेल्या चतुरंग सेनेशीं लढण्यासाठीं लवानें धनुष्यावर बाण चढविलेला आपण गेल्या अंकांत पाहिला. बारा वर्षांचा हा क्षत्रिय वीर सर्व सेनेशीं एकटा लढूं लागतो आणि त्याच्या बाणवर्षावानें सेनेची दाणादाण होऊं लागते. इतक्यांत सुमंत्र सारथ्यानें वेगानें चालविलेल्या रथांत बसून सेनापति चंद्रकेतुच खुद्द युद्धभूमीवर येतो. त्याला पाहतांच 'आला, आपला आधार आला.' असे उद्गार सैनिकांकडून ऐकूं येतात. एक लहानसा ऋषिकुमार सर्व सेनेशीं लढत आहे, एवढेंच नव्हे तर आपल्या शर-तुषारांनीं सारें सैन्य व्यापून टाकीत आहे, हें पाहून संभ्रमित व आश्चर्यचकित झालेला चंद्रकेतु प्रवेश करतो. लवाचें तें शौर्य, तें साहस व ती तेजस्वी मूर्ति पाहून वयोवृद्ध सुमंत्राला सोळा वर्षांच्या रघुनंदनाची— रामाची आठवण होते.

सर्व सेना एकट्या लवावर प्रहार करीत आहे हें पाहून चंद्रकेतूला लाज वाटते. परंतु तेवढ्यांतच आपल्या सैन्याची दाणादाण होत असलेली त्याला दिसते व सेनेच्या मदतीस जाण्यासाठीं रथ वेगानें चालविण्यास तो सुमंत्राला सांगतो. या एवढ्या शूर वीराबरोबर चंद्रकेतु लढण्यास निघाला तर त्याचें काय होईल या आशंकेनें सुमंत्राचें मन विचलित होतें. परंतु एवढ्यांतच सेना पराभूत होऊन परतते आणि लव दृष्टीस पडतो. 'हे महाबाहु लवा, या सैनिकांशीं कसलें युद्ध करतोस ? मी तुझ्याबरोबर लढण्यास सज्ज आहें पाहा. तेजाचें शमन तेजानेंच होऊं दे.' असें बोलून चंद्रकेतु आपली युद्धसिद्धता प्रकट करतो. दोन समसमान वीरांनींच परस्परांशीं लढण्याची कल्पना लवाला फार पसंत पडते. परंतु एवढ्यांत परतलेल्या सेना पुन्हा युद्ध करण्यासाठीं सरसावलेल्या त्याला दिसल्यामुळें तो चिडून जातो.

चंद्रकेतु लागलीच त्याला म्हणतो, 'तुझ्या अद्‌भुत गुणामुळें तूं मला अतिशय प्रिय वाटतोस. जें माझें तें तुझेंच आहे. तेव्हां आपल्या या सेनेला कशाला मारतोस? तुझ्या शौर्याचा निकष हा चंद्रकेतु तुझ्यापुढें उभा आहे.'

त्याचें हें वीरवचन ऐकून लव सेनांकडे दुर्लक्ष करून चंद्रकेतूशींच लढण्याचें ठरवितो. परंतु पुन्हा सैन्याचा पुढें सरसावण्याचा आवाज ऐकूं येऊन तो क्रोधानें तिकडे वळून पाहूं लागतो. त्याच्या या वेळच्या आविर्भावाचें व आकृतीचें चंद्रकेतु पुढील शब्दांत सरस वर्णन करतो,

**दर्पेण कौतुकवता मयि बद्धलक्ष्यः**
**पश्चाद्बलैरनुसृतोऽयमुदीर्णधन्वा ।**
**द्वेधा समुद्धतमरुत्तरलस्य धत्ते**
**मेघस्य माघवतचापधरस्य लक्ष्मीम् ॥**

'कौतुकानें व शौर्याभिमानानें त्यानें मजवर प्रथम दृष्टि खिळविली होती. इतक्यांत समोरून येणाऱ्या सैन्यामुळें त्यानें तिकडे वळून धनुष्याला बाण लावला. इंद्रधनुष्य धारण करणारा मेघ झंजावातामुळें विरुद्ध दिशांना हेलकावे खाऊं लागला म्हणजे जसा सुंदर दिसतो, तसा हा धनुर्धारी शोभत आहे.'—

लवाकडून सैन्याकडे दृष्टि वळवितांच चंद्रकेतूला हें दिसून येतें कीं, हत्ती, घोडे, रथ आदि नाना वाहनांनीं व शस्त्रास्त्रांनीं युक्त असलेले राजे एकवटून एकट्या बालवयी लवावर शस्त्रास्त्रांचा मारा करण्यास सज्ज झाले आहेत. 'धिक्कार असो तुम्हांला व मलाहि.' असे उद्‌गार त्याच्या तोंडून निघतांच चंद्रकेतूला आपली दया आलेली पाहून तो वीरसिंह लव उसळतो. या सैन्याची कटकट अगोदर काढून टाकली पाहिजे, तरच चंद्रकेतूशीं आपणांस लढतां येईल हें जाणून लव चटकन् जृंभकास्त्र टाकून सेना जागच्या जागीं खिळवून टाकतो.

सैन्य जागच्या जागीं खिळलेलें पाहतांच ही जृंभकास्त्राची किमया आहे हें सुमंत्र व चंद्रकेतु हे दोघेहि चटकन् जाणतात. परंतु याला जृंभकास्त्र अवगत कसें झालें असावें याविषयीं त्या उभयतांत चर्चा सुरू होते. चंद्रकेतूला

वाटतें, वाल्मीकि ऋषींकडूनच हें अस्त्र लवाला मिळालें असावें. पण हें अस्त्र विश्वामित्रांकडून रामचंद्राला प्राप्त झालें. इतरांना तें अवगत नाहीं असें वयोवृद्ध सुमंत्र सांगतो. इतक्यांत सैन्याची तशी वाट लावून चंद्रकेतूशीं लढण्यासाठीं लव परततो. आतां दोघांच्या युद्धामध्यें कसलाच अंतराय उरला नसतो. धनुष्यबाण सरसावून व अस्त्रांचें स्मरण करून युद्ध सुरु करण्याचेंच तेवढें आतां उरलें असतें. परंतु लवाला जवळून पाहतांच चंद्रकेतूचें व चंद्रकेतूला पाहतांच लवाचें अंतःकरण अवर्णनीय स्नेहानें भरून येतें. 'याला पाहतांच माझें हृदय वेगानें त्याच्याकडे ओढलें गेलें आहे. तेव्हां हा पूर्वजन्मींचा स्नेह आहे कीं, त्याच्या गुणांमुळें मी आकर्षिला गेलों आहें, कीं आम्हांला माहीत नसतांहि आमचा कांहीं निकट नात्याचा संबंध आहे, हें मला कळतच नाहीं.' असें उभयतां उद्‌गारतात. परंतु त्याचबरोबर 'एकदां यानें आपलें शौर्य दाखविल्यानंतर आतां शस्त्रावांचून गतिच नाहीं. आणि शस्त्रांनादेखील याच्यासारखा विषय मिळाला नाहीं, तर त्या शस्त्रांत तरी काय अर्थ आहे? शिवाय धनुष्यबाण सरसावून मी एकदां पुढें झालों आहें. तेव्हां आतां मी मागें पाय घेतला, तर हा मला काय म्हणेल? वीरधर्म हा खरोखर मोठा कठीण आहे. स्नेहबंधांना तो मानीतच नाहीं.'—असेंहि उद्‌गार उभयतां परस्परांविषयीं काढतात.

वीरधर्म व स्नेहधर्म यांच्या ओढाताणींत चंद्रकेतु व लव सांपडले असतां, सुमंत्राचें मन एका वेगळ्याच आशेनें उसळतें. लवाकडे निरखून पाहतांच त्याचें रामचंद्राशीं व सीतेशीं असलेलें साम्य वृद्ध सुमंत्राच्या परिचित नेत्रांना तात्काळ दिसतें. रामचंद्राचा हा मुलगा असावा काय? अशी आशा मनांत स्फुरतांच, सीतात्याग व नंतर सीतेचा मृत्यु झाला असावा ही कल्पना यामुळें त्याची आशा जागच्या जागीं खुंटून जाते.

**मनोरथस्य यद्बीजं तद्दैवेनादितो हृतम्**
**लतायां पूर्वलूनायां प्रसवस्योद्भवः कुतः ॥**

'आशेचें बीज अशी जी सीता तीच तर दैवानें नाहींशी केली. पूर्वींच तोडून टाकलेल्या वेलीच्या फुलाची आशा धरणें शक्य आहे का?'

परस्परांशीं लढण्यासाठीं लव व चंद्रकेतु समोरासमोर उभे ठाकले खरे. पण एकमेकांविषयीं उत्पन्न झालेल्या उत्कट प्रेमासुळें तो लढण्याचा क्षण पुढेंपुढें ढकलण्याचा मार्ग त्यांचीं मनें नकळतच शोधीत होतीं. सुमंत्रास रथ थांबवण्यास सांगून खालीं उतरण्याची इच्छा चंद्रकेतूनें प्रकट केली. एक तर लवाचा आदर करण्यासाठीं आणि रथस्थानें पादचारीशीं युद्ध करूं नये अशी आज्ञा असल्यामुळें मी रथांतून उतरणें हेंच योग्य आहे असें तो म्हणतो. शूर लवाशीं युद्ध करण्यासाठीं चंद्रकेतु रथांतून खालीं उतरला, तर त्याच्या जयाची थोडीहि आशा धरणें शक्य नाहीं, हें सुमंत्रास माहीत असल्यामुळें त्याचें मन द्विधा होतें. परंतु युद्धशास्त्राच्या नियमानुसार चंद्रकेतूचेंच करणें बरोबर आहे हेंहि तो जाणतो. आणि चंद्रकेतूला धीर देण्यासाठीं तो म्हणतो, ‘ तुझ्या पित्यानें इंद्रजिताला मारलें, त्याला किती थोडे दिवस झाल्यासारखे वाटतात. त्याचा पुत्रहि आतां वीरधर्म उत्तम पाळीत आहे. तेव्हां रघुकुलाची प्रतिष्ठा उत्तम तऱ्हेनें राखली जात आहे. ’—हे शब्द ऐकतांच चंद्रकेतूला पुत्रहीन रामचंद्राची आठवण होते. ‘ रघुज्येष्ठाला पुत्र नाहीं तेव्हां रघुकुलाची प्रतिष्ठा ( स्थायित्व ) कोठें उरली आहे ? याच गोष्टीनें तर इतरहि तीन बंधु नेहमीं दु:खित असतात. ’ रामचंद्राच्या पुत्रहीनत्वामुळें चंद्रकेतु व सुमंत्र दु:खित होत असतात आणि त्यांच्या समोरच रामचंद्राचा पराक्रमी पुत्र उभा असतो, पण त्यांना तें माहीत नसतें. हा विरोधाभास अतिशय सुंदर तऱ्हेनें भवभूतीनें दाखविला आहे.

सुमंत्र–चंद्रकेतूचें वरीलप्रमाणें संभाषण चाललें असतां, लवाच्याहि मनांत मिश्र भावना उसळत असतात. ‘ चंद्रोदयाबरोबर कुमुदिनीला व्हावा तसा आनंद याला ( चंद्रकेतूला ) पाहतांच मला झाला. परंतु माझा हा धनुष्य-धारी बाहु मात्र युद्ध करण्यासाठीं फुरफुरत आहे. ’—इतक्यांत रथांतून उतरून चंद्रकेतु लवाला अभिवादन करतो. आतां लवकरच यांचें युद्ध होणार या विचारानें चंद्रकेतूचें रक्षण करण्यासाठीं सुमंत्र मनांतल्या मनांत नाना देवांवर भार टाकतो. परंतु चंद्रकेतु खालीं उतरतांच लव त्याला पुन्हा रथांत बसण्याचा आग्रह करतो. ‘ मग तूंहि दुसऱ्या रथांत बैस. ’ असें चंद्रकेतु त्याला सांगतो. त्याबरोबर ‘ आपलीं परिचित साधनें वापरण्याबद्दल सांगण्याचें कांहीं प्रयोजन आहे का ? पण आम्ही पडलों अरण्यवासी. रथ

चालविण्याची आम्हांला संवय नाहीं, एवढेंच.' त्याचें तें सौजन्य पाहून सुमंत्र हर्षित होतो; 'अभिमान व सौजन्य या दोहोंचाहि योग्य वेळीं कसा आविष्कार करावा हें तूं पुरेपूर जाणतोस. राजा रामचंद्र जर तुला पाहील, तर त्याचें हृदय निःसंशय प्रेमानें भरून येईल.' हे सुमंत्राचे शब्द ऐकतांच लव लज्जित होतो व 'राजा रामचंद्र अतिशय सज्जन आहेत असें मीं ऐकलें आहें. मी सुद्धां अश्व हरण करून त्यांच्या अश्वमेध यज्ञाचा असा खोळंबा केला नसता. परंतु अश्वाचें रक्षण करणाऱ्या पुरुषानें क्षत्रियांना अपमानकारक असे जे शब्द उच्चारले, त्यामुळें माझा अपमान झाल्यासारखें मला वाटलें. म्हणूनच मी या युद्धास प्रवृत्त झालों.' असें तो मोकळ्या मनानें सांगून टाकतो.

'रामचंद्रांच्या तुलनेंत कोणीच क्षत्रिय पृथ्वीवर नाहीं.' असें म्हटल्यानें लवाला अपमान कां वाटावा हें चंद्रकेतूला कळत नाहीं. लव उत्तर देतो, 'रघुनाथ उदार आहेत. ते स्वतः गर्विष्ठ नाहींत किंवा त्यांची प्रजाहि उद्धटपणानें वागत नाहीं. मग या अश्वरक्षकानें मात्र राक्षसांनाच शोभेल अशा उद्धटपणानें कां बोलावें ?–शिवाय रामचंद्रांच्या शौर्याचा उत्कर्ष मला कां सहन होऊं नये असें तूं विचारतोस. पण मीच तुला विचारतों कीं, शौर्याचा मक्ता एकट्या रामचंद्रांनींच घेतला आहे कीं काय ?'

लवाचें हें वचन ऐकतांच वयोवृद्ध सुमंत्राचाहि पारा थोडा वर चढतो. 'सैन्याला तूं मागें हटविलेंस म्हणून तुला थोडा गर्व चढला आहे; परंतु प्रत्यक्ष जमदग्निपुत्र परशुरामाचा ज्यानें पराभव केला, त्या राजा रामचंद्रांच्या बाबतींत तूं असें बोलणें हें मात्र योग्य नाहीं.' सुमंत्राच्या शब्दांनीं लवाचाहि पारा वर चढतो. तो किंचित् तिरस्कारयुक्त हास्य करून उद्गारतो,

**सिद्धं ह्येतद्वाचि वीर्यं द्विजानां**
**बाह्वोर्वीर्यं यत्तु तत्क्षत्रियाणाम्– ।**
**शस्त्रग्राही ब्राह्मणो जामदग्न्य–**
**स्तस्मिन्दान्ते का स्तुतिस्तस्य राज्ञः ॥**

'परशुरामाचा पराभव राजा रामचंद्रानें केला म्हणजे कांहीं फार मोठा पराक्रम नव्हे. ब्राह्मणांचें शौर्य त्यांच्या वाणींत असतें आणि क्षत्रियांचें त्यांच्या बाहूंत असतें हें सर्वश्रुत आहे. बोलूनचालून ब्राह्मण परशुरामानें हातीं शस्त्र धरलें, तेव्हां त्याचा पराभव केला म्हणून रामचंद्राचें शौर्य थोर असें कोण म्हणेल ?'

शब्दप्रतिशब्द वाढत जातांच चंद्रकेतूहि संतापतो. ‘ भगवान् परशुरामहि ज्याला वीरपुरुष वाटत नाहीं असा हा कोणी मोठाच वीरपुरुष दिसतो आहे. ज्यांच्या शौर्यामुळें सप्त लोकांना अभय मिळालें, त्या रामचंद्रांचेंहि शौर्य याच्या खिसगणतींत नाहीं ! ’ लवानें उत्तर दिलें,

**वृद्धास्ते न विचारणीयचरितास्तिष्ठन्तु किं वर्ण्यते**
**सुन्दस्त्रीमथनेऽप्यकुंठयशसो लोके महान्तो हि ते ।**
**यानि त्रीण्यपराङ्मुखान्यपि पदान्यासन्खरायोधने**
**यद्वा कौशलमिंद्रसूनुनिधने तत्राप्यभिज्ञो जनः ।।**

‘ रघुपतीचें चरित्र व महिमा कोण जाणत नाहीं ? पण हीं वृद्ध माणसें आहेत. तेव्हां त्यांच्या कृत्यांची जास्त चर्चा न करणेंच बरें. त्यांत वर्णन करण्यासारखें काय आहे ? सुंदर स्त्री ताटका हिचा ज्यानें वध केला, त्याच्याहि यशाचा महिमा लोक गातात. खर राक्षसाशीं लढतांना हा वीर तीन पावलें मागें कसा सरला, आणि वालीचा यानें कपटानें कसा वध केला हें सारें मला माहीत आहे ’—रामायणकथा लवाला मुखोद्गत होती. राम हा आपला पिता आहे हें त्याला माहीतच नव्हतें. तेव्हां रामायणकथेंत जे रामाचे तीन दोष वर्णिले आहेत, त्यांचाच नेमका उल्लेख करून रामाच्या शौर्याविषयीं लवानें उपहास दर्शवावा हें अस्वाभाविक नव्हतें. अरण्यवासी व साध्या, सरळ स्वभावाचा असा तो मुलगा असतो. एखाद्या कथेंतील व्यक्तीच्या गुणावगुणांविषयीं त्रयस्थानें चर्चा करावी त्याप्रमाणें तो बोलत असतो. अश्वरक्षकाच्या त्या क्षत्रियांना अपमानकारक वाटणाऱ्या उद्गारांनीं त्याचा अभिमान चेतवला गेला असतो. त्याचें क्षत्रियत्व व शौर्य हें वर उसळून आल्यानंतर त्यांना बांध घालणारा असा कोणताहि स्नेहपाश त्याला नसतो. ना आई, ना बाप. आईबापांचाच जेथें पत्ता नाहीं, तेथें इतर निकट नात्यांचीं बंधनें असणें संभवनीयच नाहीं. गुरु भगवान् वाल्मीकिहि ब्रह्मचारी. तेव्हां गुरुपत्नीचें मातृवत् प्रेमहि त्याला लाभलेलें नसतें. तेव्हां अशा परिस्थितींत वाढलेल्या लवाला शौर्यच श्रेष्ठ वाटावें हें साहजिकच आहे. रामचंद्राच्या शौर्याविषयीं आक्षेप घेतांना व त्याचा अधिक्षेप करतांना आपण प्रत्यक्ष आपल्या पित्याचाच अधिक्षेप करीत

आहोंत, हें त्या टाकलेल्या बालकाला कसें माहीत असणार ? पण त्याला माहीत नसलें, तरी प्रेक्षकांना तें चवथ्या अंकांतच अरुंधतीच्या मुखानें स्पष्टपणें कळतें व त्यामुळें त्यांना लवाचा हा गर्व करुणामयच वाटतो.

लवाचा परिहास ऐकून चंद्रकेतु अतिशय संतापतो. 'वडिलांच्याविषयीं असे आक्षेप घेऊन तूं आपली मर्यादा ओलांडली आहेस. तेव्हां आतां युद्धाशिवाय गति नाहीं.' आपल्या चुलत्याविषयीं घेतलेल्या आक्षेपांमुळें पुतण्यानें संतापून युद्धास उद्युक्त व्हावें आणि मुलानें अजाणतां आपल्या पित्यावरच प्रहार करावे, हा विरोध प्रेक्षकांनाच कळूं शकतो व युद्धाला प्रवृत्त झालेल्या या दोन चुलत भावांच्या युद्धाचा काय शेवट होतो इकडे त्यांचें लक्ष लागून राहतें.

आई-वडील, चुलते व जवळचे सर्व प्रेमळ नातेवाईक यांच्या दृष्टीखालीं वाढलेल्या शूर चंद्रकेतूच्या शौर्यांतहि एक प्रकारचा नाजुकपणा आहे. एकट्या लवावर सर्व सेना प्रहार करीत असल्याचें पाहून त्याचें हृदय कंपित होतें व तो आपल्या सैनिकांचा धिक्कार करतो. लवाच्या शौर्याचें तो वारंवार कौतुक करतो व सहृदयतेनें त्याच्या हालचालींचें वर्णन करतो. लव रथांत नाहीं तेव्हां आपण रथांतून उतरूनच त्याच्याशीं युद्ध केलें पाहिजे हें जाणून तो चटकन् रथांतून उतरतो. आणि आपल्या थोर चुलत्याचा, रामचंद्राचा लवानें उपहास करतांच तो उत्तेजित होऊन युद्धास सज्ज होतो. लव मात्र सर्व निकटच्या स्नेहसंबंधांना मुकलेला व आश्रमांत वाढलेला. त्याला शौर्याचें व स्वाभिमानाचेंच मोल साहजिक जास्त वाटतें. जवळजवळ सारख्या वयाच्या या दोन भावांमधील हें साम्य-वैषम्य वयोवृद्ध सुमंत्राच्या उपस्थितीमुळें अधिकच खुलून दिसतें.

वस्तुत: मेध्य अश्व लवानें हरण केला, तेव्हां अश्वरक्षणासाठीं आलेला चंद्रकेतु व लव यांमध्यें युद्ध होणें आवश्यकच होतें. पण परस्परांना पाहतांच त्यांना जो अकारण उत्कट स्नेह वाटूं लागला, त्यामुळें युद्धक्षण लांबत चालला. पण अखेर रामचंद्राचा लवानें जो उपहास केला, त्यामुळें तो लांबत चाललेला युद्धक्षण एकदम उभा ठाकला.

◎ ◎ ◎

# अंक सहावा

## कुमारप्रत्यभिज्ञान

सहाव्या अंकाचा जो परिचय-प्रवेश किंवा विष्कंभक आहे, त्यांत विमानारूढ अशा विद्याधर व विद्याधरींच्या संवादांतून लव-चंद्रकेतूंच्या युद्धाचें वर्णन दिलें आहे. लव—चंद्रकेतूंचा संग्राम विमानांत बसून चाललेलें विद्याधर-मिथुन कौतुकानें पाहत आहे व युद्धाच्या एकेका अवस्थेचें वर्णन करीत आहे. प्रथम चंद्रकेतूनें अग्न्यस्त्र सोडल्यामुळें जिकडे तिकडे अग्निज्वालांचा भडका उठतो. आकाशांतून जाणाऱ्या विमानांनाहि त्यांची झळ पोंचते. विद्याधर-मिथुनहि झपाट्यानें आपलें विमान दूर नेतें. अग्न्यस्त्राचें वर्णन व विमानांच्या हालचाली यामुळें हें विसाव्या शतकांतील युद्धच आहे कीं काय असाच क्षणभर भास होतो.

इतक्यांत लव वारुणास्त्र सोडतो व त्यानें निर्माण केलेल्या सहस्र जलधारांमुळें सगळीकडील अग्नि शांत होऊन जातो. एक डाव फसल्यामुळें चंद्रकेतु वायव्यास्त्र सोडतो. आकाशांतील मेघ इतस्ततः विखरून जातात. इतक्यांत विद्याधरी विचारते, ' युद्ध थांबविण्याची आज्ञा गंभीर आवाजांत देऊन लव-चंद्रकेतूंच्या मध्यें हें विमान कोणीं बरें उतरविलें ? ' विद्याधर उत्तर देतो, ' शंबूकवधानंतर परत जाणारा हा रामचंद्रच आहे. या महापुरुषाची आज्ञा ऐकून युद्ध थांबवून लव शांत उभा आहे आणि चंद्रकेतु विनयानें मस्तक नम्र करून उभा आहे. '

विष्कंभक संपतो व वर वर्णिल्याप्रमाणें रामचंद्र व लव-चंद्रकेतु प्रवेश करतात. शंबूकवधानंतर पंचवटींतून निघालेला राम वाटेंत चंद्रकेतूचें कोणा ऋषिकुमाराशीं युद्ध होत असलेलें पाहून, त्यांना थांबण्याची आज्ञा देऊन विमान खालीं उतरवितो.

तिसऱ्या अंकामध्ये पंचवटींत सीतेच्या स्मृतींनीं शोकविव्हल झालेला राम आपण पाहिला. तेथूनच त्याच शोकदग्ध स्थितींत तो या युद्धभूमीवर

अवतरतो. साहजिकच त्याच्या मनाचा चित्तदाह अजून शमलेला नसतो. चंद्रकेतु दृष्टीस पडतांच ' ये ये, मला गाढ आलिंगन दे. तुझ्या सौम्यशीतल अंगानें माझा चित्तदाह शमन होऊं दे. ' असे उद्गार सहजच त्याच्या मुखांतून बाहेर पडतात. कुशल प्रश्न होतांच लवाकडे अंगुलिनिर्देश करून हा माझा प्रिय मित्र आहे असें चंद्रकेतु रामास मोठ्या कौतुकानें सांगतो. एवढेंच नव्हे तर ' या विलक्षण साहसी वीराकडे तातांनीं मजप्रमाणेंच किंवा माझ्याहूनहि अधिक प्रेमानें पहावें. ' असें सुचवितो.

चंद्रकेतूपेक्षांहि अधिक प्रेमानें रामानें लवाकडे पहावें असेंच वस्तुतः त्यांचें नातें आहे, पण तें तिघांपैकीं कोणालाहि माहीत नसल्यामुळें चंद्रकेतूच्या शब्दांचा त्यास अपरिचित असा अर्थ ध्यानांत येऊन प्रेक्षकांस विशेष मौज वाटते. लवाकडे दृष्टि फेंकतांच रामचंद्राचें हृदय हेलावून जातें. ' हा तुझा मित्र अतिगंभीर—मधुराकृति आहे खरा. विश्वरक्षणासाठीं प्रत्यक्ष अस्त्रविद्याच मनुष्यदेह धारण करून आली आहे कीं काय असें याच्याकडे पाहून वाटतें. साऱ्या जगांतील पुण्यराशी जणूं मनुष्यरूपानें पुढें उभ्या ठाकल्या आहेत असें वाटतें.'—असे शब्द त्याच्या मुखांतून बाहेर पडतात. लवाचीहि तशीच स्थिति होते. ज्या रामाच्या पराक्रमवर्णनामुळें त्याचें क्षत्रियत्व वर उसळून आलेलें असतें व ज्याच्या शौर्याचा अधिक्षेप केल्यामुळें चंद्रकेतु युद्धास आव्हान करतो, तोच राम समोर दिसतांच लवाला महापुरुषाचा साक्षात्कार होतो.

' आश्वासन, स्नेह व भक्ति यांचें हें जणूं अधिष्ठान आहे. श्रेष्ठतम धर्माचा हा मूर्तिसुंदर प्रसाद आहे. यांच्याकडे पाहतांच माझा विरोध शांत झाला आहे. एक प्रकारच्या शांत समाधानानें मन भरून गेलें आहे. माझें औद्धत्य कोठल्या कोठें नाहींसें होऊन विनय मला विनम्र करून टाकीत आहे. यांना पाहतांच यांच्याच प्रभावानें मी भारून गेलों आहे. खरोखर तीर्थक्षेत्रांप्रमाणेंच थोर पुरुषांचाहि मनावर कांहीं विलक्षण प्रभाव पडतो. '

' याला पाहतांच मला एकदम दुःखाचा विसर कसा पडला ? कोणत्या कारणामुळें याच्याविषयीं मला प्रेम वाटूं लागलें ? ' असा प्रश्न राम स्वतःला करतो व स्वतःच उत्तर देतो—

व्यतिषजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतुः
न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयन्ते ।
विकसति हि पतंगस्योदये पुण्डरीकम् ।
द्रवति च हिमरश्मावुद्गते चंद्रकान्तः ॥

' कोठल्या तरी आंतरिक हेतूंमुळें व्यक्ति वा वस्तु जोडल्या जातात. बाह्य कारणांवर प्रीति कधींच अवलंबून राहत नाहीं. सूर्योदयाबरोबर सूर्यविकासी कमल उमलतें. चंद्रोदयाबरोबर चंद्रकांतमणि आपोआपच पाझरूं लागतो. '— रामाचें पुण्डरीक लवाच्या दर्शनामुळें विकसलें. त्याच्या हृदयाचा चंद्रकांत वात्सल्यानें पाझरूं लागला.

इकडे लव चंद्रकेतूला हळूच विचारतो, ' हे आहेत तरी कोण ? ' ' प्रिय मित्रा, हे तात आहेत. ' ' तूं मला प्रिय मित्र म्हटलेंस; तेव्हां धर्मानें माझेहि हे तात आहेत. पण कोणते तात ? ' ' हे ज्येष्ठ तात. ' ' म्हणजे ? रघुनाथ कीं काय ? आज सोन्याचा दिवस उगवला म्हणायचा, कारण आज महाराजांचें दर्शन घडलें. ' रामाकडे वळून लव म्हणतो, ' महाराज, वाल्मीकींचा शिष्य लव आपणांस अभिवादन करीत आहे. ' राम त्याला जवळ घेऊन प्रेमानें आलिंगन देतो. याच्या आलिंगनानें आपणांस विशेषच आनंद व समाधान वाटत आहे याचा अनुभव रामास येतो. पितापुत्रांची भेट होते. परस्परांना एका अननुभूत सुखाचा प्रत्यय येतो. पण आपण पितापुत्र आहोंत हें उभयतांनाहि माहीत नसतें—' यांना माझ्याविषयीं इतकें प्रेम वाटतें आणि मी मात्र अजाणपणीं यांचा द्रोह करण्यास सिद्ध झालों होतों. ' हें ध्यानांत येऊन लव लज्जित होतो. ' तातांनीं लवाला बालिशतेबद्दल क्षमा करावी. ' असें तो रामाला विनवितो. ' कसली बालिशता ? ' असें विचारतांच रामाच्या पराक्रमाबद्दल ऐकून लव कसा उसळला हें चंद्रकेतु सांगतो. राम लागलीच म्हणतो,

न तेजस्तेजस्वी प्रसृतमपरेषां विषहते
स तस्य स्वो भावः प्रकृतिनियतत्वादकृतकः ।
मयूखैरश्रान्तं तपति यदि देवो दिनकरः
किमाग्नेयो ग्रावा निकृत इव तेजांसि वमति ॥

'हा तर क्षत्रियाचा अलंकार आहे. तेजस्वी पुरुष इतरांच्या पराक्रमाचें वर्णन सहन करीत नाहीं. तो त्याचा स्वभावच आहे. सूर्य दिवसभर अविश्रांत तापत असतां, अग्निग्रावा जणूं, स्वतःचा अपमान झाल्याप्रमाणें जळत कां राहतो ? हा त्याचा सहजस्वभावच आहे.'

लवानें जृंभकास्त्रानें सारें सैन्य कसें स्तब्ध करून टाकलें आहे हें चंद्रकेतु रामाला दाखवितो. त्याबरोबर अस्त्र परत घेण्यास राम लवास सांगतो व पुन्हा हालचाल करूं लागणाऱ्या सैन्यास शांत करण्यासाठीं चंद्रकेतूला पाठवितो. जृंभकास्त्र या बालकाला कोठून प्राप्त झालें असावें हें समजण्यासाठीं तुला कोणाकडून हें अस्त्र प्राप्त झालें असें तो लवाला विचारतो. 'आम्हां दोघांना जन्मतःच हें अस्त्र अवगत आहे' असें उत्तर मिळतांच 'तुम्ही दोघे कोण ?' असा प्रश्न राम विचारतो. 'आम्ही जुळे भाऊ आहोंत' असें लव सांगत आहे, इतक्यांत पडद्यांतून कुशाचाच आवाज ऐकूं येतो. 'लवाचें राजाच्या सैन्याशीं युद्ध सुरू आहे असें ऐकलें. आतां साऱ्या पृथ्वीचा अधिराजा हे शब्द जगांतून नाहींसे होऊं देत. आणि क्षत्रियांच्या शस्त्रांतून निघणाऱ्या ज्वाला शांत होऊं देत.' पृथ्वीचा अधिराजा मी आहें हें सिद्ध करण्यासाठीं रामानें अश्वमेध सुरू केला व मेध्य अश्व सोडला; पण त्याच्या अश्वाचें हरण करणारे व 'अधिराजा' या पदवीवर तुटून पडणारे दोन्ही रामाचेच पुत्र निघाले. रामाच्या दर्शनानें लवाचें औद्धत्य शांत झालें, पण कुश नुकताच भरताश्रमांतून परत आला होता, तेव्हां त्याचे बाहु युद्धाची संधि येतांच फुरफुरूं लागावे हें स्वाभाविकच होतें.

दुरूनच कुश दिसतांच व त्याचा आवाज ऐकतांच रामाचें मन हेलावतें व तो लवाचा मोठा भाऊ कुश आहे हें कळतांच त्याला बोलविण्यास तो लवाला पाठवितो. रघुकुलांतील थोर पराक्रमी वीरांशीं लढण्यास मिळणार या आशेनें कुश धनुष्य घेऊन मोठ्या अभिमानानें पुढें सरसावतो. त्याचा तो आविर्भाव पाहून रामाचें मन कौतुकानें भरून येतें.

**दृष्टिस्तृणीकृतजगत्त्रयसत्त्वसारा**
**धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम् ।**
**कौमारकेऽपि गिरिवद्गुरुतां दधानो**
**वीरो रसः किमयमेत्युतदर्प एव ॥**

'याची दृष्टि अशी आहे कीं, त्रैलोक्याचें सारहि तिला तृणवत्च वाटावें असें दिसतें. याचीं पावलें अशा दृढतेनें पडत आहेत कीं, जणूं पृथ्वीला तीं नमवीतच आहेत. बालक असून एखाद्या पर्वताप्रमाणें याच्या ठायीं मोठेपणा आहे. जणूं गर्व अथवा वीररसच मनुष्यदेह धारण करून येत आहे असें वाटतें.'

लव जवळ येतांच कुश विचारतो, 'हें युद्ध कसलें आहे ?' 'आहे आपलें असेंच; पण आतां वीरभाव टाकून विनयानें वागा.' 'कां बरें ?' 'खुद्द रघुनाथ तेथें आले आहेत व तुम्हांला बोलावीत आहेत आणि चंद्रकेतु मला प्रिय मित्र म्हणत असल्यामुळें ते आपलेहि धर्मतात आहेत.' लवकुश रामाजवळ पोंचतांच, 'खरोखर यांचें रूप व थोरपणा प्रासादिक आहे. कवींनीं रामायण रचण्यांत वाणीला झिजविलें तें अगदीं यथायोग्यच आहे.' असें कुश म्हणतो. कुशाला आलिंगन देतांच, 'हा आपला पुत्र तर नाहीं ?' अशी शंका प्रथम रामाच्या मनांत येते. कुशलवांच्या हालचाली पाहून हे निश्चित राजकुमार असले पाहिजेत असें रामाला वाटतें. त्या दोघांमध्यें रघुकुलकुमारांचें साम्य तर दिसतेंच; पण सीतेच्याहि मुखाचें साम्य दिसतें. जों जों त्या दोघांकडे राम सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागतो, तों तों त्यांच्या हंसण्या-बोलण्यांत, आवाजांत व लहानसहान गोष्टींत आपलें व सीतेचें साम्य असल्याचें त्याच्या अधिकाधिक प्रत्ययास येतें. वाल्मीकि-आश्रमाजवळच्याच अरण्यांत सीतेला टाकलें होतें याची त्याला आठवण होते. त्याचप्रमाणें त्यांचें वयहि त्या काळाशीं जुळणारेंच असतें. तसेंच चित्रपटदर्शनाच्या वेळीं जृंभकास्त्र तुझ्या मुलांना जन्मतःच प्राप्त होईल असा आशीर्वाद रामानें सीतेला दिलेला असतो. त्याप्रमाणें या मुलांना जन्मतःच हें अस्त्र अवगत असलेलें आढळून येतें. सीता गरोदर असतां तिला जुळीं मुलें होणार असें आपणांस तेव्हांच माहीत होतें, हें रामास आठवतें व हीं मुलें जुळींच असतात.

एकामागून एक गोष्टी जुळत आलेल्या भासल्यामुळें रामाचें हृदय सीतेच्या त्या वेळच्या आठवणींनीं भरून येतें. नेत्रांतून अश्रु ओघळतात. तें पाहतांच कुश-लवांना दुःख होतें. रामाला दुःख कां होत असावें याचें कारण लवाला सांगतांना कुश म्हणतो,

विना सीता देव्या किमिव हि न दुःखं रघुपतेः
प्रियानाशे कृत्स्नं किल जगदरण्यं हि भवति ।
सच स्नेहस्तावानयमपि वियोगो निरवधिः ।
किमेवं त्वं पृच्छस्यनधिगतरामायण इव ॥

'सीतादेवी गेल्यानंतर रघुपतीला कोणत्याहि गोष्टीनें दुःख होणें साहाजिक आहे. प्रिय व्यक्तीच्या मृत्यूनंतर सारें जग अरण्यवत् वाटतें. त्या उभयतांचें परस्परांवर केवढें प्रेम होतें आणि आतां हा अनंत विरह उभा आहे. हें सारें माहीत असून रामायण न शिकलेल्या माणसाप्रमाणें रघुनाथाच्या दुःखाचें कारण काय विचारतोस ?'

कुशाचें हें बोलणें ऐकतांच, राम व सीता या कोणी कथेंतील व्यक्ति असल्या-प्रमाणें हा बोलत आहे, तेव्हां हा आपला मुलगा आहे ही आपली कल्पना चुकीचीच आहे, असें रामाला वाटतें; पण त्याबरोबर आशेचा भंग झाल्या-मुळें तो अत्यंत व्यथित होतो. पण आपल्या शोकाचा पत्ता या मुलांना लागूं नये म्हणून राम त्यांना विचारतो, 'बाळांनो वाल्मीकींचें रामायण तुम्हांला माहीत आहे ना ? त्यांतलें कांहीं म्हणून दाखवा पाहूं.'

कुश एक मार्मिक श्लोक म्हणतो,

प्रकृत्यैव प्रिया सीता रामस्यासीन्महात्मनः
प्रियभावः स तु तया स्वगुणैरेव वर्धितः ।
तथैव रामः सीतायाः प्राणेभ्योऽपि प्रियोऽभवत्
हृदयं त्वेव जानाति प्रीतियोगं परस्परम् ॥

'रामसीता हीं परस्परांना प्राणापेक्षांहि प्रिय होतीं. त्यांचें परस्परप्रेम त्यांच्या हृदयांनाच माहीत होतें. इतरांना कळणेंहि कठीण.'—कुशाच्या श्लोकांनीं सीतेच्या एकेक गुणाचें स्मरण होऊन राम अधिकच विव्हल होतो. आपल्या प्रीतीच्या एकेक गोष्टी आठवून, 'केवढें आमचें हृदयाचें ऐक्य होतें आणि तरीहि तिच्यावांचून मी आज जिवंत आहें.' या जाणिवेनें त्याला अधिकच दुःख होतें.

लव रामायणांतील आणखी एक श्लोक म्हणतो, 'ही समोरची शिला जणूं तुझ्यासाठींच येथें ठेवली आहे. आणि तिच्याभोंवतीं बकुल वृक्षानें

पुष्पांचा सडा पाडला आहे.' रामसीतेचे हे प्रणयप्रसंगांतील शब्द लव-कुश एखाद्या कथेंतील श्लोकांप्रमाणें तटस्थपणें म्हणत असतात. 'हीं लहान मुलें आणि त्यांतून अरण्यवासी. त्यांना काय सांगावें आणि काय नाहीं हें कुठून कळणार ?' असें म्हणून राम त्या काळच्या एकेक आठवणी काढतो.

राम व कुश-लव यांचें हें असें भाषण चालू असतां, 'मुलांच्या युद्धाचा आवाज ऐकून वसिष्ठ, वाल्मीकि, जनक, दशरथमहिषी व अरुंधती ही सर्व मंडळी येथें आली आहेत' असें पडद्यांतून ऐकू येतें. तें ऐकतांच, 'तात जनकहि दैवानें येथें आले आहेत. या मंदभाग्यावर हा जणूं वज्राघातच झाला आहे' असें राम चटकन् बोलून जातो. 'जनक व रघु या दोन घराण्यांमधील विवाहसंबंधांमुळें व परस्परप्रेमामुळें आजवर उभयतांत केवढा स्नेहभाव होता. पण आतां या भयंकर परिस्थितींत माझ्या पित्याच्या मित्राला पाहिल्यावरहि माझें हृदय सहस्रधा विदीर्ण होत नाहीं. बाकी त्यांत आश्चर्य कांहीं नाहीं. रामाला दुष्कर असें काय आहे ? 'करूं नये अशा सीतात्यागासारख्या व शंबूकवधासारख्या गोष्टी या रामानें केल्या आहेत. तेव्हां आतां आणखी भयंकर काय असणार ?'—राम याप्रमाणें स्वतः-चाच अधिक्षेप करून घेत असतां तिकडे सीताशोकामुळें कृश झालेला राम पाहून जनक मूर्च्छित होतात. रामाचें हृदय अत्यंत व्याकुळ होतें. 'जनक व रघु या कुलांत सर्वांत मंगलतम अशी जी सीता तिच्याच बाबतींत मी एवढा भयंकर निष्ठुरपणा केल्यानंतरहि कां माझ्यावर करुणा दाखवितां ?' असें तो जनक व कौसल्यादि माता यांना उद्देशून म्हणतो. परंतु कसेंबसें मन सावरून त्यांना भेटण्यासाठीं कष्टानें पाऊल टाकतो.

सहावा अंक सुरू होतो तो, राम चंद्रकेतूच्या भेटीनें. नंतर लवकुशांची भेट होते ती तर आनंदाच्या ऊर्मीवर ऊर्मि उसळवीत. सीतेच्या स्मरणामुळें व्यथित असतांहि लवकुशांच्या स्वतःशीं व सीतेशीं असणाऱ्या साम्यामुळें रामाचें मन अधिकाधिक आशेनें भरून येतें. एकेक खूण पटूं लागते. पण तेवढ्यांत रामायणांतील व्यक्तींविषयीं कुश-लव तटस्थपणानें बोलत असलेले ऐकून रामाच्या आशेचा भंग होतो. आणि आशाभंगाचें दुःख जणूं अपुरें आहे असें वाटूनच कीं काय, जनक व कौसल्या यांनाहि भेटण्याचें शोककारक कार्य रामाला करणें भाग पडतें.

कुश-लव हीं रामाचीं मुलें आहेत हें प्रेक्षकांना कळतें. रामाला आशा वाटते; पण ती नष्ट होते. जनक-कौसल्यादींनाहि लव-कुश हीं रामाचीं मुलें हें माहीत नसतें. दोन्ही मुलें रामाच्या, जनकाच्या, कौसल्येच्या चित्तांना चटका लावतात, आशा उत्पन्न करतात; पण यापलीकडे त्यांना निश्चित असें कांहीं कळत नाहीं. ओळख पटण्याची पार्श्वभूमि या अंकांत पुरी केली आहे; पण प्रत्यक्ष ओळख आणि मीलन हीं मात्र सातव्या व शेवटच्या अंकाकरितां राखून ठेवलीं आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप
अनुक्रम .................... वि: ..........
क्रमांक .................... नों दि: ..........

# अंक सातवा

## सम्मेलन

संस्कृत नाट्यामध्यें शोकान्त नाटकाला स्थान नव्हतें. त्यामुळें कोणतेंहि कथानक नाट्यासाठीं घेतलें, तरी त्याचा शेवट सुखान्त करण्यासाठींच नाटककाराला आपली प्रतिभा खर्ची घालावी लागे. मूळ रामायणामध्यें, कुश-लवांना व सीतेला घेऊन वाल्मीकि रामाच्या निमंत्रणावरून ‘ रामायण ’ दाखविण्यासाठीं अयोध्येस जातात. तेथें अनेक वर्षांच्या विरहदु:खामुळें व अकारण त्यागाच्या शल्यामुळें कृश झालेल्या सीतेला रामाचें दर्शन होतें. परंतु संसारांत शिरण्यास तिचें मन घेत नाहीं. उलट आपल्या पातिव्रत्याची व निष्कलंकतेची साक्ष एकदां सर्व लोकांसमक्ष रामाला पटवून मगच इह-लोकाचा निरोप घ्यावा या इच्छेनें ती सर्वांसमक्ष सांगते, ‘ रामावांचून दुसऱ्या कुणाचेंहि मीं कधीं चिंतनहि केलें नसेन तर हे पृथ्वीमाते, मला उदरांत घे. ’ तिच्या मुखांतून हे शब्द बाहेर पडतात न पडतात तोंच पृथ्वी दुभंग होऊन एक सिंहासन बाहेर येतें व त्यावर बसून सर्वांसमक्ष सीता पृथ्वीच्या उदरांत गडप होते. पुत्रांच्या व प्रियपत्नीच्या दीर्घकालानंतर झालेल्या भेटीमुळें क्षणकाल आनंदित झालेला राम सीतेच्या या कायमच्या अंतर्धाना-मुळें दु:खानें विव्हल होतो, व आतां आपले पुत्र राज्य चालविण्यास समर्थ आहेत, तेव्हां राजकर्तव्यासाठीं सीतेचा जो अकारण विरह आपणांस सहन करावा लागला, तो यापुढें साहण्याचें कारण उरलें नाहीं हें पाहून कुशाला राज्यावर बसवून आपण निजधामास जातो.

ही रामायणांतील मूळ कथा. पण ती शोकान्त असल्यामुळें संस्कृत नाटकाला मानवण्यासारखी नव्हती. एवढ्यासाठीं कथानकांत कांहीं फेरफार करून भवभूतीनें शेवटच्या—सातव्या अंकांत राम-सीतेचें मीलन घडवून आणलें आहे. आणि हें मीलन शक्य तितकें नैसर्गिक व्हावें, रामाच्या राजधर्माला कलंक लागूं नये आणि अकारण त्यागाचें शल्य सीतेच्या मनांतून निघून जावें यासाठीं सबंध नाटकभर निरनिराळ्या उपायांचा अवलंब केलेला आहे.

तिसऱ्या अंकांत अदृश्य स्थितींत सीतेला ठेवून व सीतेची प्रियसखी वनदेवता वासंती हिची भेट करवून पंचवटींतील चिरपरिचित स्थलांच्या दर्शनानें रामाच्या हृदयांतील अगाध शोकाला वाट करून दिली आहे आणि त्या शोकाच्या आविष्कारामधून आपणांवर रामाचें केवढें गाढ प्रेम आहे, त्यागाला बारा वर्षें झालीं तरीहि आपल्याच दुःखानें राम व्यथित झालेला आहे, केवळ राजधर्माच्या कठोर पालनासाठीं आपल्या निष्कलंकत्वाची पूर्ण खात्री असूनहि त्यानें आपला त्याग केला, याबद्दल सीतेची खात्री पटलेली, सुंदर तऱ्हेनें दाखविली आहे. शंबूकवधासाठीं आलेला राम 'हे दक्षिण हस्ता,' असे आपल्या हाताला उद्देशून सीतेच्या त्यागाविषयींचे उद्गार काढतो व शंबूकाचा वध करतांनाहि हाच कठोर राजधर्म कारणीभूत झाला आहे, नाहीं तर तप करणाऱ्या शंबूकाला मारण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं असें स्पष्ट सांगतो. या सर्व गोष्टींमधून रामाच्या हृदयाचें कोमलत्व, त्याची मानवता व सीतात्याग आपणांस करावा लागला याबद्दलचें त्याचें अविरत दुःख नाना प्रकारांनीं व्यक्त करून तिसऱ्या अंकांत सीतेच्या अकारण त्यागाचें शल्य भवभूतेंनी नाजुक हातानें काढून टाकलें आहे.

रामाच्या राजधर्माला कलंक लागूं न देतां राम-सीतेचें मीलन व्हावें यासाठीं भवभूतीनें सातव्या अंकांत गर्भनाटकाची योजना केली आहे. चौथ्या अंकांत लव सांगतो कीं, 'रामायणांतील उत्तरभागाचें नाट्यीकरण करून त्याचा प्रयोग अप्सरांच्याकडून करविण्यासाठीं तें नाटक वाल्मीकींनीं भरत-मुनींकडे पाठविलें आहे व तें सुरक्षित पोंचावें यासाठीं रक्षणार्थ माझा भाऊ कुश हा पाठविला आहे.' सहाव्या अंकांत भरताश्रमांतून कुश परत आलेला दाखविला आहे. हें जें नाटक वाल्मीकींनीं रचलें असें भवभूतीनें दाखविलें आहे, त्याचा प्रयोग राम, अयोध्येचे नागरिक व देवगंधर्वादि अमर्त्य या सर्वांसमोर होत आहे असें भवभूतीनें दाखविलें आहे. हेतु हा कीं, सीतेच्या पावित्र्याबद्दल अयोध्येच्या पौरजनांची खात्री करून द्यावी व निष्कलंक सीतेच्या पुनर्मीलनाला रामानेंहि निःशंकपणें व आनंदानें तयार व्हावें.

चौथा, पांचवा व सहावा या तिन्ही अंकांचें स्थल वाल्मीकींचा आश्रम किंवा त्याच्या आसपासची भूमि हें आहे. सातव्या अंकांतील गर्भ नाटकाचाहि

प्रयोग आश्रमाच्या जवळच होतांना दाखविला आहे. मेध्य अश्वासाठीं होणाऱ्या युद्धाचें नियंत्रण करण्यासाठीं राम तेथें आलेला असतो. जनक, कौसल्या, वसिष्ठ, अरुंधती इत्यादि महत्त्वाच्या व्यक्तीहि तेथें उपस्थित असतात. सातवा अंक जो सुरू होतो तो लक्ष्मणाच्या प्रवेशानें. "भगवान् वाल्मीकींनीं ब्राह्मण, क्षत्रिय, नागरिक, सुर, असुर एवढेंच नव्हे, तर संपूर्ण चराचर जगताला आपलें नाटक पाहण्यासाठीं बोलाविलें आहे. आणि मला रामचंद्रांनीं आज्ञा केली आहे कीं, 'ज्या अर्थीं भगवान् वाल्मीकींनीं आपणांस बोलाविलें आहे त्या अर्थीं सर्व प्रेक्षकांची व्यवस्था गंगातीरावर करण्यासाठीं तूं जा.' त्यांच्या आज्ञेप्रमाणें मीं सर्व व्यवस्था केली आहे. सर्व जणांना व्यवस्थित बसविलें आहे. आतां वाल्मीकींच्या निमंत्रणाला मान देण्यासाठीं खुद्द महाराजच इकडे येत आहेत. ते राज्य चालवीत असले, तरी त्यांनीं कठीण मुनिव्रतच स्वीकारलें आहे."

राम आल्याबरोबर विचारतो, 'थोरथोर, प्रेक्षकांची नीट व्यवस्था केली आहेस ना?' लक्ष्मणाकडून होकार येतांच 'हें पहा, या कुश-लवांचीहि व्यवस्था चंद्रकेतूप्रमाणेंच करायची आहे.'—हीं आपलीं मुलें नाहींत असें रामाला वाटलें, तरी त्यांच्याविषयीं मनांत उत्पन्न झालेल्या उत्कट प्रेमामुळें चंद्रकेतूप्रमाणेंच त्यांची बसण्याची व्यवस्था करण्यास राम सांगतो हें साहजिक आहे आणि पुढचें सूचकहि आहे.

सूत्रधार प्रवेश करून सर्वांस सांगतो कीं, 'भगवान् वाल्मीकींची सर्वांना आज्ञा आहे कीं, दिव्यदृष्टीनें पाहून त्यांनीं जें करुणाद्भुतरसात्मक नाटक रचिलें आहे तें सर्वांनीं लक्षपूर्वक पहावें.' हें ऐकतांच ऋषींची दिव्यदृष्टि ही साऱ्या शंकांच्या पलीकडची असते, असे उद्गार राम काढतो. इतक्यांत पडद्यांतून सीतेचे उद्गार ऐकूं येतात, 'हा आर्यपुत्र, मला एकटीला आसन्नप्रसव स्थितींत या अरण्यांत टाकून दिलें आहे. हिंस्र श्वापदें मजभोंवतीं वावरत आहेत. मी अत्यंत दुर्दैवी आहें तेव्हां भागीरथींत उडी टाकून या जीवनाचा अंत करतें.'—सूत्रधार कथासूत्र सांगतो, 'वसुंधरासुता सीतादेवीला महाराजांनीं रानांत टाकून दिल्यावर आसन्नप्रसव स्थितींत ती भागीरथींत उडी घेत आहे.' एवढें सांगून सूत्रधार जातो.

हें नाटक आहे याची जाणीव न राहून नाटकांतील सीतेचे ते हृदयभेदी उद्गार ऐकून राम आवेगानें म्हणतो, 'देवी, लक्ष्मणाकडे तरी पहा.' (मीं तर त्याग करण्याची आज्ञा केली होती, तेव्हां माझ्याकडे पाहून उडी घेऊं नको असें म्हणण्याचा मला काय अधिकार आहे असेंच जणू रामाला सुचवायचें असतें.) रामाचा तो भावनावेग पाहून लक्ष्मण, 'हें नाटक आहे' या गोष्टीची रामाला आठवण करून देतो. पण रामाचें हृदय शोकानें भरून येतें. 'महाराज, नाटकाच्या अर्थाकडे लक्ष असूं द्यावें' असें लक्ष्मणानें सुचवितांच, 'हा पहा मी वज्रहृदयाने सर्व पाहण्यास तयार आहें' असें म्हणून राम स्वतःचा अधिक्षेप करून घेतो.

नाटक सुरू होतें. एकेका मुलाला हातांत घेऊन सीतेला सांवरीत पृथ्वी व गंगा प्रवेश करतात. पृथ्वी व गंगा सीतेला सांगतात, 'वैदेहि, जागी हो, रघुवंशधर अशा दोन पुत्रांना तूं जन्म दिला आहेस.'—तें दृश्य पाहतांच लक्ष्मणास हर्ष होतो. सीतादेवीला आपणांस टाकून यावें लागलें, तरी नंतर अरण्यांत तिचा मृत्यु न होतां तिनें पुत्रांना जन्म दिला. पृथ्वी व गंगा या देवतांनीं तिचें रक्षण केलें, हें जाणून लक्ष्मण आनंदित होतो. पण रामाकडे लक्ष जातांच तो दुःखानें मूर्च्छित झालेला त्यास दिसतो. लागलीच तो वारा घालूं लागतो. इकडे रंगभूमीवर सीता विचारते, 'आपण कोण?' तेव्हां 'ही तुझी श्वशुरकुलदेवता भागीरथी' व 'ही तुझी माता पृथ्वी' अशी गंगा व पृथ्वी एकमेकींची ओळख सीतेला करून देतात. मातेला पाहतांच सीतेला दुःख अनावर होतें. पृथ्वी सीतेला आलिंगन देते. त्या दोघी मूर्च्छित होतात. 'विश्वंभरा असूनहि आपणांस एवढें दुःख होत आहे, तेव्हां अपत्य-स्नेहानें आपणांवर विजय मिळविला आहे खराच' असें गंगा पृथ्वीला म्हणते व जागी होण्याची विनंती करते.

यापुढील संवाद दोन विहिणींचा आहे. पृथ्वी तर प्रत्यक्ष सीतेची माता आणि गंगा रघुकुलदेवता म्हणून रामाला मातृवत्. रामानें सीतेचा अकारण त्याग केला, म्हणून पृथ्वीचा रामावर व पर्यायानें गंगेवर रोष. अर्थात् गंगेच्या विनंतीला ती उत्तर देते, 'सीतेची माता झाल्यावर दुःखावांचून काय माझ्या वांट्यास येणार? मागें रावणाच्या घरीं सीतेला जो काळ

काढावा लागला, तो मीं सहन केला. हा त्याग मात्र असह्य झाला आहे.' गंगा लागलीच म्हणते, 'एकेका व्यक्तीच्या आयुष्यांतील घटना एका विशिष्ट रीतीनें घडविण्याचें दैवानेंच ठरविलें, तर कोण दैवाच्या आड येऊं शकेल?' 'भागीरथि, तुझ्या रामचंद्राला हें शोभलें काय? सीतेचा त्याग करतांना, लहानपणींच पत्नी म्हणून सीतेचा आपण स्वीकार केला होता, याची त्यानें आठवण ठेवली नाहीं. जनकासारखा पिता व माझ्यासारखी माता, यांचाहि विचार त्यानें केला नाहीं. सीतेच्या अग्निशुद्धीची साक्ष त्यानें मानली नाहीं. तिला आसन्नप्रसव अवस्थेंत टाकतांना आपल्या संततीचें काय होईल याचीहि त्यानें पर्वा केली नाहीं.' पृथ्वीच्या तोंडचे हे उद्गार ऐकतांच, 'आर्यपुत्रांचें पुन्हां एकदां मला स्मरण करून दिलें आहे.' असें सीता म्हणते, यावर 'कोण तुझे आर्यपुत्र?' असें पृथ्वी तिला क्षुब्ध होऊन विचारते.—इकडे, राम उद्गारतो, 'माते पृथ्वी, खरोखरच मी निष्ठुर आहें.'

क्षुब्ध पृथ्वीमातेला शांत करण्यासाठीं भागीरथी म्हणते, 'वसुंधरे, तूं साऱ्या जीवनाचें अधिष्ठान आहेस. तेव्हां एखाद्या अजाणत्याप्रमाणें आपल्या जावयावर कां रागावतेस?'

**घोरं लोके विततमयशो या च वन्हौ विशुद्धिः**
**लंकाद्वीपे कथमिव जनस्तामिह श्रद्दधातु ।**
**इक्ष्वाकूणां कुलधनमिदं यत्समाराधनीयः**
**कृत्स्नो लोकस्तदिति विषमे किं स वत्सः करोतु ॥**

'सीतेविषयींचा अपवाद सर्व लोकांत पसरला होता. शिवाय तिची अग्निशुद्धि दूर लंकेंत झाल्यामुळें लोकांचा त्या गोष्टीवर विश्वास कसा बसावा? रामाच्या दृष्टीनें पाहशील तर सर्व लोकांना संतुष्ट ठेवणें, हें रघुकुलाचें धन असल्यामुळें रामानें तरी बिचाऱ्यानें या कठीण परिस्थितींत दुसरें काय करणें शक्य होतें? तरीहि मीं तुला हात जोडतें.'

भागीरथीच्या वचनानें पृथ्वी शांत होऊन म्हणते, 'देवी, मी तुझ्यावर नेहमींच प्रसन्न आहें; पण सीतेविषयींच्या दुःखानें क्षुब्ध होऊन मीं तसें बोललें. शिवाय रामचंद्राचें सीतेवर केवढें प्रेम आहे हें मला माहीत नाहीं असें का तुला वाटतें? दुर्दैवामुळें सीतेचा त्याग करावा लागला या दुःखानें त्याचें

हृदय इतकें जळत आहे कीं, तो केवळ आपल्या लोकोत्तर धैर्यानेंच जिवंत राहिला आहे.'

गंगा व पृथ्वी या दोघींनाहि आपल्या हृदयाची यथार्थत्वानें कल्पना आहे, हें पाहून रामाला समाधान वाटतें आणि या देवतांच्या मुखांतून रामाच्या दुःखाबद्दल उद्‌गार निघाल्यामुळें प्रजेसाठीं रामानें केवढें दिव्य केलें याची जाणीव प्रेक्षकांना व पौरजनांना होते. सीता मात्र आपल्या दुःखांतच बुडालेली असते. ती पुन्हा पृथ्वीला म्हणते, 'माते, मला आपल्या उदरांत घेऊन जा.' त्यावर गंगा व पृथ्वी या दोघीहि तिला सांगतात कीं, 'अजून आपल्या पुत्रांचें तुला रक्षणपोषण करावयाचें आहे, तेव्हां एवढ्यांत तुला इहलोकांतून जातां येणार नाहीं.' 'पण मी अनाथ आहें. ह्यांना घेऊन काय करूं?' असा प्रश्न सीता विचारतांच राम म्हणतो, 'हृदया, तूं खरोखरच वज्र-कठोर आहेस?'

मात्र सीतेचा प्रश्न ऐकतांच गंगा चटकन् म्हणते, 'तुझा नाथ जिवंत असतांना तूं अनाथ कशी होशील?' 'माझ्यासारख्या मंदभागिनीच्या सनाथत्वाला काय अर्थ आहे?' असें उत्तर सीतेकडून येतांच गंगा व पृथ्वी एकदम म्हणतात, 'तूं जगाचें मांगल्य असतांहि स्वतःला कमी कशी लेखतेस? तुझ्या संबंधामुळें आम्हां दोघींचेंहि पावित्र्य वाढलें आहे.' गंगा-पृथ्वीसारख्या जगद्वंद्य देवतांच्या मुखांतून सीतेविषयीं एवढे गौरवाचे उद्‌गार निघतांच लक्ष्मण रामाला विचारतो, 'महाराज, ऐकलेंत ना?' 'लोकांनाच ऐकूं दे' असें राम उत्तर देतो. हें बोलणें चाललेलें असतें इतक्यांत पडद्यांतून आवाज येतो. 'गुरुशिष्यपरंपरेनें रामाला प्राप्त झालेल्या जृंभकास्त्राचा हा आविष्कार आहे' असें गंगा-पृथ्वी म्हणतात तोंच जृंभकास्त्राची देवता पडद्यांतून म्हणते, 'देवी सीते, आम्ही तुझ्या पुत्रांकडे जात आहोंत. चित्रपटदर्शनाच्या वेळींच रघुनंदनानें आम्हांला तुझ्या पुत्रांना देऊन टाकलें.' चित्रपटदर्शनाच्या वेळीं रामानें 'तुझ्या पुत्रांना जन्मतः जृंभकास्त्रें प्राप्त होतील' असा आशीर्वाद दिलेला असतो, त्याचें राम, लक्ष्मण व सीता या सर्वांनाच स्मरण होतें. सर्वजण त्या अस्त्रांना नमस्कार करतात.

'जृंभकास्त्रामुळें तुझे पुत्र आतां रामचंद्रासारखेच झाले आहेत' असें गंगा-पृथ्वी सीतेला मोठ्या कौतुकानें सांगतात; पण सीतेला प्रश्न पडतो,

' यांचा क्षत्रियोचित विधि कोण करणार ? ' ज्या रघुवंशाचे गुरु वसिष्ठ आहेत, त्या वंशांतील सीतेला मुलांच्या क्षत्रसंस्कारासाठीं गुरु मिळूं नये ही केवढी दुःखाची गोष्ट आहे ! पण रघुकुलाची देवता गंगा तिथें होतीच. मुलें अंगावरून तोडतांच तीं मीं वाल्मीकींच्या स्वाधीन करीन, ते त्यांचा क्षात्रविधि यथाविधि यथासांग करतील. ' असें आश्वासन ती सीतेला देते.

जृंभकास्त्र जन्मतः प्राप्त झालेलीं व वाल्मीकींच्या आश्रमांत बारा वर्षांपूर्वीं पाठविलेलीं हीं मुलें म्हणजेच कुश-लव असले पाहिजेत, अशी लक्ष्मणाची एकदम खात्री पटते. कुश-लव हे आपलेच पुत्र आहेत हें ऐकतांच रामाचें हृदय आनंदानें भरून येतें—गंगेच्या आश्वासनानें सीता निश्चिंत झाली, तरी त्यागानंतर आतां जगांत राहण्यांत अर्थ नाहीं असें म्हणून ती ' मला उदरांत घे ' असें पृथ्वीला पुन्हा विनविते. ' अंगावरून तोडण्या-इतकीं मुलें मोठीं होईपर्यंत तूं इहलोकांतच राहा, त्यानंतर तुला आवडेल तसें मी करीन. ' असें पृथ्वी तिला आश्वासन देते आणि पृथ्वी, गंगा व सीता निघून जातात.

गर्भनाटकांतील सीता निघून जाते. पण जणूं खरोखरीचीच सीता जगांतून नाहींशी होत आहे अशा कल्पनेनें राम सीतेचें नांव घेत मूर्च्छित होतो. ' भगवान् वाल्मीकि, आपल्या नाटकाचा हा काय परिणाम झाला !' असे उद्गार लक्ष्मण काढतो. इतक्यांत पडद्यांतून आवाज येतो, ' नाटकासाठीं आणलेलीं वाद्यें घेऊन जा. ' सर्व मर्त्यामर्त्यांनो, भगवान् वाल्मीकींच्या अनुज्ञेनें निर्माण झालेलें आश्चर्य पहा. ' लक्ष्मण चकित होऊन समोर पाहतो तों गंगेच्या पाण्यावर प्रचंड लाटा उसळतात आणि त्यांतून गंगा-पृथ्वी या खऱ्याखुऱ्या सीतेला घेऊन येतांना दिसतात. ' महाराज, हें आश्चर्य पहा ' असें म्हणून तो रामाकडे वळतो तों राम अद्यापहि मूर्च्छितावस्थेंत असलेला दिसतो.

इतक्यांत सीतेसह अरुंधती प्रवेश करते आणि आपल्या स्पर्शानें आपल्या पतीला उठव असें ती सीतेला सांगते. सीतेचा प्रियस्पर्श होतांच राम चटकन् उठून बसतो व सीता प्रत्यक्ष दिसतांच आनंदानें मुग्ध होतो. गंगा व पृथ्वी दोघीहि, आम्ही सीतेचें आजवर रक्षण केलें, आतां तूं सांभाळ, असें सांगून

अंतर्धान पावतात. सीतेला समोर करून, उपस्थित असलेल्या सर्व पौरजानपदांना उद्देशून अरुंधती विचारते, 'भगवती भागीरथी व विश्वंभरा पृथ्वी यांनीं जिच्या पावित्र्याचें वर्णन केलें आहे व अग्नीनें जिला पूर्वींच शुद्ध केलें आहे, देवांनीं जिची स्तुति केली आहे, त्या या सीतादेवीचा स्वीकार करावयाचा कीं नाहीं हें सांगा.'—'अरुंधतीसारख्या पवित्र गुरुपत्नीचे हे निर्भर्त्सनात्मक उद्‌गार ऐकतांच सर्व पौरजानपद सीतादेवीला नमस्कार करीत आहेत. आणि सप्तर्षि व लोकपाल सीतादेवीवर पुष्पवृष्टि करीत आहेत.' असें वर्णन लक्ष्मण करतो. अरुंधती रामाकडे वळून म्हणते, 'सहधर्मचारिणी म्हणून सीतेची पुनः स्थापना कर. यज्ञांतील सीतेची सुवर्णमूर्ति काढून तेथें सीतेची स्थापना कर.'

अरुंधतीच्या शब्दांमुळें निःशंक अंतःकरणानें, सीतेचा स्वीकार करण्यास मिळाल्यामुळें राम, सीता व लक्ष्मण सर्वच आनंदित होतात. अरुंधती भगवान् वाल्मीकींना सीतेच्या मुलांना—कुश-लवांना—आणावयास सांगते. वाल्मीकि कुश-लवांना घेऊन त्यांना मातापित्यांची ओळख करून देतात. प्रियतम सीतेचें पुनर्मीलन व प्रियपुत्रांची प्राप्ति या दोन्ही अकल्पित घटनांमुळें राम आनंदानें महिरून जातो. बारा वर्षांच्या अविरत दुःखानंतर प्रियपतीच्या मीलनामुळें व कुशलवांच्या भेटीमुळें खरोखर सनाथ व पुत्रवती झालेली सीता आनंदानें फुलून जाते. या पुनर्मीलनाच्या महोत्सवांतच भरतवाक्य गाइलें जातें.

सीताचरित्राचें निष्कलंकत्व सिद्ध करण्यासाठीं गर्भनाटकाच्या रूपानें गंगा-पृथ्वीची साक्ष वाल्मीकींनीं पौरजानपदांना पटविली. आणि त्यांनीहि ती साक्ष शिरोधार्य मानून सीतादेवीला आदरानें प्रणाम केला, तेव्हां अरुंधतीने सीतेचा स्वीकार करण्यास रामास सांगितलें. रामाच्या चारित्र्याला राजकर्तव्याच्या च्युतीची बाधा न लागूं देतां व सीतेच्या चारित्र्याला अकारण त्यागाचें शल्य मनांत ठेवून स्वाभिमानच्युतीची बाधा लागूं न देतां मोठ्या कुशलतेनें व योजकतेनें राम-सीतेचें पुनर्मीलन भवभूतीनें घडवून आणलें आहे. राम व सीता हे थोर पुरुषत्वाचे व थोर स्त्रीत्वाचे अनुपम आदर्श होत यांत शंकाच नाहीं. परंतु ती थोरवी निरनिराळ्या प्रसंगांच्या रूपानें

व निरनिराळ्या संबंधांच्या माध्यमांतून ज्या हृदयंगमतेनें भवभूतीनें दृष्टीसमोर उभी केली आहे ती खरोखर अपूर्व आहे. स्त्री-पुरुषप्रेमाच्या उदात्त, कोमल, मधुर व सखोल छटांचें व पैलूंचें वर्णन आधुनिकांतील आधुनिक कथाकादंबऱ्यांतून वाचावयास मिळाल्यानंतरहि भवभूतीचें उत्तररामचरित्र जें अपूर्व वाटतें तें याच गुणांमुळें.

**काव्येषु नाटकं रम्यम्**
**तत्र रम्यं शकुंतला ।**
**तत्रापिच चतुर्थो ऽ ङ्कः**
**तत्र श्लोक चतुष्टयम् ।।**

कालिदासाचें शाकुंतल नाटक वाचण्यास व अभ्यासिण्यास प्रारंभ केला कीं, प्रथमच या वरील स्तुतिपर श्लोकाचा परिचय होतो. आपण जें नाटक वाचणार आहोंत तें समस्त संस्कृत नाट्य-वाङ्मयांत उत्तमोत्तम ठरलेलें नाटक आहे अशा खात्रीनेंच त्याचा पहिला अंक आपण वाचूं लागतों. आणि चौथा अंक वाचल्यानंतर तर त्यांतील रम्यत्वानें आपलें मन मोहून जातें यांत संशय नाहीं. चौथ्या अंकांतील तें आश्रमाचें शांत, सुंदर वातावरण. मृगाक्षी व मृगनिष्पापहृदया शकुंतला, तिची पतिगृहीं पाठवणी करतेवेळीं तिच्या सख्यांनाच झालेला नव्हे तर साक्षात् अरण्यवासी भगवान् कण्वांना झालेला हृदयस्पर्शी शोक, शकुंतलेनें वाढविलेली मोगरीची वेल व हरिणबालक इत्यादींना सख्यांच्या हातीं सोपवितांना तिच्या निरागस प्रेमळ हृदयाची होणारी कालवाकालव-अशा एक ना अनेक नाजुक, कोमल, निष्पाप व प्रेमळ गोष्टींमुळें शाकुंतलाचा चौथा अंक आजहि पुन्हा वाचतांना मन मोहून टाकतो व नेत्रांत अश्रु आणतो.

पण चौथा अंक संपवून पुढें जावें; अंकामागून अंक वाचूं लागावें कीं, असा अनुभव येतो कीं, नाटकांतला उत्कर्षबिंदु केव्हांच आपण मागें टाकला आहे. आतां केवळ नाटक संपविणें चाललें आहे. अर्थात् कालिदासासारख्या नाट्यसम्राटाचीच ती कृति. तेव्हां तिच्यांत कांहीं नाट्यगुण हे सांपडणारच. आज अठ्ठावीस वर्षांनीं मीं पुन्हा शाकुंतल वाचलें. त्यांतील रसग्रहण करण्याच्या

दृष्टीनें वाचलें. पण चौथा अंक सोडून कोठल्याहि अंकांत माझें मन रमलें नाहीं. आणि चौथ्या अंकांतहि ज्या रम्यत्वानें मला मोहून टाकलें, त्यांत निष्पापता व कन्याप्रेमाचा ऋषींवरहि झालेला प्रभाव, याच गोष्टींचा माझ्या मनावर ठसा उमटला. शकुंतलेची निरागस असहायता आणि कण्वमुनींचें निष्पाप शकुंतलेवरील जणूं असहाय भासणारें प्रेम. चौथा अंक वाचून एक प्रकारच्या मधुर असहायतेच्या दर्शनानें मन भरून जातें. त्यांत रम्यत्व आहे. पण उदात्तता, उत्तुंगता, सखोलता यांचा प्रत्यय येत नाहीं.

संपूर्ण शाकुंतलांत कुठल्या एका उत्कट भावनेचा प्रत्यय येत असेल, तर तो कण्वमुनींच्या शकुंतलेवरील प्रेमाचा. चौथ्या अंकांतील एवढी एक हिरवळ सोडली कीं, साही अंकांत दुष्यन्त काय, शकुंतला काय किंवा इतर व्यक्ति काय कोणामध्येंहि उत्कट, सखोल प्रेमाचा आविष्कार दिसत नाहीं. स्नेह-बंधनांच्या ज्या आविष्कारांनीं मनावर ठसा उमटवावा असे कोणतेच आविष्कार आढळत नाहींत. याच्या उलट उत्तररामचरितांत पहिल्या अंकापासून तों अगदीं शेवटच्या अंकापर्यंत मानवी जीवनांतील निरनिराळ्या स्नेहसंबंधांचें केवढें सखोल व उत्कट दर्शन घडतें. पहिल्या अंकांत रामसीतेचें परस्परां-वरील प्रगाढ प्रेम त्यांच्या लहानलहान वाक्यांमधूनहि ओसंडतांना आढळतें. दुसऱ्या अंकांतील आत्रेयी-वासंतीच्या संवादांतून व शंबूक-रामाच्या संवादाच्या द्वारां रामाच्या सीतेवरील प्रेमाचें दिग्दर्शन होत राहतें. तिसऱ्या अंकांत तर राम-वासंतीच्या संभाषणाच्या द्वारां व अदृश्य सीता-तमसेच्या संभाषणांतून राम-सीतेच्या परस्परांवरील प्रेमाचें अधिकच सखोल दर्शन घडतें; परंतु त्याचबरोबर राम व वासंती यांच्या सीतेवरील प्रेमामुळें उभयतांत निर्माण झालेलें मैत्रीचें नातेंहि त्यांच्या संवादांतून केवढ्या नाजुकपणानें व्यक्त होत असतें. चौथ्या अंकांत जनक व कौसल्या यांचेंहि दशरथाचा मित्र व दशरथाची पत्नी या नात्यामुळें निर्माण झालेलें सौहार्द आणि रामानें सीतात्याग केल्यामुळें उभयतांत प्रथमदर्शनीं निर्माण झालेलें मनोमालिन्य यांचेंहि चित्रण सुंदर साधलें आहे.

चौथ्या, पांचव्या व सहाव्या अंकांत बारा वर्षांच्या लवाचें रेखाटलेलें चित्र हृदयवेधक आहे. कुशाचा थोडासाच प्रवेश सहाव्या अंकांत आहे.

पण त्याचेंहि चित्र डोळ्यांत भरण्याइतकें स्पष्ट आहे. उत्तररामचरितांतील लहान-मोठ्या सर्वच व्यक्तींचीं चित्रें अशीं स्पष्ट व वैशिष्ट्यपूर्ण आहेत, एक प्रकारचा भारदस्तपणा व अर्थगौरव या व्यक्तिचित्रांमध्यें अनुभवास येतो. बारा वर्षांचा एवढासा लव; पण रामाशिवाय क्षत्रिय जगांत नाहीं, अशी घोषणा ऐकतांच त्याचें क्षत्रियत्व केवढ्या साहसानें वर उसळून आलें! गुरुजनांसमोर तो विनयानें वागतो, आश्रमकुमारांबरोबर खेळकर मुलाप्रमाणें खेळतो; पण स्वाभिमानाला डिवचणारें वचन ऐकतांच त्याचें वीरत्व उसळून येतें.

राम, सीता, जनक, कौसल्या, अरुंधती, वासंती, लव, कुश व चंद्रकेतु या सर्वांच्याच व्यक्तित्वाला एक धार आहे. येथे असहायता सांपडणार नाहीं, अगतिकता आढळणार नाहीं, दुर्बलता दिसणार नाहीं. अत्यंत दुःखपूर्ण अशा घटना, आंत हृदय जळत असतांहि गंभीरतेनें खांद्यावर पेलणाऱ्या व्यक्ति उत्तररामांत आहेत. राम, जनक, लव, कुश या व्यक्ति आपल्या पराक्रमानें किंवा थोरपणानें लक्ष वेधून घेतात हें खरें; पण अरुंधती, वासंती, कौसल्या यांना तर अशी पराक्रमाची पार्श्वभूमि नसते. तरीहि यांच्या व्यक्तित्वाचें एकेक प्रखर वैशिष्ट्य त्यांच्या एकेका वाक्यांतून किंवा एकेका प्रसंगांतून जेव्हां प्रकट होतें, तेव्हां मानवी जीवनांतील एक विलोभनीय विशेष गवसल्याचा मनाला आनंद होतो.

पतिपत्नी, पितापुत्री, सख्या, सासूसून, गुरुपत्नी–शिष्या, इ. निरनिराळ्या स्नेहसंबंधांचें जें सुंदर चित्रण उत्तररामचरितांत आढळून येतें, त्यांतून एका अतिशय सुसंस्कृत, प्रगत मानवी समाजाचें दर्शन घडतें. एकप्रकारच्या सहजसुंदर मानवी उदात्ततेनें व रम्यतेनें मन मुग्ध होऊन जातें. म्हणूनच, काव्येषु नाटकं-रम्यं तत्र रम्यं—या पंक्तीची पूर्ति 'उत्तररामचरितम्' याच नांवानें व्हावयास पाहिजे असें मला पुनःपुन्हा शाकुंतल व उत्तररामचरित वाचल्यानंतरहि निश्चयानें वाटतें.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३०००२ ............ दि: ....
ग्रंथ १५६६ ............ नोंद दि: २०/२/६५

REFBK-0013769